
# मेहता मराठी ग्रंथजगत

ऑगस्ट, २०१६ । पृष्ठे १०० । किंमत १५ रुपये







## आमची वाचनीय पुस्तके









# काही क्षणचित्रे...



प्रसिद्ध व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांच्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त
द. मा. मिरासदार यांनी त्यांचा सत्कार केला.
यावेळी सौ. शकुन्तला फडणीस,
सुनिल मेहता आणि व्यंगचित्रकार चारुहास पंडित



९२ व्या वाढदिवसानिमित्त
केक कापताना प्रसिद्ध व्यंगचित्रकार
शि. द. फडणीस...

# मेहता मराठी ग्रंथजगत

। ऑगस्ट २०१६ । वर्ष पंधरावे । अंक आठवा ।

**मांडणी-अक्षरजुळणी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २३८
E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**

प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **दिनविशेष** | १० |
| **उपक्रम** | १४ |
| **साहित्यवार्ता** | २० |
| **पुरस्कार** | ५० |
| **पुस्तक परिचय** | |
| **चिकन सूप फॉर द वुमन सोल भाग - २** | ५६ |
| **स्मरण** | ८० |
| **श्रद्धांजली** | ८२ |
| **अभिप्राय** | ८६ |
| **का ते सांगा!** | ९० |

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# संपादकीय

## महाश्वेतादेवींचं बहुरूपी साहित्यविश्व

आषाढसंपून श्रावणाची संततधार सुरू झाली आहे. ऊनपावसाचा खेळ रंगत असताना जीवनाच्या पठारावर अनेक जुन्या गोष्टी मागे पडल्या आहेत. नव्या उगवू पहात आहेत. श्रावण मुळातच सृष्टीच्या सर्जनशीलतेचा द्योतक. सणउत्सवाच्या संकेतांमधून या ऋतूच्या नवनिर्मितीक्षम अस्तित्वाला वेगळं महत्त्व लाभतं. सृष्टी असा बहराचा साज ल्यालेली असताना हा अंक आपल्या हाती पडतो आहे. श्रावणातल्या संततधारेप्रमाणेच पुस्तकांचं जगही मन प्रफुल्लित करण्याचा वसा कायम जोपासतं. मेहता पब्लिशिंग हाऊस अशा जगणं समृद्ध करणाऱ्या पुस्तकांचा आधार. मराठी मातीतल्या नव्या लेखणीपासून जगभरच्या साहित्य प्रवाहांची वाचकांना ओळख घडवण्याचा ध्यास घेऊन आम्ही आपल्या भेटीस आलो आहोत.

साहित्य विश्वात नव्या बीजांची रुजवण नित्याने होत असते; पण त्या बीजांमध्ये मागील पिढ्यांची सकसताही रुजलेली असते. असं लिहित्या हातांना कायम प्रोत्साहित करणारं आणि भारतीय साहित्यात मानवतावादाची तार बळकट करणारं नाव म्हणजे महाश्वेता- देवी. भारतीय साहित्यातल्या या अफाट अध्यायापुढं २८ जुलैला पूर्णविराम विसावला. वयाच्या नव्वदाव्या वर्षी जगाचा निरोप घेतलेल्या महाश्वेतदेवींनी जणू साहित्य विश्वातलं एक शतक अनुभवलं आणि

आपल्या दूरदृष्टीनं त्याचा पट वाचकांसाठीही खुला केला. ज्ञानपीठ, पद्मविभूषण, रेमन मॅगसेसे, साहित्य अकादमीसारख्या सर्वोच्च पुरस्कारांच्या त्या मानकरी; पण त्यांचं जीवितकार्य कुठल्याही पुरस्काराच्या चौकटीला पुरून उरणारं असंच. देशभरच्या गुणवंतांमधली सकसता ओळखून तिला खतपाणी घालणं असो, गणनाट्यसारखी चळवळ असो वा आदिवासातल्या मानवी मूल्यांना साहित्यिक परीक्षेपात आणून नवसंजीवनी देणं असो, महाश्वेतादेवी यांनी साहित्य विश्वात खमक्या आधारस्तंभाची भूमिका बजावली आहे.

लेखक समाजाचा आरसा असतो, याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे महाश्वेतादेवी. पत्रकार, लेखक आणि आंदोलनकर्ती अशा समाज जीवनाच्या सूत्रांशी जोडलेल्या भूमिका त्यांनी आयुष्यभर निभावल्या. साहित्य क्षेत्रातला त्यांचा वावरही तितकाच बहुरूपी, बहुअंगी. नकळत्या वयातच लेखणाची गोडी लागलेल्या महाश्वेतादेवींनी कविता, लघुकथा, कादंबरी, ललित अशा एकाही साहित्य प्रकाराला पोरकं ठेवलं नाही. त्या झाशीच्या राणीचा वारसा घेऊनच साहित्यिक लढाईत उतरल्या. 'झासी की रानी' त्यांचं पहिलं गद्यलेखन. यातही इतिहास आणि साहित्यिक कल्पकतेचा अनोखा संगम त्यांनी दर्शवला. त्यांचा साहित्यप्रवास कवितेतून सुरू झाला असला तरी कथा आणि कादंबरीचा कॅनव्हासही त्यांनी समर्थपणे पेलला. लघुकथांच्या वावरात त्यांचं हुकमी पाऊल. म्हणूनच वीसहून अधिक संग्रहांतून शेकडो नव्या संकल्पनांमधून महाश्वेतादेवी वाचकांना भेटतात.

महाश्वेतादेवींच्या साहित्यानं जसं वाचकांना दर्जेदार कल्पनाविश्व दिलं, तसंच त्यांच्या साहित्यमूल्यानं सिनेमाच्या रुपेरी पडद्यालाही कथाबीज दिलं. 'रुदाली' आणि 'हजार चौरासी की माँ'सारख्या दर्जेदार सिनेमांचा आस्वाद महाश्वेतादेवींच्या लेखणीने दिला. त्यांची पार्श्वभूमी बंगाली असली, तरी देशाच्या कानाकोपऱ्याचं प्रतिनिधित्व त्यांच्या साहित्याने अनुभवलं. बिहार, मध्यप्रदेश, छत्तीसगढमधल्या आदिवासी महिलांपासून शहरातल्या गर्दीत स्वतःचा आवाज शोधणाऱ्या बाईचा त्या आवाज झाल्या. म्हणूनच त्यांच्या साहित्यातील स्त्रीवादी मूल्यांची

पेरणी प्रत्येक लेखिकेला प्रेरणादायी वाटते. लिहित्या बायांना महाश्वेतादेवींचा हात सतत गोंजारत असतो. व्यक्त होण्याचं धैर्य देत असतो.

महाश्वेतादेवी सामान्य माणसांचं भावविश्व साहित्यात नव्याने आकारत राहिल्या. त्या भावविश्वाला वैश्विक आयाम देत राहिल्या. २००६ साली फ्रँकफर्टला भारतानं पहिल्यांदा प्रतिनिधित्व केलं. त्यातही जगाला भारतीय साहित्याची झलक दाखवण्याचं काम महाश्वेतादेवींनी केलं. स्वातंत्र्यपूर्व काळापासून एकविसाव्या शतकाच्या पहिल्या टप्प्यापर्यंतच्या देशाच्या संक्रमणाच्या त्या साक्षीदार होत्या. स्वातंत्र्यानंतरही चळवळींसोबत बदलत गेलेला भारतीय समाज वाचकांच्या आगामी पिढ्या त्यांच्या नजरेतून पाहू शकतील.

आपल्या प्रदीर्घ साहित्य प्रवासात व्यक्ती आणि समाजाचे भावबंध ठळकपणे मांडण्याचा वसा त्यांनी जोपासला. त्याच मानवी मूल्यांची जोपासना प्रत्यक्ष आयुष्यात केली. नव्वद वर्षांच्या आयुष्यात सामान्य माणसावरची त्यांची निष्ठा अखंड राहिली. त्यांच्या त्या निष्ठेला आणि भारतीय समाजाचा पट उलगडणाऱ्या त्यांच्या साहित्यकृतींना सलाम!



# मेहता मराठी ग्रंथजगत

## विशेष...

दि. १ मार्च, २०१६ पासून
मेहता पब्लिशिंग हाऊस
'मेहता मराठी ग्रंथजगत'ची
वार्षिक वर्गणी
बंद करीत आहोत.
तरी आपण
त्रैवार्षिक किंवा पंचवार्षिक वर्गणी
पाठवून सहकार्य करावे,
ही विनंती.

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

### बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही
बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे

पहिला मजला, खानापूर रोड, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६

शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६

स्टार बझार, पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१

शॉप नं. - जी/१५, प्रोझोन मॉल, चिखलठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी संपर्क

www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

**मेहता बुक सेलर्स**

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

GET IT ON Google Play आणि dailyhunt


यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

eBooks



# मैत्र जीवांचे



**जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ।।**
**भूतां परस्परें जडो । मैत्र जीवांचे ।**

सर्व भुतांमधले (मानव, प्राणिमात्र इत्यादी) वैरभाव संपून मैत्रभाव जागा व्हावा, त्यांना सत्कर्माची गोडी लागून ते एकमेकांचे मित्र होवोत; त्यांचे मित्रत्व वाढून ते टिकून राहो अशी प्रार्थना संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींनी पसायदानातून विश्वात्मक देवाकडे केली आहे. या ओळी आपल्या जीवनाशी नित्य निगडित असणाऱ्या 'मैत्र' या शब्दाचे महत्त्व विशद करतात.

दुष्टपणा नाहीसा झाल्यावर काही चांगले करण्याची इच्छा-आकांक्षा अंतर्मनात निर्माण होते. सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात परस्परांविषयी निर्मळ प्रेम-जिव्हाळा उत्पन्न झाला तर प्रत्येक जीव दुसऱ्यासाठी, मित्रासाठी चांगलाच आचार, विचार आणि उच्चार करील हे ओघाने आलेच! संत ज्ञानेश्वरांना हेच अभिप्रेत आहे.

भूतमात्र म्हणजे फक्त माणसं नव्हेत, तर निसर्गातील वृक्षवेली, पशू-पक्षी, एखादा छंद, ध्यास, सद्‌विचार किंवा एखादी नवकल्पनासुद्धा आपल्या जन्माचे सोबती, मित्र होऊ शकतात.

ऑगस्टच्या पहिल्या रविवारी 'मैत्री दिन' अर्थात 'फ्रेंडशिप डे' साजरा केला जातो. मैत्री दिनाची सुरुवात प्रथम अमेरिकेत झाली. नंतर हळूहळू इतर देशांत ही प्रथा सुरू झाली. या मैत्री दिनाची लोकप्रियता

लक्षात घेऊन संपूर्ण जगभरातील माणसांमध्ये मैत्रीची भावना निर्माण व्हावी यासाठी धर्म आणि वर्णद्वेष न बाळगता संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय 'मैत्री' दिनाची घोषणा केली. सोशल नेटवर्किंग साइटमुळे जगभरात मैत्री दिनाचा विशेष प्रसार झाला. आता हा दिवस तरुण-तरुणींचा अतिशय आवडता बनला आहे.

मैत्रीला जात, धर्म, वय, भाषा, आर्थिक स्तर किंवा देशाची सीमा यांची मर्यादा नसते. मैत्रीच्या धाग्याची व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवर आपण जेवढी अधिक गुंफण करू तेवढी संपूर्ण मानवजातीला ती लाभदायक ठरेल. मैत्रीची भावना खूप सुंदर, नाजूक आणि तरल असते. मैत्रीचे नाते निर्मळ, शुद्ध, सात्त्विक स्तरावरच राहू द्यावे; त्याला कोणत्याही रूढनात्यामध्ये बांधण्याचा प्रयत्न करू नये. मैत्रीमुळे मानवी मूल्ये जपली जातात. मैत्री त्या त्या माणसाला, परस्परांना समृद्ध करते. त्यातून साहचर्य वृद्धिंगत होते.

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. तो फार काळ एकटा राहू शकत नाही. आपल्या दैनंदिन जीवनातील सुख-दु:खाचा क्षण, अनुभव कुणाबरोबर तरी वाटून घ्यावा, असे त्याला वाटते; त्यामुळे सुखाच्या क्षणी आनंदात भर पडते आणि दु:खाची तीव्रता कमी होते. अशा चांगल्या माणसांशी मैत्र (मग ते पुरुष असोत की स्त्री) अभंग असते. वय वाढते तसे संदर्भ बदलतात; पण मैत्री उत्तरोत्तर दृढहोत जाते. मैत्रीच्या नात्यात असतो एकमेकांबद्दल जिव्हाळा, प्रेम आणि परस्परांवर अपार विश्वास. कोणत्याही संकटात किंवा दु;खात तसेच आनंदात अथवा सुखाच्या प्रसंगीसुद्धा मित्र-मैत्रिणींची आठवण येते. या संदर्भात एक चारोळी खरोखर दिलासा देणारी वाटते.

**मैत्री असते ढाल । दु:ख अन् संकटात धाव झेलणारी ।।**
**मैत्री असते शाल । सुख अन् आनंदात मायेची ऊब देणारी ।।**

निखळ मैत्री कुठेही, कधीही होऊ शकते. आपले आई-वडील मित्रच असतात. कारण ते आपल्यावर विश्वास ठेवून, आपल्याला

समजून घेतात; आपल्या पाठीशी उभे राहून सदैव चांगले मार्गदर्शन करतात.

'व्यसने मित्र परीक्षा' या वचनाचा संस्कृत श्लोक आहे. संकटात, अडचणीच्या प्रसंगी मदतीला धावून येतो, उपयोगी पडतो, तोच खरा मित्र या अर्थाचा इंग्रजीतील 'फ्रेंड इन नीड इज अ फ्रेंड इन्डीड' हा सुविचारही सर्वज्ञात आहे.

मैत्री केवळ माणसांशीच नव्हे तर निसर्ग, पशू-पक्षी, पुस्तके (उत्तमोत्तम ग्रंथ) मग त्यात लेखन / वाचनही आलेच! नामस्मरण आणि अगदी स्वत:शीसुद्धा करता येते. निसर्ग माणसाचा खराखुरा मित्र आहे. तो आपल्याला जीवनावश्यक गोष्टी (हवा, अन्न, पाणी वगैरे) तर भरभरून देतोच; शिवाय त्याच्या सान्निध्यात जीवनातील ताणतणाव अन् चिंतांचा काही काळ तरी आपल्याला विसर पडतो. आपण सदा आनंदी, ताजेतवाने, टवटवीत राहातो.

सध्याच्या धावपळीच्या, जीवघेण्या स्पर्धेच्या धकाधकीच्या दिवसांत आपल्या आवडत्या देवाचे (गॉड) सतत जाणीवपूर्वक, श्रद्धायुक्त अंत:करणाने नामस्मरण करणे हादेखील मैत्रीचा आदर्श प्रकार ठरतो; त्यामुळे सद्विचार निर्माण होतात. सैरभैर मनाला शांती लाभते, असा अनेकांचा अनुभव आहे. म्हणून अनेक संतांनी सदैव देवाचे नाम घ्या, असा उपदेश केला.

'ग्रंथ हेच मित्र' हे सुवचन लक्षात घेऊन, पुस्तकांशी साधलेला प्रेमळ मन संवाद म्हणजे अक्षरे आणि शब्दांशी केलेली मैत्रीच होय. समर्थ रामदासांनी लेखनाबरोबरच 'प्रसंगी अखंडित वाचीत जावे...' असे म्हटले आहे. पुस्तक वाचनामुळे आपला वेळ छान जातो, एकटेपणाबरोबरच दु:खाचाही विसर पडतो. मनोरंजन तर होतेच, शिवाय ज्ञानातही भर पडते,

स्वरांशी, सुरांशी आणि काललयीशीसुद्धा छान मैत्री होऊ शकते, संगीत साधनेतून मिळणारा अपार आनंद अवर्णनीय असतो. बहुधा म्हणूनच कवीने 'मैत्री असतो एक हुंकार, सप्तसुरांचा झंकार' असे म्हटले असावे.

स्वत:वर प्रेम करणे, स्वत:शी संवाद साधणे यातून स्वत:शीच मैत्री केली तर तुमचा कोणताही निर्णय जग काय म्हणेल यावर अवलंबून असणार नाही. स्वत:शी आपण ठाम राहू. दोन मनांपैकी चांगला विचार करणाऱ्या मनाचा सल्लाच आपण सदैव अमलात / कृतीत आणू. असा सकारात्मक बदल घडून येण्यासाठी आपण नेहमी स्वत:शी संवाद साधून स्वत:ला ओळखायला हवे. आपले आपल्याशी मैत्रीचे नाते जोडायला पाहिजे.

चांगला मित्र / मैत्रीण मिळणे हे भाग्याचे लक्षण आहे आणि ती टिकणे, परस्परांनी मैत्री टिकून राहाण्यासाठी प्रयत्न करणे ही आयुष्याची फलश्रुती आहे. 'मैत्री दिन' अर्थात 'फ्रेंडशिप डे' साजरा करायला हरकत नाही; परंतु ती मनातून, मनापासून असावी. जबरदस्तीने केलेली असू नये. प्रतीक म्हणून असले तरी संध्याकाळी किंवा फार तर दुसऱ्या दिवशी कचऱ्याची भर करणाऱ्या बँडचा (बंधन) देखावा कशाला हवा, असे मनात आल्यावाचून राहात नाही. मैत्रीचे बंध प्रेम, विश्वास आणि सौहार्दावर आधारलेले असतात. श्रीकृष्ण-सुदामा तसेच श्रीकृष्ण-अर्जुन हे मैत्रीचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल.

दुसऱ्यावर निरपेक्ष भावनेतून प्रेम केले तर त्याच्या शतपट प्रेम तुम्हाला न मागता मिळेल, हेच निखळ मैत्रीचे तत्त्व आणि अंतिम सत्य आहे. आयुष्याच्या प्रवासात आपल्याला पावलोपावली खऱ्या मित्राची गरज भासते; त्यामुळे आपण सर्वजण एकमेकांचे चांगले मित्र होऊ आणि प्रत्येक दिवशी 'मैत्री दिन' साजरा करू या!

**– उदय हर्षे**



# उपक्रम

# दिनविशेष

दिसामाजि काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडित वाचित जावे।।

- श्री स्वामी समर्थ रामदास

* वाचकांसाठी सुवर्णसंधी *
'करा मैत्री पुस्तकांशी'
'मेहता पब्लिशिंग हाऊस' चा
नवीन उपक्रम
१७ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०१६
दरम्यानचा दिनविशेष

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा
या ईमेलवर पाठवा.
authors@mehtapublishinghouse.com

## दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर

# ४० टक्क्यांपर्यंत सूट

***१७ ऑगस्ट - अभिनेता सचिन पिळगांवकर यांचा जन्मदिन***

*'हाच माझा मार्ग' या सचिन पिळगांवकर लिखित पुस्तकावर विशेष सवलत.*
*मूळ किंमत - ४५०/-*
*१७ ऑगस्ट ते २० ऑगस्टपर्यंत.*

**सवलत किंमत**
**२९९/-**

***१८ ऑगस्ट - कवी गुलज़ार यांचा जन्मदिन***

*'त्रिवेणी', 'रावीपार', '१०० संस्मरणीय गीते' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.*
*संचाची मूळ किंमत - ६९०/-*
*१८ ऑगस्ट ते १९ ऑगस्टपर्यंत.*

**सवलत किंमत**
**४२८/-**

***१९ ऑगस्ट - ज्येष्ठ समाजसेविका सुधा मूर्ती यांचा जन्मदिन***

*'गोष्टी माणसांच्या, थैलीभर गोष्टी, सुकेशिनी, बकुळा, परीघ, वाइज ॲण्ड अदरवाइज, आयुष्याचे धडे गिरवताना, महाश्वेता, डॉलर बहू, आजीच्या पोतडीतल्या गोष्टी, अस्तित्व, पितृऋण' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.*
*संचाची मूळ किंमत - १६९०/-*
*१९ ऑगस्ट ते २३ ऑगस्टपर्यंत.*

**सवलत किंमत**
**१३८०/-**

**१९ ऑगस्ट -कॅनफिल्ड यांचा जन्मदिन**

'चिकन सूप'च्या २५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ५१७५/-**

१९ ऑगस्ट ते २१ ऑगस्टपर्यंत.

**सवलत किंमत २९९९/-**

**२० ऑगस्ट - नारायण मूर्ती यांचा जन्मदिन**

'अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड,
नारायण मूर्ती : मूल्यं जपणारं
एक अद्वितीय आयुष्य'
पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३७०/-**

२० ऑगस्ट ते २२ ऑगस्टपर्यंत.

**सवलत किंमत २२२/-**

**२५ ऑगस्ट - तसलिमा नासरीन यांचा जन्मदिन**

'लज्जा, फेरा, निर्बाचित कलाम, नष्ट मेयेर नष्ट गद्य, निर्बाचित कविता, आमार मेयेबेला, उधाण वारा, फरासि प्रेमिक'
यांच्या या अनुवादित
पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १५२५/-**

२५ ऑगस्ट ते २७ ऑगस्टपर्यंत.

**सवलत किंमत ८९९/-**

**२५ ऑगस्ट - फ्रेडरिक फोर्सिथ यांचा जन्मदिन**

'द फिस्ट ऑफ गॉड, द अफगाण, नो कम बॅक्स' यांच्या या अनुवादित पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १०४५/-**

२५ऑगस्ट ते २८ ऑगस्टपर्यंत

**सवलत किंमत ५९९/-**

## ३१ ऑगस्ट - शिवाजी सावंत यांची जयंती

'छावा, मृत्युंजय, युगंधर, मोरावळा, शेलका साज' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत –१६६०/-**

३१ऑगस्ट ते ४ सप्टेंबरपर्यंत.

**सवलत किंमत ९९९/-**

## २ सप्टेंबर - नसिमा हुरजूक यांचा जन्मदिन

'चाकाची खुर्ची' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत – २३०/-**

२ सप्टेंबर ते ५ सप्टेंबरपर्यंत.

**सवलत किंमत १३९/-**

## ५ सप्टेंबर - शिक्षक दिन

'टु सर विथ लव्ह, चिकन सूप फॉर द सोल इंडियन टीचर्स' या दोन पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – ४४०/-**

५ सप्टेंबर ते ६ सप्टेंबरपर्यंत.

**सवलत किंमत २७९/-**

## ८ सप्टेंबर - लीना सोहोनी यांचा जन्मदिन

'अ प्रिझनर ऑफ बर्थ, आजीच्या पोतडीतील गोष्टी,
अमरगीत : बाबा आमटे यांचे जीवन चरित्र,
आयुष्याचे धडे गिरवताना, बकुळा,
कॅट ओ' नाइन टेल्स, देव जो भूवरी चालला,
गोष्टी माणसांच्या, इंदिरा, इट्स ऑलवेज पॉसिबल,
केन अॅण्ड एबल, लज्जा, नॉट विदाऊट माय डॉटर,
ओन्ली टाइम विल टेल, पुण्यभूमी भारत,
सोनिया गांधी, सुकेशिनी आणि इतर कथा,
थैलीभर गोष्टी, द अॅक्सिडेंटल प्राइम मिनिस्टर,

**सवलत किंमत ३९९९/-**

द गेस्ट ऑफ ऑनर, द सिन्स ऑफ फादर,
टु कट अ लाँग स्टोरी शॉर्ट, टु सर विथ लव्ह, तुरुंगातील सावल्या, व्हॉट वेंट राँग अ‍ॅण्ड व्हाय,
वाइज अँड अदरवाइज'
या त्यांच्या अनुवादित
पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत – ६८९५/-
८ सप्टेंबर ते ९ सप्टेंबरपर्यंत.

**८ सप्टेंबर - जागतिक साक्षरता दिन**

'स्टोन्स इनटू स्कूल, थ्री कप्स ऑफ टी,
मी मलाला' या अनुवादित
पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ९९५/-
८ सप्टेंबर ते ९ सप्टेंबरपर्यंत.

**सवलत किंमत ५९९/-**

**१४ सप्टेंबर - कांचन घाणेकर यांचा जन्मदिन**

'नाथ हा माझा' या पुस्तकावर विशेष सवलत.
मूळ किंमत - ३००/-
१४ सप्टेंबर.

**सवलत किंमत १५०/-**

**१५ सप्टेंबर - जागतिक लोकशाही दिन**

'पहिली फेरी, वादळमाथा ते १९६५ भारत पाक युद्ध, फ्रिडम अ‍ॅट मिडनाइट, लढा लोकपालचा : उद्रेक आम आदमीचा, मोहनदास, महात्मा गांधी आणि तीन माकडे'

या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - २१८५/-
१५ सप्टेंबर ते १८ सप्टेंबरपर्यंत.

**सवलत किंमत १०९९/-**

'रॉबर्ट रोटेनबर्ग' इ. अनिल काळे यांनी केलेल्या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.
३ ऑगस्ट ते ५ ऑगस्टपर्यंत.

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
website : www.mehtapublishinghouse.com

**आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके online खरेदी करा**
**www.mehtapublishinghouse.com**

**e-books** **आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके आता** Computer, i-pad **आणि** Tab **वर वाचा.**
**play.google.com/store/books ● m.dailyhunt.in/Ebooks/marathi**

**मेहता मराठी ग्रंथजगत (Digital Edition)**
पाच वर्षांचे सभासद व्हा आणि आमच्या सर्व पुस्तकांवर ३०% सवलत मिळवा. वर्गणी - ४०० रुपये.(स्वामी सोडून)

**T-Book Club**
TBC ची मेंबरशीप घ्या. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा.

मेहता पब्लिशिंग हाऊस • : 9422046575 • sales@mehtapublishinghouse.com

# साहित्य वार्ता

## ✍ पाच कोटींचा निधी वापराविना पडून

प्राच्यविद्या क्षेत्रात जागतिक कीर्ती मिळविलेल्या आणि शताब्दी वर्षात नुकतेच पदार्पण केलेल्या पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेला (बोरी) केंद्र सरकारने २००७मध्ये दिलेल्या पाच कोटी रुपयांच्या विशेष निधीचा आठ वर्षांनंतरही वापर करता आलेला नाहा; मात्र हे शताब्दी वर्ष संपण्याच्या आतच वसतिगृह वगळता उर्वरित प्रकल्प पूर्ण करण्याचा मनोदय संस्थेच्या व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

''पाच कोटी रुपयांचा निधी संस्थेकडे पडून आहे, हे खरे आहे; पण कायदेशीर आणि तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यात खूप वेळ गेला. अतिशय चिकाटीने प्रयत्न करून आम्ही जमिनीच्या मालकीची कागदपत्रे मिळविली आहेत. फेरआराखड्यास केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाची परवानगी मिळवून आता सभागृह बांधण्याचे काम सुरू केले आहे. निजाम गेस्ट हाऊसचे काम यापूर्वीच पूर्ण झाले आहे. त्यामुळे झालेला विलंब भरून काढण्यासाठी वसतिगृह वगळता प्रकल्पातील अन्य सर्व कामे ६ जुलै २०१७च्या आत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आम्ही डोळ्यासमोर ठेवले आहे,'' अशी माहिती संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन आणि मानद सचिव डॉ. श्रीकांत बहुलकर यांनी दिली.

तत्कालीन अर्थमंत्री पी. चिदम्बरम यांनी २००७-०८च्या अर्थसंकल्पात या ख्यातनाम संस्थेसाठी पाच कोटी रुपयांचा विशेष निधी जाहीर केला होता. त्यानंतर तो संस्थेकडे त्वरित जमाही करण्यात आला; मात्र 'बालभारती' या सरकारी संस्थेबरोबरील जमिनीची अदलाबदल करण्याची प्रक्रिया फार वेळखाऊ होती. जमिनीची कागदपत्रे हातात नसल्याने सर्व प्रक्रियाच खोळंबली. त्यातच ज्यांना काम दिले, त्या सार्वजनिक बांधकाम खात्याने अक्षम्य हेळसांड केली. परिणामी, गेल्या आठ वर्षांत फक्त निजाम गेस्ट हाऊसची रंगरंगोटी पूर्ण होऊ शकली आहे. त्यासाठी ५२ लाख १९ हजार रुपये खर्च आला आहे; मात्र त्याचे निधी वापर प्रमाणपत्र संस्थेने सांस्कृतिक मंत्रालयाला अद्याप सादर केलेले नाही.

थोर अभ्यासक सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या नावाने सुरू झालेल्या या संस्थेमध्ये १८ हजार प्राचीन हस्तलिखिते, तसेच भारतीय व युरोपियन भाषांतील सुमारे सव्वा लाख पुस्तके यांचा दुर्मीळ ठेवा आहे. राष्ट्रीय संस्थेचा दर्जा मिळविण्याची संस्थेची आकांक्षा आहे.
शताब्दी वर्षामध्ये संस्थेने संग्रहालय उभारण्याचा भव्य प्रकल्प हाती घेतला आहे. हा प्रकल्प सुमारे शंभर कोटी रुपयांचा असेल. त्यासाठी उद्योगपती अभय फिरोदिया यांनी एक कोटी रुपयांची देणगीही जाहीर केली आहे. केंद्रीय मंत्री महेश शर्मा यांच्यासमोर या प्रकल्पाचे सादरीकरण नुकतेच झाले आहे.

## ✍ द्वैभाषिक पुस्तक खरेदी

द्वैभाषिक पुस्तक खरेदी योजनेस पंधरवड्याची मुदतवाढजाहीर झाली असली, तरी ही सारी योजना एका विशिष्ट प्रकाशकासाठीच राबवण्यात येत असल्याचे उघड झाले आहे.
सुमारे सव्वाशे कोटी रुपयांची ही पुस्तक खरेदी करताना प्रकाशकांना पुरेसा अवधीच मिळू नये, असा बंदोबस्त करण्यात आला आणि एवढ्या कमी काळात राज्यातील कोणताही प्रकाशक द्वैभाषिक पुस्तके सरकारसमोर सादर करू शकणार नाही, याची पुरेपूर काळजी घेण्यात आली होती. त्यामुळे एकाच प्रकाशकाने अवघ्या पंधरा दिवसांत अशी चारशे पुस्तके तयार करून सरकारला कशी सादर केली, असा प्रश्न प्रकाशन विश्वाला पडला आहे. दिल्लीस्थित एका प्रकाशकानेही अशी अनेक पुस्तके सादर केली असल्याचे समजते.
डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी, म्हणजे १५ ऑक्टोबर रोजी 'वाचन प्रेरणा दिवस' साजरा करण्याचा निर्णय घेताना पहिली ते आठवी इयत्तांमध्ये शिकणाऱ्या दीड कोटीहून अधिक विद्यार्थ्यांना दर दहांमागे एक या प्रमाणे द्वैभाषिक पुस्तके मोफत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. अशी पुस्तके राज्यातील प्रकाशक कधीच प्रसिद्ध करीत नाहीत. त्यामुळे अशी पुस्तके लेखकांकडून लिहून घेऊन, ती प्रकाशित करण्याचा त्यांना अनुभवही नाही. तरीही ही पुस्तके तयार करण्यासाठी त्यांना पुरेसा अवधी मिळूच नये, अशी व्यवस्था यासंबंधीच्या निविदेत केल्याचे उघड झाले आहे. एवढेच नव्हे, तर ही पुस्तके सरकारच्या शैक्षणिक संशोधन परिषदेने पूर्वीच मान्य

केली असली पाहिजेत, अशी अट यासंबंधीच्या निविदेत घालण्यात आली आहे. पंधरा दिवसांच्या अवधीत नवी पुस्तके तयार करून त्यांना मान्यता मिळवून ती या योजनेद्वारे पुरवणे कोणत्याही प्रकाशकास कधीही शक्य होणार नाही. विशिष्ट प्रकाशनाने अशी मान्यता आधीच घेऊन ठेवल्याशिवाय अशी अट या निविदेत घालणे अशक्य आहे.

या योजनेची निविदा कोणत्याही मोठ्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यात आली नव्हती. उलट सहसा प्रकाशक वळत नाहीत, अशा 'प्रिंटिंग, स्टेशनरी अँड गार्मेंट्स टेंडर न्यूज' या संकेतस्थळावर या पुस्तक खरेदीचे ई-टेंडर प्रसिद्ध करण्यात आले; मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात पुस्तके तयार करण्यासाठी मुदत अवघी पंधरा दिवसांचीच देण्यात आली. प्रकाशकांच्या हे लक्षात आल्यानंतर त्यांनी शक्य तेवढी पुस्तके तयार करण्यास सुरुवातही केली. देशातील कोणत्याही राज्य सरकारला अशा द्वैभाषिक पुस्तकांच्या किमान पन्नास हजार प्रती पुरवणाऱ्या प्रकाशक वा वितरक यांनाच या योजनेत भाग घेता येऊ शकतो, असेही निविदेत नमूद होते. शिक्षण खात्याच्या पुणे कार्यालयात संपर्क साधणाऱ्या प्रकाशकांना शेवटपर्यंत म्हणजे ९ जुलैपर्यंत कोणतीही माहिती मिळू शकली नाही. तेथील अधिकारी प्रशिक्षणामुळे जागेवरच नव्हते. त्यात सरकारी सुट्यांची भर पडली.


निविदेबरोबर वीस हजार रुपयांचा ना परताव्याचा डिमांड ड्राफ्ट जोडण्याचीही सक्ती होती. सादर केलेली पुस्तके संमत झाली नसती, तरीही ही रक्कम सरकारी तिजोरीत जमा होणार होती. अशी सक्ती कोणत्याही निविदेबाबत कधी केली जात नाही. केवळ याच खरेदीमध्ये ती कशी काय लागू करण्यात आली, असा प्रश्न यामुळे निर्माण झाला आहे.

द्वैभाषिक ग्रंथ खरेदीसाठीची पुस्तके इंग्रजी, हिंदी, मराठी या भाषांबरोबरच कन्नड, उर्दू, गुजराती, तेलुगू, तमिळ व सिंधी अशा अन्य भाषांमधूनही तयार करण्यात यावीत, असा निर्णय सरकारने घेतला होता. त्यानुसार त्या त्या विषयातील तज्ज्ञांना गाठून, त्यांच्याकडून अशी पुस्तके तयार करून घेऊन, ती प्रसिद्ध करण्यासाठी किमान काही महिन्यांचा कालावधी लागणे अभिप्रेत होते. असे असूनही एकाच प्रकाशकाने अवघ्या पंधरा दिवसांत ही पुस्तके कशी सादर केली, असा प्रश्न पडतो. त्यामुळे अशी पुस्तके आधीच तयार करून त्यासंबंधीची ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आल्याचा प्रकाशकाचा डाव असल्याचीच चर्चा आहे.

२री आवृत्ती

# मध्यस्थ

अनुवाद - **लीना सोहोनी**




**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

ऑक्सफोर्डशायरमधल्या एका गावरस्त्यावरून एका युवकाचे अपहरण हा अमेरिकेच्या अध्यक्षाला त्याच्या पदावरून हुसकावून लावण्याच्या, आत्यंतिक क्रूर अशा कारस्थान-नाट्यातील पहिला प्राणांतिक अंक होता. तो यशस्वीरित्या पार पाडला गेला, तर हा अध्यक्ष या अनपेक्षित धक्क्याने मानसिक आणि भावनिकदृष्ट्या खचून अकार्यक्षम होईल, हा एकमेव हेतू या अपहरणामागे होता.

हा दुर्दैवी प्रकार जगातील फक्त एकच व्यक्ती थोपवून धरू शकत होती– क्विन! अपहरणाच्या अशा प्रकारांमध्ये सातत्याने यशस्वी ठरलेला जगद्विख्यात मध्यस्थ. अपहरणकर्त्यांच्या मूळ हेतूविषयी अल्पांशानेही कल्पना नसताना या निष्पाप युवकाचे प्राण वाचवण्यासाठी स्वत:च्या आयुष्याची बाजी लावणारा मध्यस्थ.

या अपहरणनाट्याचा उलगडा होत असताना श्वास रोखून ठेवणाऱ्या औत्सुक्याने वाचक कधी कमालीचा उत्तेजित होतो, कधी आश्चर्याने चकित होतो, तर कधी अंगावर कोसळणाऱ्या तपशिलांमुळे गोठल्यासारखा होतो. फ्रेडरिक फॉर्सिथ या जागतिक कीर्तीच्या लेखकाने विलक्षण कौशल्याने विणलेली ही चित्तचक्षुचमत्कारिक कहाणी वाचताना थरारक अनुभवांमुळे तुम्ही पानापानांवर स्तंभित होणार आहात.

## ✍ ई-मेलद्वारे बेरोजगारांची फसवणूक

तुमच्या ई-मेलच्या 'इनबॉक्स'मधे बहुराष्ट्रीय कंपनीच्या लेटरहेडवर नोकरीची ऑफर असणारी मेल धडकते. त्यामध्ये तुमची कंपनीमध्ये निवड झाली असून, गलेलठ्ठ पगाराचे पॅकेज मिळाल्याची माहिती असते. नोकरीसाठी तुमची माहिती असणाऱ्या कागदपत्रांच्या छायाप्रती बरोबर बाळगा आणि त्याबरोबर आठ हजार रुपये संबंधित बँकेच्या खात्यात भरा किंवा चेक अथवा डीडी विशिष्ट पत्त्यावर पाठवा, असा मजकूर असतो. गलेगठ्ठ पगाराची नोकरी लागल्याच्या खुशीत तुम्ही मोठ्या विश्वासाने कागदपत्रे आणि पैसे आनंदाने पाठवता. मात्र, काही दिवसांनी 'त्या' कंपनीकडून नोकरीबाबत काहीच प्रतिसाद न आल्याने फसवणूक झाल्याचे तुमच्या लक्षात येते... शहरात नव्यानेच उदयाला आलेल्या जॉब कन्सल्टन्सींकडून नोकरी देण्याच्या बहाण्याने सुशिक्षित बेरोजगारांची राजरोस आर्थिक फसवणूक करण्याचा गोरखधंदा सुरू आहे. हा प्रकार सुरू असतानाच बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून नोकरीची आशा बाळगणाऱ्या बेरोजगारांची बनावट लेटरहेडवर जॉब ऑफर पाठवून आर्थिक फसवणूकही करण्यात येत आहे. विनासायास नोकरी मिळत असल्याचे पाहून बेरोजगारदेखील अशा प्रकारच्या तद्दन बोगस ई-मेल पाठविणाऱ्या ठकसेनांच्या जाळ्यात सापडत आहेत. अशाच प्रकारे ई-मेल पाठवणारी टोळी देशभर कार्यरत आहे.

या टोळीकडून इंजिनीअरिंग, ऑटोमोबाईल, व्यवस्थापन, आयटी अशा क्षेत्रातील बड्या कंपन्यांच्या नावाचा दुरुपयोग करण्यात येत आहे. बड्या कंपन्यांच्या नावाचे बोगस ऑफर लेटर तयार करून ई-मेलमार्फत बेरोजगारांना पाठवले जाते. लेटरमध्ये संबंधित बेरोजगाराची असिस्टंट मॅनेजर, प्रशासकीय, आयटी किंवा प्रॉडक्शन विभागात अधिकारी, अभियंते अशा विविध प्रकारच्या पदांसाठी निवड झाल्याचे सांगण्यात येते. ही नोकरी प्राप्त करण्यासाठी वैयक्तिक माहिती असणारी कागदपत्रे पाठविण्याविषयी बजावले जाते. सोबतच दोन हजार ते आठ हजार रुपये सुरक्षा ठेव म्हणून भरण्याविषयीही सांगितले जाते.

कंपनीचे ऑफर लेटर, पाच आकडी पगार, कंपनीमधे प्रत्यक्ष मुलाखतीसाठी विमानाने ये-जा करण्याची सोय, भरलेले पैसे परत मिळण्याची सोय आदी आमिषांमुळे बेरोजगार त्याला बळी पडतात.

## ✍ बेरोजगार अभियंत्यांना टार्गेट

नोकरीच्या शोधात असलेले विद्यार्थी किंवा बेरोजगार नोकऱ्या देणाऱ्या विविध कंपन्यांच्या वेबसाइटवर बायोडाटा अपलोड करतात. वेबसाइटच्या सुरक्षिततेची कोणतीही सुविधा नसल्यामुळे ती सहजरीत्या हॅकरच्या हातात पडते. या माहितीच्या आधारे संबंधित विद्यार्थी किंवा बेरोजगारांना त्यांना पाहिजे असणाऱ्या नोकरीची ऑफर कंपनीच्या बनावट लेटरहेडवर ई-मेल करण्यात येते. या प्रकारात सर्वाधिक फसवणूक बेरोजगार अभियंत्यांची होते. पुणे शहरात मोठ्या प्रमाणात कंपन्या आणि बेरोजगार असल्याने या टोळीने पुण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

ई-मेलचा इनबॉक्स तपासत असताना तीन मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या लेटरहेडवर ऑफर लेटर आल्याचे आढळले; मात्र नोकरीसाठी पैसे मागितल्याने त्याविषयी अन्यत्र चौकशी केली. त्यानंतर ते ऑफर लेटर म्हणजे शुद्ध फसवणूक असल्याचे समजले. त्यामुळे पैसे भरले नाहीत, असे अभियंता अजिंक्य खोत यांनी सांगितले.

## ✍ फेसबुक भाषेच्या बंधनापलीकडे

मनाच्या कुठल्या तरी कोपऱ्यात लपलेले काहीतरी अनेकांना सांगायचे असते. त्यासाठी सोशल मीडिया सहज उपलब्धसुद्धा आहे; परंतु ते संबंधितांपर्यंत त्यांच्या भाषेत पोहोचेल, अशी सोय अद्याप तरी हवी तशी उपलब्ध नाही. फेसबुक लवकरच ही अडचण दूर करणार आहे. त्यामुळे फेसबुक यूजर्सना आपली पोस्ट जवळपास ४५ भाषांमध्ये शेअर करता येणार आहे.

जगातील सर्वांत मोठे सोशल नेटवर्किंग आणि कोट्यवधी यूजर्स असलेल्या या साइटच्या डेव्हलपरनी 'मल्टिलिंग्वल कंपोजर' विकसित केला आहे. याद्वारे यूजरला एका भाषेतील पोस्ट अनेक भाषांमध्ये भाषांतरित करण्याची सुविधा मिळणार आहे. फेसबुकचे जवळपास ५० टक्के यूजर्स इंग्रजीव्यतिरिक्त इतर भाषा बोलतात. यातील अनेकांना परस्परांची भाषा बोलता, वाचता येत नाही. त्यांची ही अडचण दूर करण्याचा प्रयत्न म्हणजे हे 'मल्टिलिंग्वल कंपोजर' असल्याचे फेसबुक टीमने आपल्या ब्लॉग पोस्टमध्ये नमूद केले आहे.

यासंबंधीची चाचणीसुद्धा फेसबुकने सुरू केली आहे. या टेस्ट ग्रुपमधील

सदस्य त्यांच्या अकाउंट सेटिंगमध्ये भाषा विभागात जाऊन हा कंपोजर सिलेक्ट करू शकतात.

'मल्टिलिंग्वल कंपोजर' यामध्ये यूजर एका भाषेत पोस्ट टाइप करून ती अन्य भाषांमध्ये पब्लिश करू शकतो. उदाहरणार्थ, एखादी पोस्ट इंग्रजीत टाइप केली; पण ती फेसबुकवरील स्पॅनिश मित्रासोबत शेअर करायची असल्यास केवळ 'मल्टिलिंग्वल कंपोजर' मधील स्पॅनिश भाषा सिलेक्ट करायची. मग ती पोस्ट आपोआप स्पॅनिशमध्ये भाषांतरित होईल. अशा प्रकारे एक पोस्ट एकाच वेळी अनेक भाषांमध्ये भाषांतरित करता येणार आहे.

## ✍ 'यूपीए'चाही होता गव्हर्नरांवर दबाव

रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डी. सुब्बाराव यांनी अखेर मौन सोडले असून, तत्कालीन यूपीए सरकारमधील दोन अर्थमंत्र्यांशी असणाऱ्या कटू संबंधांची प्रथमच जाहीर कबुली दिली आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली या सरकारने आपल्या मर्जीप्रमाणे आर्थिक धोरणे ठरविण्यासाठी आपल्यावर दबाव टाकल्याचा आरोप सुब्बाराव यांनी केला आहे.

सुब्बाराव यांनी आरोपांमध्ये विद्यमान राष्ट्रपती आणि तत्कालीन अर्थमंत्री प्रणव मुखर्जी आणि पी. चिदंबरम यांच्यावर निशाणा साधला आहे. देशातील गुंतवणूक वाढावी, यासाठी या दोघांनी आपापल्या कार्यकालात माझ्यावर व्याजदरात घट करण्यासाठी प्रचंड दबाव टाकला; मात्र तत्कालीन महागाईची परिस्थिती पाहता व्याजदर कमी करण्याऐवजी ते वाढविण्याची आवश्यकता होती, असे सुब्बाराव यांनी म्हटले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार वरील सर्व प्रसंगांचा उल्लेख सुब्बाराव यांनी आपल्या आगामी 'हू मूव्ह्ड माय इंटरेस्ट रेट?' या पुस्तकात केले आहे. हे पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

मुखर्जी आणि चिदंबरम यांचे दबावतंत्र भिन्न पद्धतीचे होते, असेही सुब्बाराव यांनी म्हटले आहे. २०१३मध्ये यूपीए सरकारची पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर सुब्बाराव आणि या दोन आजी-माजी अर्थमंत्र्यांमधील संबंध विकोपाला गेले होते. विकासाला संजीवनी देण्यासाठी रिझर्व्ह बँकेने व्याजदरात कपात करण्याची आवश्यकता आहे, अशी मुखर्जी यांची भूमिका होती, असेही सुब्बाराव म्हणतात. चिदंबरम यांची पद्धती थोडीशी वेगळी होती. ते करीत असलेल्या राजकोषीय एकत्रीकरणाच्या (फिस्कल कन्सॉलिडेशन) प्रयत्नांना पाठबळ म्हणून मी व्याजदर घटवावेत, अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र, मी

व्याजदर कमी करण्यास नकार दिल्यावर त्यांनी माझ्या या निर्णयाची जनतेसमोर जाहीर खिल्ली उडवली होती, असाही अनुभव रिझर्व्ह बँकेच्या माजी गव्हर्नरांनी पुस्तकात दिला आहे. एकीकडे विकासाचे धोरण अवलंबत असताना जर केंद्र सरकारला एकट्यानेच प्रयत्न करावे लागत असतील तर तेही करायची आमची तयारी आहे, असे विधान चिदंबरम यांनी केले होते.

स्वभावाने शांत आणि मनमोकळ्या वाटणाऱ्या प्रणवदांचा वेगळा अंदाज आपल्याला वेळोवेळी अनुभवायला मिळाल्याचे सुब्बाराव यांनी म्हटले आहे. बहुसंख्य वेळा प्रणव मुखर्जी यांनी आपली रिझर्व्ह बँकेबाबत असणारी नाराजी जाहीरपणे व्यक्त केली आहे. बँकेवर आपली नाराजी दर्शविण्याच्या विविध पद्धती असतात; पण माझ्यावर नाराजी व्यक्त करताना तत्कालीन यूपीए सरकारने डेप्युटी गव्हर्नरांच्या नेमणुकांबाबत मी दिलेल्या निर्देशांच्या बरोबर उलट भूमिका घेतली, असेही सुब्बाराव यांनी पुस्तकात नमूद केले आहे.

## ✍ देशात नोकरीसाठी 'गूगल' सर्वोत्तम

भारतामध्ये आपल्या कर्मचाऱ्यांना सर्वोत्तम सेवा देणाऱ्या कंपन्यांमध्ये 'गूगल' ने अग्रस्थान पटकावले आहे. 'इकॉनॉमिक टाइम्स'ने केलेल्या सर्वेक्षणामध्ये 'गूगल इंडिया' ही भारतातील कर्मचाऱ्यांसाठी सर्वोत्तम कंपनी ठरली असून, 'अमेरिकन एक्स्प्रेस' कंपनीने दुसरा क्रमांक पटकावला आहे.

२०१५मध्ये 'गूगल इंडिया' या यादीत दुसऱ्या स्थानी होती. या वर्षी कंपनीने एका स्थानाने प्रगती केली आहे. गूगल आपल्या कर्मचाऱ्यांना स्पा, मसाज यांसारख्या सुविधा देत असल्याचेही या सर्वेक्षणात स्पष्ट झाले आहे. दुसऱ्या स्थानावर 'अमेरिकन एक्स्प्रेस' ही अमेरिकेची क्रेडिट कार्ड कंपनी आहे. मागील वर्षीच्या तुलनेत कंपनीने दोन स्थानांनी झेप घेतली आहे. 'उज्जीवन फायनान्शियल सर्व्हिसेस' या भारतीय कंपनीने तिसरे स्थान पटकावले असून,मागील वर्षीपेक्षा या कंपनीने तब्बल २४ स्थानांनी झेप झेतली आहे.

या सर्वेक्षणामध्ये ७९१ कंपन्यांनी सहभाग घेतला होता आणि तब्बल १.५५ लाख कर्मचाऱ्यांची मते विचारात घेण्यात आली. भारतात अशा प्रकारे केले गेलेले हे सर्वांत मोठे सर्वेक्षण आहे. पहिल्या दहा क्रमांकांमध्ये मॅरियट, ओबेरॉय आणि लेमन ट्री या हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील कंपन्यांनीही स्थान पटकावले आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातील सॅप लॅब्ज आणि इंट्यूट प्रॉडक्ट

डेव्हलपमेंट सेंटर, ग्राहकोपयोगी वस्तू उत्पादन क्षेत्रातील गोदरेज कन्झ्युमर प्रॉडक्ट्स आणि कॉल सेंटर क्षेत्रातील टेलिपरफॉर्मन्स इंडिया या कंपन्यांनीही या यादीत पहिल्या दहामध्ये स्थान मिळवले आहे.

नोकरीसाठी भारतातील सर्वोत्तम दहा कंपन्या :

गूगल इंडिया,
अमेरिकन एक्स्प्रेस इंडिया,
उज्जीवन फायनान्शियल सर्व्हिसेस,
टेलिपरफॉर्मन्स इंडिया,
गोदरेज कन्झ्युमर प्रॉडक्ट्स,
मॅरियट हॉटेल्स इंडिया,
सॅप लॅब्ज इंडिया,
ओबेरॉय समूह,
लेमन ट्री हॉटेल्स,
इंट्यूट इंडिया प्रॉडक्ट डेव्हलपमेंट सेंटर.

## ✍ ‘उद्ध्वस्त’चे अभिवाचन

शाहीर अमर शेख यांची कन्या, नामदेव ढसाळ यांच्या पत्नी मल्लिका अमर शेख यांच्या ‘मला उद्ध्वस्त व्हायचंय’ या आत्मचरित्राचं अभिवाचन उपस्थितांना रोमांचित अनुभव देऊन गेले.

‘आसक्त’च्या वतीने सुदर्शन रंगमंच येथे आयोजित ‘रिंगण’ या मैफलीत अभिवाचनातून मल्लिका आणि ढसाळ यांचं सहजीवन, दलित पँथर चळवळीच्या दरम्यानच्या घडामोडी स्पष्ट केल्या आहेत.

ढसाळ यांनी ‘गोलपीठा’तून काव्यरूपात व्यक्त केलेली आपली जीवनगाथाही काही कवितांतून सादर करण्यात आली. ‘माझ्या स्वप्नांचं घरटं शाबूत ठेवणारं एकही झाड उरलं नाही किती बरं वर्ष झाली…?
माझ्या तारुण्याचं रेशमी वस्त्र चोचीत घेऊन
माझा प्रियकर केव्हाच उडून गेला…’ या अभिवाचनात अभिनेत्री मधुरा वेलणकर-साटम, कल्याणी मुळे, अभिनेता नचिकेत पूर्णपात्रे आणि दिग्दर्शक समीर विद्वांस यांचा सहभाग होता.

**२री आवृत्ती**


लाखोंना स्वत:च्या क्षमतेची
खरी जाणीव करून देण्यास उद्युक्त करणाऱ्या
यशस्विनींच्या अंतरंगांचे मनमोहक दर्शन!

# आघाडीचे महिला नेतृत्व

मूळ लेखक - **सुधा मेनन**

अनुवाद - **सुमिता बोरसे**

**किंमत : २८०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**



आता ती केवळ... राबणारी बिनचेहऱ्याची बाई राहिलेली नाहीतर ती स्वत:चे हक्क असलेली स्वतंत्र नागरिक आहे.
केवळ घरकाम, मोलमजुरीच नव्हेतर उद्योगसमूहाची अध्यक्षा... बँकेची व्यवस्थापिका... प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्ती... ते उत्कृष्ट कलाकार अशा विविध कार्यक्षेत्रांत तिने आपल्या कर्तृत्वाचा 'कॅन्व्हॉस' चितारला आहे.
अनु आगा... लीला पूनावाला... मेहेर पद्‌मजी... किरण मुझुमदार-शॉ... यांच्यासारख्या प्रथितयश उद्योजिका!
शुभा मुद्‌गल, मल्लिका साराभाई यांच्यासारख्या कलाकार!
शिखा शर्मा... नैना किडवाई... प्रिया पॉल... यांच्यासारख्या यशस्विता आणि सुवर्णकन्या पी.टी. उषा...
यांच्या यशोगाथांचा हा आलेख!

## ✍ 'सलमानचे उद्गार असंवेदनशील'

'सुलतान'च्या शूटिंगनंतर मला बलात्कारपीडित महिलेसारखे वाटत होते,' या अभिनेता सलमान खान याच्या विधानावर आमीर खान यानेही नापसंती व्यक्त केली आहे. 'सलमानचे हे उद्गार असंवेदनशील आणि दुर्दैवी आहेत,' असे मत आमीरने व्यक्त केले.

'सलमानने जे उद्गार काढले, ते ऐकायला मी तिथे प्रत्यक्ष उपस्थित नव्हतो, मात्र मीडियामध्ये आलेल्या बातम्यांवरून मला ते निश्चित असंवेदनशील वाटले,' असे आमीर म्हणाला. याच कार्यक्रमात त्याने, 'सलमान आणि शाहरुख खान हे निश्चितच माझ्यापेक्षा मोठे स्टार्स आहेत. अमितजी सुपरस्टार आहेत यात वादच नाही,' असेही स्पष्ट केले.

## ✍ डॉ. आंबेडकरांवरील ग्रंथ 'थ्रीडी' रूपात

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि दलितोद्धारक नेते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना केवळ एका चौकटीत न बसवता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, विचारांचा आणि कार्याचा सर्वांगाने वेध घेणारा ग्रंथ त्रिमितीय चित्ररूपात (थ्रीडी) पुण्याच्या कलादत्त प्रकाशनतर्फे साकारला जात आहे. 'सृजन कॉलेज ऑफ डिझाइन' संस्थेतील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, आंबेडकरांच्या ग्रंथासाठी त्रिमितीय चित्रे साकारली जाणार आहेत. त्यामुळे या ग्रंथातून तो काळ जिवंत होण्यास मदत होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वातंत्र्य लढ्यापासून कसे दूर राहिले आणि ते कसे केवळ दलितोद्धारक नेते होते, या विषयावर अनेक वर्षांपासून मंथन सुरू आहे. याच साच्यात आंबेडकरांना आजही बसवले जाते. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलूंकडे दुर्लक्ष केले जाते. एक उदाहरण घेऊन सांगायचे झाल्यास मुंबई विद्यापीठातून राज्यशास्त्राची पदवी, त्यानंतर अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठ आणि इंग्लंडमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून डी.एस्सी., एम.ए., पीएच.डी, एलएल.बी., बार ॲट लॉ यासारखे उच्चतम शिक्षण घेतलेले डॉ. आंबेडकर थोर संत गाडगेबाबा यांना गुरुस्थानी मानत, त्यांचे कीर्तन ऐकायला जात. राष्ट्रविषयक, समाजविषयक, धर्मविषयक, स्त्रीविषयक दृष्टिकोन, गौतम बुद्ध व बौद्ध धर्म अशा विविध विषयांवर चर्चा करत, त्यांचा सल्ला घेत. यासारख्या बाबींकडे दुर्लक्ष केले जात असल्याने, अशाच बाबींचा वेध या ग्रंथात घेतला जाणार

आहे, असे कलादत्त प्रकाशनाचे संचालक सुरेश नाशिककर यांनी सांगितले. सृजन कॉलेज ऑफ डिझाइन संस्थेचे संचालक आणि लेखक संतोष रासकर आणि त्यांचे विद्यार्थी या प्रकल्पावर काम करत आहेत. हाताने रेखाटलेल्या चित्रांना थ्रीडी इफेक्ट (त्रिमितीय परिमाण) देण्याचे काम आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने केले जाते. ॲनिमेटेड प्रकारातील 'ग्रे स्केल'मध्ये हे पुस्तक तयार केले जात असून, हे इफेक्ट पाहण्यासाठी पुस्तकाबरोबर थ्रीडी चष्मा दिला जाईल. येत्या काही महिन्यांत हा ग्रंथ प्रकाशित करण्याचा मानस असल्याचे नाशिककर यांनी सांगितले.

## ✍ दुर्ग ग्रंथ प्रदर्शन

दुर्गमहर्षी गो.नी.दांडेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त इतिहासप्रेमी मंडळातर्फे 'दुर्ग ग्रंथ प्रदर्शन' भरविले होते. त्याचे उद्‌घाटन दुर्ग अभ्यासक प्रमोद मांडे यांच्या हस्ते झाले. प्रा. वीणा देव, प्रा. विजय देव, इतिहासप्रेमी मंडळाचे मोहन शेटे, धनंजय बर्वे आदी उपस्थित होते.

या प्रदर्शनात किल्ल्यांवरील ३५० पुस्तके मांडली होती. तेरा विभागांतील या पुस्तकांमध्ये संदर्भ ग्रंथ, प्रवासवर्णन, काव्य, स्मरणिका, कादंबऱ्या, पीएचडीचे प्रबंध, बालविभाग, नकाशे, फोटो व विशेषांक इत्यादींचा समावेश आहे. दोनशे वर्षांपासून आजपर्यंत प्रकाशित झालेल्या पुस्तकांचा यात समावेश होता.

किल्ल्यांशी संबंधित एक पैशाचे दुर्मिळ पुस्तक... १८६२ पासूनचे इंग्रजी-मराठी भाषेतील महत्त्वाचे ग्रंथ... ऐतिहासिक व भौगोलिक माहिती उलगडणारी पुस्तके... इत्यादी दुर्मीळ ग्रंथांचे भांडारच बघायला मिळाले.

## ✍ 'पोकेमॉन गो'

कार्टून्सच्या माध्यमातून लोकप्रिय झालेल्या पोकेमॉनने पुन्हा एकदा जगाला वेड लावले आहे. सुपर मारियो गेम बनवणाऱ्या निनटिंडो कंपनीने स्मार्टफोनची मदत घेत बनवलेला 'पोकेमॉन गो' गेम लोकप्रियतेच्या बाबतीत ट्विटर, स्नॅपचॅटसारख्या ॲप्सनाही टक्कर देणारा आहे.

अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये लाँच झालेला हा गेम लहानांबरोबर मोठ्यांनाही आवडतो. रिॲलिटीचा टच दिल्याने यूजर्स त्यामध्ये गुंतून जातात.

पोकेमॉन गेममध्ये जीपीएस आणि घड्याळाचा वापर करताना आजूबाजूला कोणते पोकेमॉन आहेत याचे नोटिफिकेशन येते. त्या ठिकाणी जाऊन ते पोकेमॉन कॅच करायचे. उदा. पाण्याच्या आजूबाजूला तुम्हाला वॉटर स्पोर्टवाले, तर बगीच्यांमध्ये जमिनीवरील पोकेमॉन दिसतात. या गेममध्ये ऑगमेंटेड रिॲलिटी वापरण्यात आली आहे. स्क्रीनवर दिसणारा पोकेमॉन तुम्ही पोकिबॉल फेकून पकडणे अपेक्षित असते. मुलांबरोबरच मोठेही पोकेमॉन पकडण्यासाठी धावपळ करताना दिसतात. दोन जीबी रॅम आणि अँड्रॉइड ४.४ आणि त्यापुढील व्हर्जनमध्ये हा गेम इन्स्टॉल करून खेळता येतो.

एपीके डाउनलोड केल्यावर पहिल्यांदा गेम सुरू करताना गूगल अकाउंटवरून लॉगइन करावे लागते.

त्यानंतर स्वत:चा अवतार तयार करून आजूबाजूला पोकेमॉन शोधता येतात. १५१ पोकेमॉन्सचा या ॲपमध्ये समावेश आहे.

तुमच्या आजूबाजूला पोकेमॉन असेल तर फोन त्याबद्दल नोटिफिकेशन देतो. पोकिबॉल स्क्रीनवर फ्लॅश होतो. स्क्रीनवर दिसणाऱ्या पोकेमॉनवर पोकिबॉल फेकून तो पकडायचा.

प्रत्येक पोकेमॉनसाठी तुम्हाला पॉइंट मिळतात आणि तुम्ही पुढच्या लेव्हलला जाता.

या गेममध्ये नकाशात दिसणारे वेगवेगळ्या रंगांचे टॉवर म्हणजे पोकेमॉन जिम असतात. निळे बिंदू म्हणजे पोकिस्टॉप्स आहेत.

## ✍ डॉ. ढेरे यांचा ग्रंथसंग्रह

डॉ. रा. चिं. ढेरे यांचे समृद्ध ग्रंथालय अभ्यासक आणि संशोधकांसाठी खुले केले गेले आहे.

पोटार्थी म्हणून कष्ट करताना साहित्याच्या प्रेमापोटी डॉ. रा.चिं.ढेरे यांनी पुस्तकांचा संग्रह केला. त्यांच्या संग्रहामध्ये इतिहास, संत साहित्य, जुने मराठी वाङ्मय, लोकसाहित्य, लोकसंस्कृती अशा वेगवेगळ्या विषयांवरील साहित्य आहे. रा.चिं. ढेरे संस्कृती संशोधन संस्थेची स्थापना नुकतीच झाली. त्यांच्या कन्या ज्येष्ठ कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी ही तीस हजारांपेक्षा अधिक पुस्तके ट्रस्टद्वारे खुली केली.

**७वी आवृत्ती**

# आवरण

मूळ लेखक - **डॉ. एस्. एल्. भैरप्पा**

अनुवाद - **उमा कुलकर्णी**

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




विस्मरणाने सत्य झाकोळून टाकणाऱ्या
मायेला 'आवरण' म्हणतात...
मला कळायला लागल्यापासून
'सत्य-असत्याचा प्रश्न' हा छळणारा प्रश्न आहे...
हीच समस्या 'आवरण' मध्ये.
समूह आणि संपूर्ण राष्ट्रांच्या पातळीवर उफाळून आली आहे...

...मागे कुणीतरी केलेल्या चुकांसाठी
आजचे जबाबदार नाहीत हे तर खरंच.
पण मागच्यांशी नातं जोडून 'आपण त्यांचेच वारसदार'
या भावनेत आपण अडकणार असू
तर त्यांनी केलेल्या कर्माची जबाबदारी स्वीकारावी लागेल.

इतिहासाकडून मिळवण्याइतकंच,
त्यांच्याकडून सोडवून घेणं, हे पपिक्वतेचं द्योतक आहे.
प्रत्येक धर्म, जाती आणि व्यक्तीला
लागू पडणारी गोष्ट आहे ही...

**– डॉ. एस्. एल्. भैरप्पा.**

## ✍ 'युनिसेफ'चा अनोखा प्रयोग

समाजातील सुखवस्तू वर्ग गरिबांबद्दल कितीही कळवळा दाखवत असला, तरी वास्तवात मात्र चित्र वेगळे आहे. प्रत्यक्षात गरिबांचा कोणीही वाली नसतो. अगदी रस्त्यावर हरवलेली एखादी चिमुकली गरीब असली तर तिची विचारपूसही केली जात नाही. उलट, तिचा वेश श्रीमंत घरातल्या मुलीसारखा असला, की सगळेजण आपुलकीने विचारपूस करतात, हे 'युनिसेफ'च्या एका प्रयोगातून स्पष्ट झाले आहे. त्या प्रयोगाच्या 'वुड यू स्टॉप इफ यू सॉ धिस लिटल गर्ल ऑन स्ट्रीट?' अशा मथळ्याचा व्हिडिओ चर्चेत असून, 'यू ट्यूब' वर चार दिवसांत दहा लाखांहून अधिक लोकांनी तो पाहिला आहे.

'युनिसेफ' ने अनॅनो ही सहा वर्षांची बालकलाकार नीटनेटका पोशाख करून जॉर्जिया राज्यातील टीबिलिसिसी येथे रस्त्यावर उभी केली, तेव्हा तिथून ये-जा करणाऱ्या प्रत्येकाने थांबून तिचे नाव, वय, पत्ता विचारला, तिला मदत देऊ केली. तथापि, हीच अनॅनो वेशांतर करून अजागळ अवस्थेत त्याच ठिकाणी उभी राहिली, तेव्हा मात्र कोणी तिची दखलही घेतली नाही.

याच प्रयोगाच्या दुसऱ्या टप्प्यात अनॅनो छान छान पोशाखात एका रेस्टॉरंटमध्ये जाते तेव्हाही प्रत्येक टेबलवर तिचे कोडकौतुक केले गेले. उलट आधीच्याप्रमाणे धुळीने माखलेला चेहरा व फाटक्यातुटक्या कपड्यांमधील अनॅनो नंतर एकेका टेबलवर गेली तेव्हा लोकांनी तिला दिलेली वागणूक अतिशय वेगळी होती.

प्रत्येकजण तिला दूर लोटत होता. महिला त्यांच्या पर्स सांभाळत होत्या. एकाने तर वेटरला बोलावून तिला बाहेर नेण्यास सांगितले. अशा तिरस्कारयुक्त नजरा, तुच्छतेची वागणूक पाहून अनॅनो इतकी अस्वस्थ झाली, की 'युनिसेफ'ला हा प्रयोग थांबवावा लागला.

## ✍ मातृभाषा वाचविण्यासाठी सुरजितसिंग पातर यांचे आवाहन

महाराष्ट्रात मराठीसमोर जी संकटे आहेत, तीच पंजाबमध्ये पंजाबी भाषेसमोर आहेत. अशी संकटे भारतात सगळीकडेच आहेत; पण मातृभाषा वाचविण्यासाठी प्रत्येकजण आपापल्या पातळीवर संघर्ष करत आहे. असे एकेकट्याने लढण्यापेक्षा आता एकत्र येऊ या, असे आवाहन विश्व पंजाबी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सुरजितसिंग पातर यांनी केले.

'साहित्य अकादमी', 'कुसुमाग्रज पुरस्कार', 'सरस्वती सन्मान' आदी

पुरस्कारांपासून ‘पद्मश्री’ पर्यंत मान-सन्मान मिळालेले ख्यातनाम कवी पातर यांची पुण्यात होणाऱ्या पंजाबी संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली. या निमित्ताने त्यांचा विशेष सत्कार १४ जुलै रोजी परिषदेच्या सभागृहात करण्यात आला.

पातर म्हणाले, ‘‘इंग्रजी ही भाषा शिकायला हवी. मी तिचा विरोधक नाही; पण मातृभाषेकडे दुर्लक्ष करून इंग्रजी भाषा शिकण्यात काहीही अर्थ नाहा; मात्र नवी पिढी पूर्णपणे इंग्रजीकडे वळली आहे. यामुळे मला ‘उद्या’ची चिंता वाटते. आजही अनेक ठिकाणी मातृभाषेतून व्यवहार होताना दिसत नाहीत. मातृभाषा येत असतानाही इंग्रजीचा वापर केला जातो. मातृभाषेतून संवाद साधला तर चारचौघांत आपण अपराधी ठरू, असे अनेकांना वाटत आहे. या बदलत्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून आपण सर्वांनी एकत्र यायला हवे. हे पाऊल मातृभाषेच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.’’

पातर म्हणाले, ‘‘विंदा करंदीकर, दिलीप चित्रे हे माझे आवडते कवी. भाषेची अडचण असल्याने त्यांच्या इंग्रजी, हिंदीत अनुवादित झालेल्या कविता वाचून हे कवी समजून घेतले. मला मराठी कवितांचे आकर्षण आहे. मराठी नाटकांचेही आहे. विजय तेंडुलकरांची नाटके मी पाहिली आहेत. या मराठी भाषेतील कलाकृती मला लोकांच्या आयुष्याशी, जगण्याशी खूप जवळच्या वाटतात.

## ✍ बाहुबली कॉमिक्स

‘बाहुबली’ सिनेमातील व्यक्तिरेखा आता आपल्याला ‘कॉमिक्स’च्या माध्यमातूनही पाहता येणार आहेत. फक्त या कॉमिक्समधील साहसी कथा ही पूर्णपणे वेगळी असेल. व्यक्तिरेखा ‘बाहुबली’तीलच असल्या तरी सिनेमाची कथा कॉमिकसाठी वापरण्यात येणार नाही.

मुंबईचा ग्राफिक आर्टिस्ट सौमिन पटेल याने नुकतीच पुण्यात एक कार्यशाळा घेतली. कॉमिक कॉनच्या वतीने आयोजित या कार्यशाळेत कॉमिक बुक तयार करण्याचे तंत्र अवगत करण्यासाठी १२०जण सहभागी झाले होते.

१३ वर्षे रेखाचित्रकार आणि नऊ वर्षे कॉमिक बुक आर्टिस्ट म्हणून काम करण्यापूर्वी सौमिनने जे.जे.स्कूल ऑफ आर्टमधून ॲप्लाइड आर्ट्स पूर्ण केले आहे. सिनेमा हे पहिले प्रेम असल्यामुळे सौमिनने सिनेमातील व्यक्तिरेखा कॉमिक्समध्ये उतरवायला सुरुवात केली.

मान्यताप्राप्त प्रकाशन संस्था, वेबसाईट्स आणि जाहिरात कंपन्यांत काम करूनही अस्सल कलाकाराला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वत:ची ओळख मिळत नसल्याची खंत त्याला सतावते. तो म्हणाला, ''हल्ली लोकांना इंटरनेटमुळे आमच्यासारखे आर्टिस्ट माहिती होऊ लागले आहेत. आमचे काम आवडल्यामुळे लोक आम्हाला फॉलोही करतात; मात्र अभिषेक मलसुनीसारख्या बऱ्याच चांगल्या आर्टिस्टचे काम आजही भारतात झाकोळले जातेय, ही मोठी खंत आहे.''

सौमिनच्या मते, भारतात ग्राफिक आर्टिस्टच्या बाबतीत सध्या घडणारी एक उत्तम बाब म्हणजे 'लॉर्ड ऑफ द रिंग्ज', 'गेम ऑफ थ्रोन्स', आणि 'हॅरी पॉटर' भारतातील प्रेक्षकांनी आपलेसे केले. भारतातील प्रेक्षकांची आवड लक्षात घेऊन त्यानुसार सिनेमांना उपयुक्त असे 'स्टोरीबोर्ड' आणि उत्तमोत्तम व्यक्तिरेखा 'स्केच' करण्याची ही मोठी संधी आहे. तमिळ इंडस्ट्रीने सुपरहिरो मालिका तयार करायला सुरुवात केली आहे. सुपरहिरो सिनेमांमुळे 'कॉमिक्स' वाचणाऱ्यांच्या संख्येत वाढहोते आहे. म्हणूनच कॉमिक बुक आर्टिस्टसाठी उत्तम काळ आहे.

'बाहुबली'तील व्यक्तिरेखांवर आधारित आगामी प्रोजेक्ट म्हणजे एक चित्रमालिका किंवा आर्ट बुकही असू शकेल. रामायण आणि महाभारतातील काही कथांचे धागे पकडत हा प्रोजेक्ट साकार होईल.

## ✍ 'गे, लेस्बियन तृतीयपंथी नाहीत'

'गे, लेस्बियन आणि उभयलिंगी (बायसेक्शुअल)आकर्षण असणाऱ्यांना कधीही 'तृतीयपंथीय' म्हटलेले नाही, असे स्पष्ट करीत सुप्रीम कोर्टाने तृतीयपंथीयांबद्दल २०१४ मध्ये दिलेल्या आपल्या आदेशात सुधारणा करण्यास नकार दिला. केंद्र सरकारने अर्जाद्वारे सुप्रीम कोर्टाला याबाबत विनंती केली होती. कोर्टाच्या आदेशात अस्पष्टता असल्याने या आदेशाची अंमलबजावणी नेमकी कशाप्रकारे करावी, असा संभ्रम निर्माण झाला आहे. कोर्टाने तृतीयपंथीयांबाबत सुधारित आदेश द्यावा, असे या अर्जात नमूद करण्यात आले होते; मात्र कोर्टाने ही विनंती फेटाळली. संभ्रम निर्माण व्हावा, असे या आदेशात काहीही नाही. गे, लेस्बियन आणि बायसेक्स्शुअल हे तृतीयपंथीयांमध्ये मोडत नाहीत, असे या आदेशात स्पष्टपणे म्हटले आहे.

## ✍ 'याग त्याग शिकवतो'

''कोणीही व्यक्ती समाजापासून वेगळी राहू शकत नाही. व्यक्तीची उन्नती ही समाजासाठी केलेल्या त्यागामुळे होते. याग हा त्याग शिकवतो. सर्वजातीसमावेशक श्री शिवयाग हे सामाजिक समरसतेकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे,'' असे मत आचार्य गोविंददेव गिरी यांनी व्यक्त केले.

श्री देवदेवेश्वर संस्थानतर्फे श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आयोजित श्री शिवयागाचा समारोप आचार्य गोविंदगिरी यांच्या उपस्थितीत झाला. पेशवे घराण्यातील वंशज उदयसिंह पेशवा, संस्थानचे प्रमुख विश्वस्त सुधीर पंडित आदी उपस्थित होते. ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५वे जयंती वर्ष, राजर्षी शाहू महाराजांची जयंती आणि श्रीमंत नानासाहेब पेशवे यांची पुण्यतिथी हा पवित्र त्रिवेणी संगम आहे. सर्व जातींमधील व्यक्तींच्या पौरोहित्याखाली झालेला सर्वजातीसमावेशक श्री शिवयाग हे सामाजिक समरसतेच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे,''असे गोविंददेव गिरी यांनी सांगितले.

## ✍ नामदेवांच्या नावाने महाविद्यालय

''पंजाब हा शूर वीरांचा आणि शेतकऱ्यांचा प्रदेश आहे. येथे संत नामदेवांच्या नावाने महाविद्यालय उभे होणे ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. खरं तर हा एका अर्थाने मराठी माणसाचा गौरव आहे,'' अशा भावना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केल्या.

पंजाबमधील घुमान परिसरात संत नामदेव महाविद्यालयाचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते झाले. केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू, केंद्रीय मंत्री विजय ांपला, मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, माजी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, 'सरहद'चे संस्थापक संजय नहार, अरुण नेवासकर, गिरीश गांधी, भारत देसडला, अंकुश काकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

मागील वर्षी घुमानमध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बादल यांनी महाविद्यालय उभारण्याची घोषणा केली होती. वर्षभरात त्यांनी हे महाविद्यालय उभारून त्याचे 'संत नामदेव महाविद्यालय' असे नामकरण केले. याबरोबरच महाविद्यालयाच्या आवारात 'भारतीय भाषा भवना'साठी पंजाब सरकारने दोन एकर जागाही उपलब्ध करून दिली. तेथे 'सरहद'तर्फे

भाषा भवन उभारले जाणार आहे. याचे भूमिपूजन प्रभू यांच्या हस्ते झाले.

पवार यांनी महाराष्ट्रातील संतपरंपरा, नामदेव आणि ज्ञानेश्वरांच्या माध्यमातून या परंपरेचा महाराष्ट्राबाहेरही झालेला प्रसार याचा उल्लेख केला. संत नामदेव यांनी पंजाबमध्ये केलेल्या भक्तिमार्गाचा प्रभाव एवढा व्यापक होता, की शीख समाजाच्या उच्च गुरुपरंपरेत त्यांना स्थान दिले गेले आणि त्यांची भजने आणि रचना आजही भक्तिभावाने गायल्या जात असल्याचे सांगितले.

''नामदेवांची स्मृती जतन करण्यासाठी जागेचे केवळ आश्वासन न देता कॉलेजची इमारत वर्षात बांधून पूर्ण करून दाखवली आणि आता भाषा भवन, यात्री निवासासाठी जागा देऊन बादल यांनी आपला शब्द खरा करून दाखवला ही प्रशंसनीय बाब आहे,'' असेही पवार म्हणाले.

बादल म्हणाले, ''पंजाबची भूमी सर्वांना जोडणारी आहे. येथे भारतीय भाषा भवन होणे ही पंजाबसाठी अभिमानाची बाब आहे. अशा उपक्रमांमधून एकमेकांचे नाते दृढहोणे महत्त्वाचे आहे.''

प्रभू म्हणाले, ''महाविद्यालयाची उभारणी असेल किंवा भाषा भवनाचा उपक्रम असेल याकडे मी चळवळ म्हणून पाहतो. एकमेकांना जवळ आणणारी ही चळवळ वाढली पाहिजे.''

बादल यांनी या जाहीर कार्यक्रमात नहार यांच्याकडे जागेची कागदपत्रे सुपूर्त केली. या प्रसंगी बोलताना बादल यांनी संत नामदेव आणि गुरू गोविंदसिंग, भगतसिंग आणि राजगुरू यांची उदाहरणे देऊन महाराष्ट्र आणि पंजाबमधील सांस्कृतिक संपर्कसूत्र आणि समान नाळ यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.


## ✍ हर्षदा कपूर यांच्या कवितेला पारितोषिक

'ज्ञानक्रांती काव्य करंडक' हर्षदा कपूर यांनी सादर केलेल्या 'बाई' कवितेने पहिला क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक शरद पाटील यांच्या 'अजुनी स्मरती दिवस जुने', तर तृतीय क्रमांक संदीप चव्हाण यांच्या 'लोक सूर्यालाच विकायला काढतात तेव्हा' या कवितेने मिळवला.

नवव्या राज्यस्तरीय काव्य करंडकाच्या वेळी कवी रघुनाथ पाटील, कवी दत्तू ठोकळे, नंदकुमार मुरडे, दत्ता हगवणे, माजी महापौर दत्तात्रय गायकवाड, नगरसेवक कैलास गायकवाड, नगरसेविका रोहिणी चिमटे, डॉ. दिलीप मुरकुटे, माजी नगरसेवक ज्ञानेश्वर तापकीर, शिवाजी बांगर, डॉ. राजेंद्र जोशी, आनंद जुनवणे, विशाल शिंदे, संजय निम्हण, प्रकाश बालवडकर, संतोष चव्हाण आदी उपस्थित होते.

**१५वी आवृत्ती**

# डॉलर बहू




मूळ लेखक - **सुधा मूर्ती**

अनुवाद - **उमा वि. कुलकर्णी**

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

'फार विचित्र आहे हा देश! ते एक रंगीबेरंगी कोळ्याचं जाळं आहे.
तिथं नोकऱ्या आहेत, यंत्र-तंत्र आहे. सुख संपत्ती आहे, डॉलर्स आहेत.
आपली माणसं त्यातल्या कशाला तरी बळी पडून तिथं जातात -
पण माघारी यायला जमत नाही. तिथून जावं असा आपला देशही नाही.
तिथून बाहेर पडण्यासाठी शेकडो खिडक्या आहेत,
पण आत बोलावणारा एकही दरवाजा नाही.

तिथल्या जीवनाची तुम्हाला कल्पना नाही. सेलमध्ये खरेदी करायची आणि डॉलरला चाळीसनं गुणायचं! असं जगणारी मंडळी सुखी असतात काय? तिथं हजार डॉलर्समध्ये सामान्य काम करत राहायचं आणि इथं चाळीस हजार रुपये पगार मिळतो असं सांगून भाव खायचा. तिथं डॉलर मिळविण्यासाठी आम्ही आपली माणसं, घर-दार सगळं सोडून, तिथल्या थंडी-वाऱ्याला तोंड देत राहतो, पण तिथल्या समाजाचं अविभाज्य अंग होऊ शकत नाही. फारच महाग पडतो हा डॉलर! पण हे भारतात कुणालाही समजत नाही.

पैशाच्या दलदलीत सापडलोय आम्ही! आमच्या लायकीपेक्षा फार उत्तम नोकरी मिळते तिथे. जाती, भाषा यांचं राजकारण नाही तिथे. सुखानं आपलं आपण काम करू शकतो. तिथलं सगळं सोडून मी इथं आलो तर आणखी दुःखी होईन.'

शंभराहून अधिक कवींनी स्पर्धेत विविध विषयांवरील कविता सादर केल्या.

## ✍ मुस्तफा आतार यांना देवर्षी नारद पुरस्कार

विश्वसंवाद केंद्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीतर्फे पत्रकारितेसाठी दिला जाणारा देवर्षी नारद युवा पत्रकार पुरस्कार 'महाराष्ट्र टाइम्स'चे पत्रकार मुस्तफा आतार यांना देण्यात आला. त्याचबरोबर ज्येष्ठ पत्रकार दिलीप धारूरकर, छायाचित्रकार गणेश कोरे, शेफाली वैद्य यांनाही भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस राम जाधव यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले.

विश्वसंवाद केंद्राचे अध्यक्ष मनोहर कुलकर्णी आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे शरद कुंटे यांनी पत्रकार अभय कुलकर्णी, रवींद्र घाटपांडे, मिलिंद कांबळे आदी या वेळी उपस्थित होते. पत्रकारितेतील उल्लेखनीय कामगिरीसाठी हा पुरस्कार प्रदान केला जातो. यंदाच्या पुरस्कारार्थींनीही सामान्य नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडली आहे, असे कुलकर्णी यांनी सांगितले. यापूर्वी राजीव खांडेकर, उदय निरगुडकर, 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुणे आवृत्तीचे संपादक पराग करंदीकर, किरण ठाकूर यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.


## ✍ धनंजय भोळे यांना हेलन केलर पुरस्कार

''दृष्टिहीन माणसे दिव्यदृष्टीप्राप्त असतात, ते समाजाला दृष्टी देण्याचेच काम करतात,'' असे मत ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी व्यक्त केले. आडकर फाउंडशेन, श्यामची आई फाउंडेशन तर्फे सावित्रीबाई फुले आणि विद्यापीठाच्या प्रगत तंत्र अंध विद्यार्थी अध्ययन केंद्राचे समन्वयक धनंजय भोळे यांना 'डॉ.हेलन केलर स्मृती पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. डॉ. रवींद्र नांदेडकर, ॲड. प्रमोद आडकर आणि भारत देसडला यावेळी उपस्थित होते.

''दृष्टिहीनांचे जीवन प्रत्यक्षात अवघड आणि वेदनादायी असते; पण त्यांची जिद्द, यश पाहिले की, 'अजून येतो गंध फुलांना' ही काव्यपंक्ती आठवते. बाहेरचे वातावरण बघितले तर काय चालू आहे, हे कळत नाही. अशा व्यक्ती समाजाला दृष्टी देण्याचे काम करत असतात,'' असे गौरवोद्गार डॉ. मेहेंदळे यांनी काढले. उत्तरार्धात 'अंधारातून प्रकाशाकडे' हे दृष्टिहीन कवींचे कविसंमेलन रंगले. उद्धव कानडे यांनी सूत्रसंचालन केले.

२री आवृत्ती

# चिदंबर रहस्य




मूळ लेखक - **के. पी. पूर्णचंद्र तेजस्वी**

अनुवाद - **उमा कुलकर्णी**

**किंमत : १९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

‘...मनाच्या मायाशक्तीविषयी
मला एक लेखक म्हणून काय वाटतं सांगू?
ती स्वतंत्र आहे की विधि-नियमांनी बद्ध आहे
असा विचार करणंच चुकीचं आहे.
मनाचं विश्लेषण मनानं करणं किंवा
प्रज्ञेचं विश्लेषण प्रज्ञेनं करणं शक्यच नाही...’
या तत्त्वविचारांबरोबरच
वेलदोड्याच्या उत्पन्नातल्या कमतरतेचा शोध घेण्यासाठी
आलेल्या अंगाडीला सामोरं आलं ते निसर्गरम्य
केसरूरमधलं
सडलेलं समाज-जीवन, जातीयवादाचा अतिरेक,
पराकोटीची लाचलुचपत, आर्थिक स्वार्थापायी निसर्गाचं
शोषण-
आणि त्यातून अपरिहार्यपणे होणारा मानवी विध्वंस!
‘कर्वालो’च्या लेखकाची केंद्र साहित्य अकादमी विजेती
कादंबरी.

## ✍ पोकेमान पाडतोय खड्ड्यात

ऑनलाइन गेमचे चाहते असलेल्यांना सध्या 'पोकेमॉन गो' या व्हर्च्युअल गेमने अक्षरश: ग्रासले आहे. केवळ लहानगेच नाही, तर मोठेही कॉलेज, नोकरी सांभाळून पोकेमॉन शोधण्यासाठी धावाधाव करताहेत.

कोणत्याही भागात व्हर्च्युअल पोकेमॉन असल्याचे नोटिफिकेशन मोबाइलवर येते. ते पकडण्यासाठी तरुणाईची प्रचंड धावपळ सुरू होते. सिटी प्राइड, कोथरूडच्या परिसरात दोन दिवसांपूर्वी १५०पेक्षा जास्त माणसे हातातील मोबाइलवर लक्ष ठेवून वेगवेगळ्या दिशेने पोकेमॉनच्या शोधात फिरत होती. त्यांना ना रस्त्याचे भान होते, ना ट्रॅफिकचे. एखाद्या विशिष्ट झाडापाशी, खांबापाशी किंवा गाडीजवळ गेल्यावर अचानक कुणीतरी 'गॉट इट' असं ओरडायचा. यामुळे रस्त्यावरील वाहतूकही विस्कळीत झाली होती. पोकेमॉनच्या शोधात आपण वाहतुकीच्या रस्त्यावर भांबावल्यासारखे फिरतोय असे खेळणाऱ्यांच्या ध्यानात न आल्याने अपघात घडण्याचीही स्थिती निर्माण झाली होती.

फ्लोरिडामध्ये शनिवारी रात्री कारमधून भटकत दोन मुलं पोकेमॉन शोधण्यासाठी एका खासगी बंगल्यात शिरली. 'तुला काही सापडलं का,' असा संवाद त्यांच्यात होत असल्यानं घरमालकाला ते चोर असल्याचा समज झाला आणि त्यानं त्यांच्यावर गोळी झाडली. ते बचावले. तरी यामुळे 'पोकेमॉन गो' खेळणाऱ्यांसाठी तिथल्या पोलिसांनी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत.

काय आहे हा गेम?

हा गेम ट्रेझर हंटसारखा असून, तुमच्या आजूबाजूला पोकेमॉन असल्यास फोन त्याबद्दल नोटिफिकेशन देतो. पोकेबॉल स्क्रीनवर फ्लॅश होतो. स्क्रीनवर दिसणाऱ्या पोकेमॉनवर पोकेबॉल फेकून तो पकडायचा. प्रत्येक पोकेमॉनसाठी तुम्हाला पॉइंट मिळतात आणि तुम्हाला पुढच्या लेव्हलला जाता येते.

## ✍ खेळावर विरजण पडू नये म्हणून...

ज्या भागात पोकेमॉनची नोटिफिकेशन्स मिळतात, त्या ठिकाणी सावधानतेने वावरा.

ड्राइव्ह करताना हा गेम खेळू नका. यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे.

चालत चालत हा गेम खेळत असाल, तर नुसतं मोबाइलमध्ये डोकं खुपसून पुढं न पाहता चालू नका. यामुळे तुमच्यावर अपघाताचा प्रसंग ओढवेल. एखादा सोबती घेऊन गेम खेळा. म्हणजे एकजण नोटिफिकेशन्स फॉलो करेल आणि दुसरा त्याला सावरेल.

भरधाव वाहतुकीच्या रस्त्यावर उत्साहाला आवर घाला. पोकेमॉन सापडल्याच्या आनंदात जीव गमवावा लागू शकतो.

या गेममुळे ट्रॅफिक जाम होणार नाही याची काळजी घ्या. हा खेळ खेळताना खासगी जागी एकदम प्रवेश करू नका. पोकेस्टॉपवर गर्दीमुळे कोणतीही विपरीत घटना घडणार नाही. मुलींनी विशेष काळजी घ्यावी. 'पोकिवॉर्स'च्या नावाखाली एखाद्या ठिकाणी बोलावून लुटण्याचे किस्से परदेशात घडल्यानं सावध राहा.

रात्री दीड-दोन वाजताही हौशी लोक पोकेमॉन पकडण्यासाठी घराबाहेर पडताहेत. त्यामुळे विपरीत प्रसंग ओढवू शकतो. शालेय विद्यार्थीही या गेमच्या प्रेमात असल्याने त्यांच्या हाती मोबाइल देताना पालकांनी त्यांना विशिष्ट भाग ठरवून द्यावा, म्हणजे ते अपरिचित ठिकाणी जाणार नाहीत. अन्यथा पालकांनी त्यांच्यासोबत गेम खेळावा.

## ✍ पुस्तकसागर.कॉम

पुस्तकसागर.कॉम हा एक ऑनलाइन प्लॅटफॉर्म मराठी पुस्तकांच्या खरेदी-विक्रीसाठी बनवण्यात आला आहे. इंटरनेटचे व्यासपीठ आणि प्रिंटेड बुक्स यांचा संगम पुस्तकसागरवर घडवून आणला आहे. त्याचा भाग म्हणूनच ई-बुक्ससह 'प्रिंट ऑन डिमांड' ही सुविधा पुस्तकसागरवर तयार केली आहे. मराठीतली अनेक चांगली पुस्तके सध्या 'आऊट ऑफ प्रिंट' आहेत. संदर्भमूल्य असणारी तसेच साहित्यक्षेत्रात मैलाचा दगड ठरलेली पुस्तके केवळ आवृत्ती संपल्यामुळे वाचकांना उपलब्ध होत नाहीत. प्रकाशकांना व्यावसायिक कारणांमुळे ही पुस्तके पुनर्प्रकाशित करण्यात अडचणी आहेत. अशावेळी पुस्तकसागरचा 'प्रिंट ऑन डिमांड' हा किफायतशीर पर्याय उपलब्ध झाला आहे.

'पुस्तकसागर.कॉम' या वेबसाइटवर पुस्तकाची मागणी नोंदवता येते. ऑनलाइन व्यवहारासाठी एचडीएफसी बँकेचा सुरक्षित पेमेंट गेटवे तयार आहे. पुस्तकाची मागणी नोंदली गेल्यानंतर डिजिटल पद्धतीने आंतरराष्ट्रीय

दर्जाचे मुद्रण करून टपाल खात्यामार्फत घरपोच पाठवण्याची सुविधा विकसित केली आहे.

याच प्लॅटफॉर्मचा वापर करून ऑफसेट पद्धतीने प्रिंट केलेली शिल्लक आवृत्तीही वाचकांसाठी वितरित करता येईल. पुस्तक वाचकाला मिळाल्यावर आठ दिवसांतच पैसे अकाउंटमध्ये जमा होतील.

प्रिंटेड पुस्तकांच्या ऑनलाइन विक्रीबरोबरच स्वतंत्र मोबाईल अ‍ॅपद्वारे शेकडो ई-बुक्स वाचकांना थेट आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करून वाचता येतील. हे अ‍ॅप अतिशय सुरक्षित असून डिजिटल राइट्स मॅनेजमेंटने सुसज्ज असल्याने या पुस्तकांची कॉपी करता येत नाही.

इंटरनेटच्या माध्यमाद्वारे पुस्तकसागरच्या प्लॅटफॉर्मवर ई-बुक, मागणीप्रमाणे छापील पुस्तक, शिल्लक आवृत्तीचे वितरण, दुर्मीळ पुस्तकांचे डिजिटायझेशन, ई-कॉमर्सद्वारे आर्थिक व्यवहार, उपक्रमाचे ऑनलाइन मार्केटिंगही प्रभावी पद्धतीने केले जाईल. आपल्याकडे संगणकावरील टेक्स्ट फाइलच्या स्वरूपात पुस्तक उपलब्ध नसल्यास 'ओसीआर' तंत्रज्ञान (ऑप्टिकल कॅरेक्टर रिकग्निशन) वापरून पुस्तकातील मजकूर छपाईयोग्य करून घेतला जाईल.

प्रकाशकांना मोबदल्यातील योग्य ती टक्केवारी राखून ठेवणे गृहीत असून, प्रत्यक्ष व्यवहार ठरवताना याविषयीची रूपरेषा अंतिम करता येईल. या सगळ्यात आर्थिक व्यवहारासाठी आधुनिक सॉफ्टवेअरची व्यवस्था आहे. आर्थिक व्यवहाराची पारदर्शकता हे 'पुस्तकसागर'चे वैशिष्ट्य आहे. सुनील कर्णिक, पराग पाटील, अशोक शाह हे याचे काम पाहणार आहेत.

फोन - +९१२२४००४६७२६/३२/४२

email - info@pustaksagar.com

वेबसाइट - www.pustaksagar.com

## ✍ ऑल्विन टॉफ्लर

ऑल्विन टॉफ्लर यांनी अंतिमत: अद्याप न साकारलेल्या लांबच्या भविष्याची चाहूल घेत त्याबद्दल जगाला जागवण्याचे काम केले. प्रगती, माहिती आणि प्रक्रियांचा वेग ऐतिहासिक दृष्टिकोनातून वाढत असल्याने भविष्यात होणाऱ्या त्याच्या धक्कादायक परिणतीचा अनेक वर्षे आधी त्यांनी वेध घेतला. साठच्या दशकात त्यांनी आपल्या लेखासाठी योजलेला 'फ्युचर शॉक' हा

शब्दप्रयोग त्यांची ओळख बनला, पुढे त्याच नावाने प्रकाशित झालेल्या पुस्तकाने त्यांचे भविष्यवेत्त्याचे स्थान इतिहासात पक्के केले. १९७० साली पहिल्यांदा प्रकाशित झालेल्या 'फ्युचर शॉक' या पुस्तकाच्या दीड कोटी प्रती संपल्या. त्यानंतर सुमारे दहाएक वर्षांच्या अंतराने प्रकाशित केलेल्या अन्य दोन पुस्तकांतून त्यांनी जनुकशास्त्र आणि क्लोनिंगचे जग दाखवले. संगणकाचे भविष्यकालीन परिणाम यावर आयबीएमसाठी लिहिलेला शोधनिबंध ते आणि त्यांच्या पत्नी व सहलेखिका हेदी यांच्या भविष्यकालीन लेखनाचा पाया बनला. प्रगत अर्थव्यवस्था संगणकाविना मिनिटभरही चालू शकणार नाही, हे आज वास्तव बनलेले दिसते. भविष्यकाळातील अशिक्षित जनता ही न शिकलेली, लिहिता-वाचता न येणारी असणार नाही; तर जे शिकले ते बाजूला ठेवून नव्याने, नवे न शिकू शकणारे लोक अशिक्षित ठरतील, असे त्यांनी म्हटले होते. ते आज नवीन तंत्रज्ञानयुक्त वेगवान जगात वास्तव बनलेले आहे.

मात्र, त्याचबरोबर त्यांचे पेपरलेस ऑफिसचे भाकीत आश्चर्यकारकरीत्या चुकीचे ठरले. त्यांनी केलेली प्रत्येक भविष्यवाणी सत्यात उतरली, असे नाही. त्यांचे शहरांच्या प्राबल्याचे अंदाज चुकले. भविष्यातील नागरिकांनी या वेगवान बदलांशी कसे जुळवून घेतले, हे त्यांना पाहता आले नाही. प्रामुख्याने डिजिटल जग जीवन कसे पालटून टाकेल याचे भाकीत त्यांनी अचूक वर्तवले. त्याचबरोबर, माहितीच्या ओव्हरलोडबद्दलचे भाकीत आज सगळे जगत आहेत. ऑनलॉईन चॅटरूम, टेलिकॉन्फरन्स, ई-मेलद्वारे संदेशवहन आणि पर्यायाने पारंपरिक टपाल विभागाचे कालबाह्य होणे त्यांनी काळापूर्वी ओळखले. त्यांनी इंटरनेट आणि केबल टेलिव्हिजनचा प्रसार काळाआधी पाहिला आणि सतत वाढणाऱ्या जीवनाच्या वेगामुळे संपुष्टात येऊ शकणारी कुटुंबव्यवस्थाही पाहून त्याबद्दल सावध केले. एकल पालकत्व, मुलं होण्याचा निर्णय लांबणीवर टाकणे, समलैंगिक विवाह आदींचाही कल त्यांनी काळाच्या आधी ओळखला.

## ✍ मानवी प्रतिष्ठा आणि शांततेचा पुरस्कर्ता - इली विसल

''स्पष्ट भूमिका घेतल्या पाहिजेत. तटस्थ राहिल्याने जुलूम करणाऱ्यांना फायदा होतो. मानवी प्रतिष्ठा जेव्हा धोक्यात येते, तेव्हा राष्ट्राराष्ट्रामधल्या सीमारेषा व मानापमान अर्थहीन होतात. एखाद्या विशिष्ट वंशाचा, धर्माचा

किंवा विशिष्ट राजकीय मतांचा असल्याने एखाद्याचा छळ होत असेल तर तेवढ्यापुरता तरी तो जागतिक मुद्दा बनायला हवा.''


२० वर्षांपूर्वी शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार स्वीकारताना इली विसल यांनी केलेल्या भाषणातील हा इशारा खरा ठरला.

वर्णवर्चस्वाने पछाडलेल्या नाझी राज्यकर्त्यांच्या छळछावणीत अडकलेला सोळा वर्षांचा रुमानियन ज्यू मुलगा पुढे सातत्याने जगभरातल्या हिंसा, वंशविद्वेष आणि दडपशाहीविरुद्ध आवाज उठवत राहिला आणि १९८६मध्ये शांततेच्या नोबेल पुरस्काराचाही मानकरी ठरला. त्यामुळेच इली विसल यांनी केलेले हे आवाहन प्रभावी ठरले. कार्यकर्ता, पत्रकार, प्राध्यापक आणि नोबेलविजेता असा इली विसल यांचा प्रवास थक्क करणारा आहे. त्यामुळेच त्यांच्या निधनाने एक पर्व संपुष्टात आले. नाझी फौजांनी १९४४च्या मार्च महिन्यात हंगेरीचा घास घेतला. युरोपात पसरलेल्या असंख्य ज्यू कुटुंबियांच्या वाट्याला आलेले नष्टचर्य एलिझर, इलीच्या कुटुंबाच्याही वाट्याला आले. गावात मान असणाऱ्या या सुसंस्कृत कुटुंबाची रवानगी झाली आश्विझच्या छळछावणीत. तेथून बुशेनवाल्डमधली छळछावणी. इली यांच्या तिथल्या अस्तित्वाला ओळख होती, कैदी क्रमांक – ए ७७१३. या नरकयातनांतून त्यांची सुटका झाली, तेव्हा या अफाट जगात ते एकटेच होते. त्यांनी फ्रान्समध्ये आश्रय घेतला. साहित्य, तर्कशास्त्र आणि मानसशास्त्राचा अभ्यास सुरू केला. जाँ पॉल सार्त्र, काफ्का, दोस्तोव्हस्की यांच्यासारख्या लेखकांचा त्यांच्यावर प्रभाव होता. विशीच्या उंबरठ्यावर इली यांनी वृत्तपत्रांसाठी लिहायला सुरुवात केली. भूमिगत चळवळीतही काम केले. छळछावणीतल्या अनुभवांवर पुस्तक लिहिले. फ्रेंच भाषेतल्या या पुस्तकाचे तीस भाषांमध्ये भाषांतर झाले. छळछावण्यांतील क्रौर्याबद्दल त्यांनी ४० पुस्तके लिहिली. न्यूयॉर्क विद्यापीठाने १९७२मध्ये त्यांना मानव्यशास्त्राचा प्राध्यापक म्हणून आमंत्रित केले. त्यांनी 'इली विसल फाउंडेशन फॉर ह्युमॅनिटी' ही संस्था स्थापन केली.

सीरिया आणि युरोपातल्या हत्याकांडांबद्दल एका मुलाखतीत बोलताना त्यांनी ''आपण खरंच काही शिकलो आहोत का?'' असा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला जगाला केव्हातरी उत्तर शोधावे लागणार आहे.

**४थी आवृत्ती**

# एक दिवा विझताना...




लेखक - **रत्नाकर मतकरी**

**किंमत : १३०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

या संग्रहातल्या ‘एक दिवा विझताना’सारख्या कथा न आकळणारी गूढरहस्ये या सूत्राभोवती फिरतात.
‘चौथी खिडकी’ ही एक अफलातून विज्ञानकथा ‘काळ’ या संकल्पनेभोवती रचली आहे, तर ‘पोरखेळ’सारख्या कथेमधून मानवाचे नियतीच्या हातातले बाहुले असणे, हे सूत्र बाळाच्या बाहुल्यांशी खेळण्याच्या प्रतीकातून सूचित केले आहे. कलावंत आणि कला यांच्यातला तिढा मांडणारी ‘सुचेता चक्रपाणी आणि तिचा कोकिळकंठ’ ही कथा एक उत्कृष्ट फँटसी ठरते; ती जादुई वास्तववादाची आठवण करून देते.
संधिप्रकाशातल्या धूसर वातावरणात एखाद्या अरण्यात शिरावे, तसे मतकरी यांच्या कथा वाचताना वाटते. वास्तव आणि कल्पना यांच्या सीमारेषेवर प्रवास सुरू होतो. वाचकांना या अरण्यातल्या कळलेल्या, न कळलेल्या वाटांकडे नेण्यासाठी मतकरी कथनाचे वेगवेगळे घाट, निवेदनशैली यांचा वापर करतात. हा प्रवास विलक्षण आकर्षक असतोच; पण तो आत आत खोलातही नेतो.

## ✍ व. पु. काळे यांचा पंधरावा स्मृतिदिन उत्साहात साजरा

वपु काळे यांचा पंधरावा स्मृतिदिन २६ जून २०१६ ला प्रबोधनकार ठाकरे सभागृह मुंबई इथे दिमाखात पार पडला.

श्री प्रदीप वेलणकर, श्री संजय मोने, गायिका दीपिका भिडे, यती भागवत, ओंकार अग्निहोत्री, दीपाली केळकर आणि स्वाती चांदोरकर यांनी वपु साहित्य रसिकांसमोर त्यांच्या शैलीत मांडल. पत्र व्यवहार, वपुंच्या कथांवर आज पर्यंत प्रदर्शित झालेल्या सिनेमांची झलक आणि शेवटी प्रत्यक्ष वपुंना पडद्यावर बघण्याची, ऐकण्याची संधी रसिकांना मिळाली. दीपिका भिडे यांनी वपुंच्या सान्निध्यात आलेल्या गायकांची गाणी अतिशय प्रभावीपणे, सुरेल अशी साजरी केली. त्यांना तबल्यावर साथ होती यती भागवत आणि हार्मोनियमवर होते ओंकार अग्निहोत्री. पूर्ण तीन तासांचा हा वपु कार्यक्रम वपुर्वाई असाच वाटला.

## ✍ नेहरू सेंटर लायब्ररी

भारतामध्ये अजूनही ग्रंथालये पूर्णपणे डिजिटल झालेली नाहीत, शिवाय प्रिंट आणि डिजिटल असं संकरित काम फारसं होत नाही. तरीही बऱ्यापैकी ग्रंथालये आहेत. ग्रंथालयांच्या उपयुक्ततेच्या दृष्टीने भारतात खूप मोठ्या प्रमाणात बदल घडत आहेत. माहिती क्षेत्रातल्या वाढत्या ऑनलाईन पद्धतीमुळे, तसेच ग्रंथसंख्या वेगाने वाढत असलेल्या इतर साधनांमुळे ग्रंथालयांसमोर फार मोठी आव्हाने आहेत. आधुनिक काळाबरोबर राहण्याच्या दृष्टीने ग्रंथालयांनीसुद्धा नवनवीन प्रयोग करून स्वत:ची व्याप्ती वाढवणं जरुरीचं आहे. सध्याची ग्रंथालये फक्त पुस्तकांपुरती मर्यादित आहेत. नवनवीन कल्पना अमलात आणल्या तरच ग्रंथालयांमध्ये वाचकांची वर्दळ वाढेल. 'द नेहरू सेंटर लायब्ररी' या बाबतीत प्रयत्नशील आहे. ऑनलाईन कॅटलॉग, पद्धतीनुसार केलेल्या डिजिटल सर्व्हिसेस, ग्रंथभांडाराचे अपडेशन, ई-रिसोर्सेस (संकेतस्थळांची सूची, सोशल मीडियावरचा सहभाग इ.) बाबतीत काम चालू आहे. नेहरू सेंटर लायब्ररीच्या ग्रंथपाल आरती देसाई म्हणाल्या, "उत्तमोत्तम पुस्तके, नियतकालिके, दृक्श्राव्य साधने, तसेच वर्तमानपत्रे आणि मासिके यांचे वैशिष्ट्यपूर्ण कलेक्शन आहे."

नेहरू सेंटर लायब्ररीला कोणतंही अनुदान वा मदत नाही. नेहरू सेंटरचा पब्लिक ट्रस्ट आहे.

१९७७ साली अगदी छोट्या प्रमाणात केवळ संशोधनासाठी सुरू केलेली ही लायब्ररी मुख्यत्वेकरून लोकांनी दान केलेल्या पुस्तकांचीच होती. काही वैज्ञानिक नियतकालिके आणि अडीच हजार पुस्तकं असलेली ही लायब्ररी दीड हजार चौरसफूट जागेत सुरू झाली होती. अभ्यासू, संशोधक या लायब्ररीचा पुरेपूर उपयोग करीत असत. मुख्यत्वेकरून ॲस्ट्रॉनॉमी (खगोलशास्त्र) आणि इंडॉलॉजीच्या पुस्तकांचा, माहिती आणि संदर्भस्त्रोत म्हणून अंतर्भाव केलेला होता. नेहरू सेंटर-प्लॅनिटोरियम आणि डिस्कव्हरी ऑफ इंडिया... या दोन प्रकल्पांच्या प्रदर्शनार्थ या पुस्तकांचा अंतर्भाव केलेला होता. पुढे पुढे जागा अपुरी पडायला लागली. प्लॅनिटोरियमच्या तळघराचा वापरात नसलेली जागा लायब्ररीच्या उपयोगासाठी वापरायची कल्पना पुढे आली. १९९१ मध्ये विद्यार्थी तसेच संशोधक यांना माफक फीमध्ये सदस्यत्व देण्याची सुरुवात झाली. १९९०पासून वाचकांच्या अभिरुचीची पाहणी करून पर्यावरण, तंत्रज्ञान, ॲप्लाईड सायन्स यासारख्या नवीन विषयांवरच्या पुस्तकांचीही भर घातली गेली.

शाळेतल्या प्रोजेक्टसाठी विद्यार्थीवर्गात लायब्ररीची जोरदार प्रसिद्धी झाली. इथले वातानुकूलित तसेच शांत वातावरण हे आकर्षणाचा भाग बनले. पुस्तकांचे वैविध्यपूर्ण विषय आणि दस्तऐवज यांची भर पडल्यामुळे पाहिजे ते मिळण्याची सोय झाली.

**— प्रज्ञा ओक**

**(ऑल अबाऊट बुक पब्लिशिंग, जून-जुलै)**

# पुरस्कार



*** 'पारखा' पुस्तकास पुरस्कार**

**उत्कृष्ट मराठी अनुवादित साहित्यकृती**

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित, उमा कुलकर्णी अनुवादित 'पारखा' या पुस्तकास आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी यांच्या वतीने देण्यात येणारा (सन २०१५) 'महादेव बाळकृष्ण जाधव'उत्कृष्ट अनुवादित मराठी साहित्यकृती  पुरस्कार दिनांक १३ जुलै २०१६ रोजी इचलकरंजी येथे देण्यात आला.

*** डॉ. उषा देशमुख यांना पुरस्कार**

संतसाहित्य आणि मानवतावादी कार्यासाठी राज्य सरकारतर्फे दिला जाणारा सन २०१५-१६ चा 'ज्ञानोबा - तुकाराम पुरस्कार' प्रसिद्ध संशोधक-समीक्षक डॉ. उषा माधव देशमुख यांना जाहीर करण्यात आला आहे.

रोख पाच लाख रुपये, मानपत्र आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून, सांस्कृतिक कार्य मंत्री विनोद तावडे यांनी आषाढी एकादशीच्या मुहूर्तावर या पुरस्काराची घोषणा केली. संत साहित्यावर उत्कृष्ट लेखन करणाऱ्या, संतांना अभिप्रेत असलेले मानवतावादी कार्य करणाऱ्या व्यक्तीला राज्य सरकारतर्फे प्रतिवर्षी ज्ञानोबा - तुकाराम पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. उषा देशमुख यांच्या 'ज्ञानेश्वरी - एक शोध', 'ज्ञानेश्वरी चिंतन', 'मराठी साहित्याचे आदिबंध', 'काव्यदिंडी', 'अवघी दुमदुमली पंढरी' या ग्रंथांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

**❋ मृण्मयी पुरस्कार**

''मी अप्पांना कधीही भेटलो नाही: पण त्यांच्याशी माझं एक नातं नक्कीच होतं. गो. नी. दांडेकर किंवा 'गोनीदां' म्हणता म्हणता ते माझ्यासाठी आपुलकीने 'अप्पा' कधी झाले, तेच लक्षात आलं नाही. अप्पांचं अल्पाक्षरी लेखन मला भावलं. त्यांच्या लेखनानेच मला भाषेबद्दल सजग केलं. त्यांची भाषा अगदी साधी होती, म्हणूनच अति सुंदर होती,'' अशा भावना नाटककार महेश एलकुंचवार यांनी मृण्मयी पुरस्कार स्वीकारल्यानंतर व्यक्त केल्या.

साहित्यिक गो. नी. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा यंदाचा 'मृण्मयी पुरस्कार' एलकुंचवार यांना आणि 'नीरा-गोपाल पुरस्कार' सामाजिक कार्यकर्त्या नीलिमा मिश्रा यांना प्रदान करण्यात आला. तसेच लेखक बबन मिंडे यांना 'गोनीदां प्रोत्साहन पुरस्कार' देण्यात आला. दिग्दर्शक विजया मेहता यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. 'गोनीदां'च्या जन्मशताब्दीच्या समारोपानिमित्त हा सोहळा आयोजिण्यात आला होता. वीणा देव, विजय देव यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. मृणाल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

एलकुंचवार म्हणाले, ''मला अजूनही अप्पा जसे लिहायचे, तसं लिहिता आलेलं नाही. मी आजही तसं लिहिण्याचा प्रयत्न करतो. त्यांचे माझ्यावर कधीही न फिटणारे ऋण आहे.''

मेहता म्हणाल्या, ''अप्पा एक मुक्त शोधक होते. मुक्त फिरस्ते होते. ते कधी काय शोधत असतील, हे कळायचे नाही. अतीव आनंददायी व्यक्तिमत्त्व होते त्यांचे. आमच्यात एक विलक्षण मैत्र होते. त्यांच्याकडून मला खूप काही शिकायला मिळाले. नाट्य दिग्दर्शक म्हणून पात्राला भिडावे कसे हे त्यांनीच मला शिकवले.''

मिश्रा म्हणाल्या, ''स्वयंरोजगार आणि स्वाभिमान या दोन गोष्टी डोळ्यांपुढे ठेवून मी काम केले. प्रकल्प कसा आहे, यापेक्षा त्यातील मुद्दे काय आहेत, हे मी महत्त्वाचे मानले.''

मनोगत व्यक्त करताना एका क्षणी अंतर्मुख होत एलकुंचवार म्हणाले, ''मी या वेळी खूप दिवसांनी पुण्यात आलोय. पुणं आता माझ्यासाठी हळूहळू रिकामं व्हायला लागलंय. पुण्याची लोकसंख्या वाढतेय; पण ज्या माणसांनी मला जिव्हाळा दिला, ती माणसं आता गेली. हे शहर हळूहळू रितं होत

चाललंय. या गावात आता येऊन मी काय करणार, कोणाला भेटणार असा प्रश्न पडतो.''

### ✻ स्कॉलर ऑफ द इअर ॲवॉर्ड

नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त देण्यात येणारा 'स्कॉलर ऑफ द इअर ॲवॉर्ड' या वर्षी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या कर्मचारी प्रशिक्षण व संशोधन संस्थेचे माजी संचालक संतोष पंडा यांना राम ताकवले यांच्या हस्ते १६ जुलै रोजी देण्यात आला.

### ✻ डॉ. सरदेसाई यांना पुरस्कार


''आजकाल वर्तमानपत्रे आपली सामाजिक प्रकृती कशी आहे, हे ठरवत असल्याचे पाहायला मिळते. सकारात्मक बातम्यांऐवजी रोज रोज विकृत बातम्याच आपल्याला वाचाव्या लागतात. त्याचा परिणाम समाजमानस बिघडविण्यात होतो. या बातम्या आणि त्यांचे मथळे बदलणे खरंतर आपल्याच हातात आहे. सामाजिक प्रकृती चांगली ठेवण्याचे भान आपण ठेवायला हवे,'' अशा शब्दांत डॉ. ह.वि. सरदेसाई यांनी सामाजिक आरोग्याविषयी चिंता व्यक्त केली. वैद्यकीय सेवेसोबतच व्याख्याने आणि लेखनातून आरोग्य जागर करणारे तज्ज्ञ डॉ. सरदेसाई यांना यंदाचा 'प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती सन्मान' प्रदान करण्यात आला. भोसले यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती समितीच्या वतीने हा सोहळा झाला. ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते भाई वैद्य यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

सरदेसाई म्हणाले, ''जैविक अस्तित्वासोबतच आपले सामाजिक अस्तित्व आणि त्यात तयार होणारे नातेसंबंध हेही महत्त्वाचे असतात. मात्र जैविक मृत्यूप्रमाणे समाजानेही 'मृत' होणे, हे योग्य ठरणारे नाही. समाजाची प्रकृती चांगली राहणे आवश्यक आहे.''

वैद्य म्हणाले, ''सरकार आरोग्याचा गांभीर्याने विचार करत नाही. अलीकडे तर रुग्णालयेच विक्रीला काढली जातात, तिथे गरिबांच्या आरोग्याची काळजी ती कुणाला असणार? शारीरिक आरोग्य क्षेत्र बाजारू बनलेल्या आजच्या काळात सामाजिक आरोग्याची स्थितीही अत्यंत दयनीय झाली आहे. हे चित्र बदलायला हवे.''

**१७वी आवृत्ती**

# सखी




लेखक - व. पु. काळे

**किंमत : १६०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

स्त्रीच्या विविध रूपांतून
सर्वांत हवंहवंसं वाटणारं
कुठलं रूप असेल,
तर ते असतं ‘सखी’चं.
वेगवेगळ्या ‘अँगल’नं
वपुंना भेटलेली ही सखी...
तिचं अस्तित्व, तिची भावुकता, वैचारिक उंची,
तिची दु:खं, उत्कटता प्रत्येक कथेतून वेगळं रूप
घेऊन अवतरते.
देहातीत आनंदाच्या विश्वात घेऊन जाणारी ही
सखी...
तुम्हाला आम्हालाही भेटेल?

"आमच्याकडे कायद्याचे राज्य आहे, ही गोष्ट फार अभिमानाने म्हणण्याचे काय कारण? ... मुळात कायदापालनआणि नीतिपालन या गोष्टी आपोआप आणि स्वत:हून घडायला हव्यात. त्यात कुणाचा बडगा असण्याचे कारणच काय?... समाजातच तो विवेक असायला हवा. सामाजिक आरोग्य उत्कृष्ट असेल तर इतरांच्या हलाखीच्या परिस्थितीचेही भान येते. अशा समाजाची प्रकृती चांगली आहे असे म्हणता येते," असे सरदेसाई म्हणाले.

* **आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट, इचलकरंजी, उत्कृष्ट साहित्यकृती २०१५**

**इंदिरा संत उत्कृष्ट काव्यसंग्रह**

मम म्हणा फक्त - वीरधवल परब, वेंगुर्ले,
प्रकाशक - लोकवाङ्मय गृह, मुंबई

**उत्कृष्ट गद्य साहित्यकृती**

संतवाङ्मयाचे जनसाहित्यमूल्य - डॉ. सुभाष सावरकर, अमरावती
प्रकाशक - मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती

**लक्षणीय पद्य साहित्यकृती**

१) अंधारडोह बनत जाताना - प्रमोद मनोहर कोपर्डे, सातारा
प्रकाशक - संस्कृती प्रकाशन, पुणे
२) अंतर्नेत्र - सुदेश शरद लोटलीकर, फोंडा-गोवा,
प्रकाशक - ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

**लक्षणीय गद्य साहित्यकृती**

१) तथागत बुद्ध चरित्र आणि तत्त्वज्ञान -
डॉ. प्रशांत गायकवाड, पेठ वडगाव
प्रकाशक - लोकायत प्रकाशन, सातारा
२) प्रेरणा - द साउंड ऑफ सायलेन्स... -डॉ. उज्ज्वला सहाणे, पुणे
प्रकाशक - प्रेरणा कम्युनिकेशन, पुणे

**सौ. आशाताई सौंदत्तीकर उत्कृष्ट कथासंग्रह**

निळ्या दाताची दंतकथा आणि इतर कथा - प्रणव सखदेव, पुणे
प्रकाशक - वॉटरमार्क पब्लिकेशन, पुणे
वि. मा. शेळके (गुरुजी) उत्कृष्ट कादंबरी
नामशेष होणारा माणूस - जयसिंग पाटील, कोल्हापूर,
प्रकाशक - लोकवाङ्मय गृह, मुंबई

**महादेव बाळकृष्ण जाधव उत्कृष्ट मराठी अनुवादित साहित्यकृती**
पारखा -उमा कुलकर्णी, पुणे, प्रकाशक - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
**श्यामराव भिडे उत्कृष्ट ललित गद्य साहित्यकृती**
'ते' आणि मी - शकुंतला पुंडे, पुणे, प्रकाशक - रोहन प्रकाशन, पुणे
**पार्वती शंकरराव तेलसिंगे उत्कृष्ट बालसाहित्यकृती**
बदल - विद्यालंकार घारपुरे, जालगाव - दापोली,
प्रकाशक - अक्षर मानव प्रकाशन, पुणे
श्री. प्रसाद ताम्हणकर, इचलकरंजी
**उत्कृष्ट वाचक गौरव**
सौ. शर्मिला शहा, इचलकरंजी

❖



**२री आवृत्ती**

# अवस्था

मूळ लेखक - **यू. आर. अनंतमूर्ती**

अनुवाद - **उमा कुलकर्णी**

**किंमत : १६०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




गेल्या शतकातल्या राजकारणात आपलं जीवन गुंतवलेल्या महारथींची हार-जीत शोधणारी, क्षुद्रतेवर विजय मिळवण्याचं अदम्य साहस- त्यातील हार, त्याचप्रमाणे त्या हारण्यातही ताठ असलेलं मानवा व्यक्तित्वाचं वैभव कुतूहलानं निरखणारी- 'संस्कार'ची अंतर्मुखता आणि 'भारतीपूर'ची बहिर्मुखता समोरासमोर उभ्या ठाकून क्रियाशील झाल्यानंतर नवी प्रबुद्धता दर्शवणारी कलाकृती.

# पुस्तक परिचय



## चिकन सूप फॉर द वुमन्स सोल


भाग २

## स्त्रीच्या मनोगुणांचा शोध घेणाऱ्या कथा

*प्रत्येक स्त्रीच्या जीवनात कन्या, पत्नी, माता व आजी होण्याचे टप्पे येत असतात. त्याचप्रमाणे बहीण, मावशी, आत्या, मैत्रीण, शेजारीण व व्यावसायिक सहकारी ही देखील तिची विविध रूपं असतात. हे प्रत्येक नातं निभावताना, सांभाळताना तिच्या प्रेमाची, त्यागाची व सहनशीलतेची कसोटी लागत असते.*

*जगभरातील बेस्ट सेलर्सच्या यादीतील 'चिकन सूप फॉर द सोल' या पुस्तकांच्या मालिकेमधील 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल'च्या पहिल्या भागाप्रमाणेच या दुसऱ्या भागातही, स्त्रीची विविध रूप दाखवणाऱ्या, तिच्या मनोव्यापाराचं रेखाटन करणाऱ्या हृदयस्पर्शी कथांचा ठेवा आहे. या कथा वाचून प्रत्येक स्त्रीला आणि तिच्या कुटुंबीयांनाही स्फूर्ती व आनंद मिळेल यात तिळमात्र शंका नाही.*

*सामान्य व असामान्य स्त्रियांच्या आयुष्यातील जिवंत अनुभवांच्या या सर्व सत्यकथा तमाम स्त्रीवर्गाच्या मनास नक्कीच भावतील.*




# लेखक

## जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन
## मार्सी शिमॉफ । कॅरोल क्लीने

# अनुवाद



## उष:प्रभा पागे

*''प्रोत्साहन देणाऱ्या आणि स्त्रीहृदयातील प्रेम, ताकद, सौंदर्य यांचा आविष्कार दाखवणाऱ्या 'अ सेकंड चिकन सूप फॉर द वुमन्स सोल' या अनुभव संकलनासाठी धन्यवाद!''*

**– पिकाबो स्ट्रीट, ऑलिंपिक आणि जगज्जेता स्की रेसर**

*''अ सेकंड चिकन सूप फॉर द वुमन्स सोल' हे पुस्तक स्त्रीहृदयाची खोली व आनंदी वृत्ती प्रकट करते. प्रेम, चातुर्य, हास्य आणि जादू याविषयी हे पुस्तक सांगते.''*

**– रेचल न्यूमन, मुख्य संपादक कंट्री लिव्हिंग मॅगझिन अँड कंट्री लिव्हिंग्ज हेल्थी लिव्हिंग मॅगझिन**

**जॅक कॅनफिल्ड आणि मार्क हॅन्सन** हे 'चिकन सूप' मालिकेचे संस्थापक व निर्माते म्हणून प्रसिद्ध आहेत. या दोघांनी लेखन व संकलन केलेल्या 'चिकन सूप' या मालिकेची सध्या दोनशे शीर्षके आहेत आणि जगभरातील चाळीस भाषांमधील वाचकांपर्यंत ती पोहोचली आहेत.

**जॅक कॅनफिल्ड** यांच्या नावावर त्यांची सात पुस्तके एकाच वेळी न्यू यॉर्क टाइम्सच्या 'बेस्टसेलर' पुस्तकांच्या यादीत असल्याचा गिनिज बुक विक्रम आहे. शिक्षक, कार्यशाळा संयोजक, मानसोपचार तज्ज्ञ अशा विविध क्षेत्रांत ते काम करत आहेत.

**मार्क हॅन्सन** अमेरिकेतील एक स्फूर्तिदायक आणि प्रेरणादायक वक्ते, प्रशिक्षक आणि लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. गुण आणि तत्त्वे यांचे मानवीकरण केल्याबद्दल 'होरॅशिओ अल्गर' पुरस्कार, नॉर्थवुड विद्यापीठाकडून 'असामान्य औद्योगिक नेता' असे अनेक मानाचे पुरस्कार मार्क हॅन्सन यांना मिळाले आहेत.

**जेनिफर हॉथॉर्न** या आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्रियांसाठी काम करणाऱ्या, स्फूर्तिदायक आणि प्रेरणादायक वक्त्या, प्रशिक्षक आणि लेखिका म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या 'चिकन सूप' व इतर पुस्तकांची आतापर्यंत तीसहून अधिक भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत आणि तेरा दशलक्षांहून अधिक प्रती वाचकांपर्यंत पोहोचल्या आहेत.

**मार्सी शिमॉफ** या नॉन-फिक्शन प्रकारात बेस्टसेलर लेखिकांपैकी एक आहेत. त्यांच्या पुस्तकांमधून त्यांनी दिलेला संदेश जगभरातील लोकांसाठी हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी ठरला आहे. आनंदी आणि सक्षम जीवन जगण्यासाठी लोकांना मदत करणे हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय आहे.

# अनुवादाची पार्श्वभूमी

'द सेकंड चिकन सूप फॉर द वुमन्स सोल' प्रकाशित झाल्यावर त्याला जगभरातून वाचकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. युनायटेड स्टेट्समधील 'मेजर बेस्टसेलर्स लिस्ट'मध्ये ते कायमच उच्च स्थानावर राहिलं आहे. यातील अनुभव ज्या तऱ्हेनं जगातील सर्व स्त्री-वाचकांच्या हृदयाला स्पर्शून जात आहेत, ते आमच्यासाठी खूप प्रेरणादायक आहे. स्त्री-हृदयं उघडली जावीत आणि सदर पुस्तकातील हे अनुभव सर्वार्थानं स्त्रियांच्या आत्म्यांना स्पर्शून जावेत, हाच या पुस्तक लिखाणामागील मुख्य उद्देश आहे; आणि हेच घडलं आहे.

बहामा– बऱ्याच काळानंतर माझ्या वाचनात असं चांगलं पुस्तक आलं आहे.

न्यूझीलंड– सदर पुस्तक वाचल्यावर नकळतच माझे हात आभार मानण्यासाठी जोडले गेले आणि आपण किती आशीर्वादीत आहोत असं मला वाटलं.

मिशिगन– हे अनुभव म्हणजे माझ्या आनंदाश्रूंचे कारण आहे. या स्त्रिया अगदी माझ्यासारख्याच आहेत. संघर्ष करतानाही सदैव आत्मभान जागृत ठेवणाऱ्या आहेत. मी जरी त्यांना ओळखत नसले तरी त्यांच्यापैकीच मी एक आहे.

कॅलिफोर्निया– मी नैराश्यग्रस्त रुग्ण आहे. शरीरावर होणाऱ्या घातक परिणामांमुळे त्यावरील औषधांपेक्षा सदर पुस्तकच माझं 'औषध' झालं आहे. यातील कथा वाचून मला अगदी बरं वाटतं. एकट्या मातेसाठी अत्यंत कठीण असणारं हे आयुष्य सदर पुस्तकानं थोडं सुकर केलं आहे.

आजूबाजूला घडणाऱ्या वाईट घटनांमुळे लोकांचं 'आत्मिक समाधान' हरवलं आहे. 'चिकन सूप फॉर द सोल खऱ्या अर्थानं आशा, धीर, प्रीती आणि प्रेरणांद्वारा 'आत्मिक समाधान' देण्याचं काम करतात.

मदर तेरेसा म्हणतात, ''पश्चिमेकडे आता टी.बी. किंवा कुष्ठरोग हे खरे आजार नाहीत, तर नकोसेपणाची भावना, तिरस्कार, निष्काळजीपणा हे खरे आजार आहेत. शारीरिक दुखणी औषधांनी बरी करता येतात; पण एकटेपणा, निराशा यावर प्रीती हा एकच इलाज आहे. पश्चिमेकडे गरिबी आहे; परंतु ती वेगळ्या प्रकारची आहे. एकटेपणा आणि अध्यात्म यांची गरिबी पश्चिमेकडे आहे. तिथे भूक आहे प्रीतीची.

'द सेकंड चिकन सूप फॉर द वुमन्स सोल' सामान्य लोकांच्या असामान्यत्वाच्या कथा आहेत. प्रीतीची भूक भागवण्यात हे अनुभव काही प्रमाणात यशस्वी होतील, अशी आशा आहे.

❖ ❖

गेल्या चार-पाच वर्षांच्या काळात 'चिकन सूप फॉर द सोल' या मूळ इंग्रजी पुस्तकाच्या मालिकेतील पाच भाग आपल्या मायमराठीमधून तुम्हा वाचकांपर्यंत पोहोचवण्यात मनाला अतिशय समाधान मिळालंय. तुमच्यासारख्या सुजाण वाचकांकडून मिळालेला उदंड प्रतिसाद बघून तर मन भरून आलं. महाराष्ट्रातील मोठ्या शहरांपासून ते अगदी एखाद्या तालुक्यातील छोट्याशा गावामधल्या वाचकांकडूनही पुस्तकं आवडल्याची पावती तर मिळालीच, पण महाराष्ट्राबाहेर स्थायिक झालेल्या अनेक वाचकांनी पुस्तकं आवडल्याचं ई-मेल, पत्रं व फोनद्वारे आवर्जून कळवलं होतं. विशेष म्हणजे परदेशात स्थायिक झालेल्या, पण अजूनही मराठी वाङ्मयाशी नाळ जोडून असलेल्या रसिक वाचकांनी ई-मेलवरून पाठवलेला अभिप्राय बघून तर माझा उत्साह द्विगुणित झाला.

याच मालिकेतील 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल' या पुस्तकाच्या पहिल्या भागाचा अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसकडून काही वर्षांपूर्वी प्रकाशित झाला आहेच. दुसऱ्या भागाच्या अनुवादाची जबाबदारी जेव्हा त्यांनी माझ्यावर सोपवली, तेव्हा मला खूपच आनंद झाला. कारण स्त्रियांच्या आयुष्यात येणाऱ्या वेगवेगळ्या अनुभवांबद्दल जाणून घेणं मलाही मनापासून आवडतं. जगभरातल्या वेगवेगळ्या स्तरांवरच्या स्त्रियांनी अनुभवलेले क्षण, प्रसंग आपल्या मातृभाषेत मांडून ते स्त्रीवर्गापर्यंत पोहोचवावेत असं मला तीव्रतेने वाटू लागलं.

अनुवादाचं काम चालू असतानाच्या काही महिन्यांच्या काळात अनेक अनोळखी स्त्रियांनी अनुभवलेले प्रसंग मी स्वत: जगल्याचा भास मला होत होता. एकेका कथेत माझी भावनिक गुंतवणूक होत होती. एखाद्या वेळी माझ्या मनात आनंदाची कारंजी थुईथुई नाचत होती, तर मधल्याच एखाद्या कथेचा अनुवाद करत असताना डोळ्यात अश्रू दाटून येत होते. एखादीचा अनुभव मलाही स्फूर्ती देऊन जात होता, तर कधी तिचं धाडस बघून मी आश्चर्यचकित होत होते.

पाश्चिमात्य देशातल्या सर्वसाधारण माणसाची महत्त्वाची गरज आहे ती प्रेम

मिळण्याची, कोणीतरी आपली काळजी घेण्याची, एकाकीपणा घालवण्याची, मनावर आलेलं निराशेचं सावट कोणीतरी दूर करण्याची! आणि या पुस्तकातील कथांमधल्या सामान्य स्त्रियांनी केलेल्या असामान्य कृतींबद्दल वाचल्यावर तिकडच्या समाजाच्या या गरजा पूर्ण करण्याची इच्छा प्रत्येक स्त्रीला होत असेल. विशेषत: आईच्या वृद्धावस्थेत तिची काळजी घेण्याचं काम तिची स्वत:ची मुलगीच स्त्रीच घेऊ शकते या सत्याची पाश्चिमात्य संस्कृतीमध्ये नव्यानं ओळख करून देण्याचं काम पुस्तकातील अनेक कथांनी नक्कीच केलं असेल असं वाटतं.

आजच्या प्रगतीच्या, पण अतिशय वेगानं धावणाऱ्या युगात या कथा, आपल्या देशातल्या तमाम स्त्रीवर्गाला नक्कीच स्फूर्ती, प्रेरणा बहाल करतील यात शंकाच नाही. भारतीय संस्कृतीत स्त्रीला देवीचं स्थान देऊन पुरुषवर्ग मोकळा झालाय खरा! पण त्याच देवीसमान स्त्रीवर मानसिक, शारीरिक अत्याचार करताना, तिची गळचेपी करताना कुठे जाते यांची सदसद्विवेकबुद्धी? एकविसाव्या शतकातही आमच्या रोजच्या वर्तमानपत्रात येणाऱ्या, टीव्हीवरती दाखवल्या जाणाऱ्या गँगरेप, हुंडाबळी, नवजात बालिकांची भ्रूणहत्या, घराण्याची बेअब्रू होऊ नये म्हणून घरच्या पुरुषांनीच आपल्या तरुण मुली-बहिणींची केलेली निर्घृण हत्या अशा या स्त्रीवर्गाशीच निगडित बातम्या वाचून, बघून बधीर झालेल्या मनाला या कथांमधून उभारी मिळेल, विरोध करण्याचं बळ मिळेल अशी अपेक्षा बाळगण्यास काहीच हरकत नाही. स्त्रीच्या भावना, संवेदना, तिच्यामधली क्षमता, तिच्या अपेक्षांच्या लेखाजोखा मांडणाऱ्या या सत्यकथांनी मनावर घातलेली हळुवार फुंकर निश्चितच कौतुकास्पद आहे.

तेव्हा मैत्रिणींनो, एकच आग्रहाचं सांगणं आहे, की मनापासून सावकाश एकेक कथा वाचा व वाचल्यावर मनावर होणारा तिचा खोलवर परिणाम स्वत: अनुभवा, त्याची अनुभूती घ्या!

वाचकवर्गाचं प्रेम असंच वृद्धिंगत होत राहावं हीच इच्छा!

**– उषा महाजन**

# संस्मरणीय घटना

## तरुण वृद्धा

ब्याण्णव वर्षांची असूनही फ्रिट्झ आजी तिच्या शेतावरच्या घरात एकटीच राहात असे. स्वत:च्या हातानं बनवलेल्या नूडल्सचा स्वयंपाक

करून जेवत असे. तळघरातल्या मशीनमध्ये स्वत:चे कपडे धुवून टाकण्याचं कामही तीच करायची. परसदारात लावलेल्या भाजीपाल्याची ती एकटीच देखरेख करीत असे. केवळ एकच कुदळ व एकाच फावड्याच्या साहाय्यानं ती त्या लांबलचक बागेची मशागत करत असे. ती राहात असलेल्या बेन्टन कंट्री गावाला भाजीपाला पुरवू शकेल एवढी मोठी तिची बाग होती. सत्तरीच्या घरात असलेली तिची मुलं तिच्याबद्दल वाटणाऱ्या मायेच्या पोटी तिला रागवायची, कारण बागेमधल्या लांबवर पसरलेल्या हिरवळीवरचं गवत व तेही जुनाट मशीननं, स्वत:च कापण्याचा तिचा हट्ट असायचा.

''अरे मुलांनो, मी सकाळच्या गुलाबी थंडीत व संध्याकाळच्या उबदार प्रसन्न हवेतच असं उघड्यावर काम करते आणि तरी डोक्यावर ऊन लागू नये म्हणून आठवणीनं नेहमी टोपीदेखील घालत असते, बरं का!'' आजी स्पष्टीकरण द्यायची.

जेव्हा तिच्या मुलांना समजलं की ती दुपारच्या जेवणाच्या वेळी गावामधल्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या केन्द्राला भेट देते, तेव्हा त्यांचा जीव भांड्यात पडला होता.

हे समजल्यावर आजीच्या मुलीनं मान डोलावत तिला संमती दिली तेव्हा आजी म्हणाली, ''होऽऽऽ, जाते नं मी तिथे रोज आणि तिथल्या सगळ्यांसाठी स्वयंपाकही करते. अगं काय सांगू तुला – तिथली सगळी वृद्ध मंडळी किती तारीफ करतात माझ्या हातच्या स्वयंपाकाची!!''

**ली ॲन थीमन**

## वाटाड्या तारा


*'तुम्ही जर एखाद्या चांगल्या, सन्मान्य गोष्टीचा पाठपुरावा केला, जीवनाची सत्यता पडताळून बघण्याचा प्रयत्न केला, तर मग तुमच्या कल्पनाशक्तीच्या पलीकडील गोष्टीदेखील त्या अनुषंगानं आपोआपच प्राप्त होत जातील.'*

**ओपरा विन्फ्रे**

कोणतीही विवाहित स्त्री अगदी सहज विधवा होऊ शकते. त्यासाठी अंगी काही विशेष गुणवत्ता असण्याची आवश्यकता नसते. श्वास घ्यायला जेवढा वेळ लागतो, त्यापेक्षाही अल्प वेळात हे घडू शकतं. पत्नी, माता किंवा तमाम स्त्रीजातीमधील तत्सम भूमिका जगण्यासाठी जशी काही नियोजन करण्याची

**१४वी आवृत्ती**

# वळीव




लेखक - **शंकर पाटील**

**किंमत : १४०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

पावसाचं आणि शंकर पाटलांचं एक नातं आहे. ते एकदा म्हणाले होते, 'पाऊस म्हणजे माझा जिवलग दोस्त! उन्हाची खाई उसळली की माझी तगमग सुरू होते. अगदी गुदमरल्यासारखं वाटतं; पण पाऊस एकदा का कोसळू लागला, की माझ्या चित्तवृत्ती उल्हसित होतात.'

त्यांचं म्हणणं खरं आहे. 'आभाळ', 'वळीव' अशा कितीतरी कथांतून पावसाची विविध रूपं त्यांनी चित्रित केली आहेत. झिमझिम पाऊस, ताशा बडवत राहिलेला पाऊस, काठी टेकत येणारा पाऊस, धुवाधार पाऊस, थट्टेखोर पाऊस, गारांचा सडा टाकून घेरणारा पाऊस... पण पाऊस अंगावर झेलण्यात एक अपूर्व आनंद आहे! मला विनोबांची पावसातली एक सभा आठवते. पाऊस झिमझिम पडू लागला तशी ते म्हणाले होते, 'मला विलक्षण आनंद होतो आहे. जणू परमेश्वरच आपल्या सहस्त्रधारांनी या धरतीला कडाडून मिठी मारत आहे. पावसाचा स्पर्श म्हणजे परमेश्वराचा स्पर्श!'

**—भालचंद्र फडके**

आवश्यकता असते, तशी गरज विधवा होण्यासाठी मात्र पडत नाही. ही भूमिका बेगडी नसते किंवा मोठी भव्य-दिव्य उदात्त नसते. पूर्ण लांबीच्या चित्रपटापेक्षा एका झटक्यात काढलेला फोटो असावा तशी ही परिस्थिती असते. या परिस्थितीमुळे सगळे तर्कशास्त्राचे नियम धाब्यावर बसवले जातात. खरं पाहाता हे अतिशय अपमानास्पद असतं, पण हीच वस्तुस्थिती असते.

विस्कॉन्सिनमधला जीवघेणा हिवाळा संपून, थंडी संपल्यामुळे शरीराला थोडा आराम पडायला लागला होता. स्वच्छ हवेचा स्पर्श अंगाला हवाहवासा वाटू लागला होता. पण त्या जून महिन्यातल्या एका निरभ्र सकाळी माझा नवरा डॅन स्वर्गवासी झाला होता. तो शाळेचा शेवटचा दिवस होता व तिसरी व पहिलीमध्ये असलेल्या माझ्या मधल्या दोन मुलांना मी आश्वासक सुरात सांगितलं होतं की, ते दोघं शाळेत जाऊन वार्षिक परीक्षेचा रिझल्ट घेऊन येईपर्यंत त्या तासाभराच्या काळात त्यांच्या बाबांना काहीही होणार नाही. आमची सर्वांत थोरली तरुण मुलगी, शाळेच्या प्रॉम पार्टीला जाण्यासाठी तयार होत होती आणि सर्वांत लहान मुलगा नुकताच चार वर्षांचा झाला होता व तो खालच्या मजल्यावर त्याला सांभाळणाऱ्या बाईबरोबर – मिशेलबरोबर खेळत होता.

मीदेखील त्या एका तासात थोडी फार झोप काढून घेणार होते.

आदल्या रात्री मी माझी मैत्रीण जीन मारी हिच्याबरोबर (जी नर्स होती) आमच्या पलंगाशेजारी खाली जमिनीवर बसून पेंगत राहिले होते. डॅनचं हलक्या आवाजातलं कण्हणं आणि त्याच्या ऑक्सिजन सिलेंडरच्या आवाजाच्या पार्श्वभूमीवर आम्ही दोघी थोडीफार विश्रांती घेऊ शकलो होतो. सकाळी अंघोळ करून रंग उडालेला अतिशय जुना असा फ्लॅनेलच्या कापडाचा गाऊन घालून मी माझ्या नवऱ्याशेजारी आडवी झाले. हा गाऊन डॅनला अजिबात आवडायचा नाही. मी तेरा वर्षं ज्याच्याबरोबर वैवाहिक जीवन घालवलं होतं, तो माझा नवरा आयुष्यभर माझा जिवलग मित्रही होता.

शकुन-अपशकुन, संकेत असल्या गोष्टींवर माझा अजिबात विश्वास नाही, पण जर काही विचित्र घडणार असेल तर खोलीमधल्या वातावरणात अचानक महत्त्वाचा असा फरक पडू शकतो असं मात्र मला वाटू लागलंय. का कोण जाणे, पण मी वाकून डॅनच्या कानाजवळ तोंड नेलं. त्यानं श्वास घेऊन पूर्ण तीस सेकंदांनंतर उच्छ्‌वास टाकलेला ऐकला व मी त्याच्या कानाशी

कुजबुजले. ''तुझ्या अंगाचा गंध सर्वोत्तम आहे. माझ्यासाठी तू जगातला सर्वांत जास्त हवाहवासा वाटणारा पुरुष आहेस आणि अशा पुरुषाशी विवाहाच्या गाठी बांधल्या गेल्याचं भाग्य मला लाभलंय हा माझा बहुमानच आहे.'' डॅननं हलकीशी उचकी दिली आणि मृत्यूनं त्याला कवटाळलं. तो नुकताच पंचेचाळीस वर्षांचा झाला होता आणि मी होते केवळ चाळीस वर्षांची.

इतके दिवस दाबून ठेवलेला अश्रूप्रवाह आता जोरात सुरू होणार व माझ्या आर्त किंकाळ्यांनी, हंबरड्यानं घराच्या भिंती हादरणार की काय असं मला वाटलं होतं. आणि तरीही मी मात्र अविचलपणे त्याच्या मृतदेहापाशी बसून होते. जे शरीर मला माझ्या स्वत:च्या शरीराएवढंच परिचित होतं, ते त्या क्षणीही तेवढंच परिचयाचं वाटत होतं. माझ्या हाताची बोटं नकळत त्याच्या नासिकेभोवती फिरू लागली आणि काय आश्चर्य, तीच नासिका तेव्हा माझ्या हाताला थंडगार भासली होती.

तेवढ्यात बाहेरचं दार उघडून शाळेत गेलेले माझे दोन्ही मुलगे धावतच घरात शिरले. पोस्टमन पार्सल घेऊन आला होता म्हणून मिशेलनं खालूनच मला हाक मारली. मी गाऊन उतरवून जीन्स व शर्ट अंगावर चढवला. त्या जुनाट गाऊनच्या कोपऱ्यानं डॅनचा चेहरा पुसून काढला व त्यापुढे तो गाऊन कधीही घालणार नाही असं स्वत:शीच कबूल केलं. पण खरं तर मी आजही तो गाऊन वापरत असते. झालेली घटना फार भयानक किंवा उन्मळून टाकणारी नसून अतिशय दु:खद होती असा मी विचार केला. मला आठवतंय, की मी स्वत:ला बजावत होते, की अतिशोकानं मी उन्मळून पडणार नाही. चार महिन्यांपूर्वीच जेव्हा पचनसंस्थेच्या आजारपणामुळे डॅनला हॉस्पिटलमध्ये न्यावं लागलं, तेव्हाच खरं तर मला याहीपेक्षा मोठा धक्का बसला होता. हॉस्पिटलमध्ये निदान करण्यात आलं की त्याला आतड्याचा कर्करोग झालाय आणि तो अखेरच्या पायरीपर्यंत पसरलाय. अशा वेळी कोणताही उपचार नाममात्र ठरणार होता. एका लहानशा गावातल्या वर्तमानपत्राचा संपादक असलेला माझा नवरा, आपल्या आयुष्यभरात व्यवसायात व अगदी मृत्यू समीप आल्यावरही एक प्रामाणिक व्यक्तीच राहिला होता. कधी काही वाईट बातमी कानावर आली किंवा काही वाईट घटना घडली की तो केवळ ''माझ्या मुलाबाळांचं कसं होईल?'' एवढंच बोलून दाखवायचा.


आता फक्त माझ्या एकटीचीच लेकरं होती ती.

सगळ्या मुलांना जवळ घेऊन मी त्याच्या पलंगाजवळ उभी असताना 'ह्यांची जबाबदारी आता फक्त माझीच आहे,' अशा विचारामुळे मला बरंच बळ मिळालं. त्याचप्रमाणे, त्याच्या शेकडो सहकाऱ्यांना व मित्रमैत्रिणींना मी सांगितलं, ''एखाद्या इतक्या तरुण व्यक्तीच्या आयुष्यात जेव्हा असं काही घडतं, तेव्हा जीवन हे असंच दु:खानं भरलेलं असतं, कधी ना कधी मृत्यू येणारच असं त्या व्यक्तीला सांगण्याचा प्रत्येकाला अनावर मोह होत असतो. परंतु असं करणं म्हणजे होणाऱ्या दु:खाचा अपमानच करण्यासारखं असतं. जीवनात बरंच काही चांगलंदेखील घडत असतं. अगदी साध्या, क्षुल्लक गोष्टी, घटनादेखील खूप आनंद देतात. उदा. चवदार कॉफी, अंगाला पहिल्या पावसाचा गंध असणारी लहान बालकं, लहान-सहान कारणांवरून भांडणारी मुलं.'' असं बोलून टाकल्यावर माझ्यामधलं धैर्य मला दुणावल्याचं जाणवलं होतं.

डॅनच्या वेदनांचा तर अंत होऊन गेला होता. परंतु इतक्या वर्षांच्या आमच्या वैवाहिक जीवनात एक गोष्ट मी विसरूनच गेले होते की एका बिंदूवर येऊन तिथे त्याचं आयुष्य संपून माझं आयुष्य सुरू झालं होतं. तिऱ्हाइताच्या नजरेनं स्वत:कडे बघून मीच मला एक असहाय्य व मूर्ख व्यक्ती भासत होते. मुलांची गोष्ट वेगळी– ती तर मोठ्यांपेक्षा वेगळ्या काळातच वावरत असतात. त्यांच्यासाठी प्रत्येक दिवस हा दु:खातून सावरून उभारीनं परत उभं राहाण्याचा नव्हता, तर हळूहळू ते डॅनच्या स्मृतीपासून दूर दूर जात होते. रात्रीच्या वेळी माझ्या खोलीतून शेजारच्या खोलीतला माझा मोठा मुलगा हुंदके देत, ''बाबा, बाबा प्लीज,'' असं बडबडताना ऐकू यायचं. हळूहळू गेल्या काही महिन्यांत बुडलेला शाळेचा अभ्यास भरून काढण्यात, शैक्षणिक तज्ज्ञ व मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला घेण्यासाठी त्यांच्या भेटीगाठींत, मुलांमधली भांडणं सोडवण्यात माझा बराच वेळ जायला लागला. माझा चार वर्षांचा सर्वांत धाकटा मुलगा एके दिवशी लबाडपणे हसत हसतच घरी आला व मला म्हणाला, ''माईक स्वत:ला फार मोठा मुलगा समजतो बरं का. त्याला वाटतं की एखाद्या ताऱ्याकडे बघून तुम्हाला मनात एखादी इच्छा बोलता येते आणि नंतर ती खरी होते म्हणे. पण मला माहित्येय की अशी इच्छा-बिच्छा काही कधी खरी होत नसते. कारण मी एका ताऱ्याकडे बघून ओळीनं दहा रात्री मनात एक इच्छा मागितलेली आहे, पण ती कुठे खरी झालीये? उगाचच हा मोठ्या मोठ्या थापा ठोकतो झालं!''

**६वी आवृत्ती**

# घरट्याबाहेर




लेखक - **वि. स. खांडेकर**

**किंमत : १३०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

पंख न फुटलेल्या चिमुकल्या पाखरांचे घरटे रक्षण करते,
पण पंख फुटलेल्या पाखरांना तेच घरटे पिंजऱ्यासारखे वाटते.
कुटुंब, घर, देव, धर्म, प्रेम, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, इत्यादिकांविषयीच्या आपल्या आजच्या कल्पनांची हुबेहूब हीच स्थिती आहे. मानवजातीच्या बाल्यात या सर्व कल्पना सुंदर होत्या; इतकेच नव्हे, तर समाजाचे संरक्षण करण्याचे आणि सामर्थ्य वाढविण्याचेच काम त्यांनी केले आहे. पण आजच्या यंत्रप्रधान संस्कृतीत या जुन्या कल्पनांचा काडीमात्र तरी उपयोग आहे का? मध्यमवर्गातल्या बुद्धिवान व कर्तृत्ववान तरुण-तरुणींची बुद्धी पिंजऱ्यात अडकून पडली आहे. यांचे कर्तृत्व कुटुंबाच्या तुरुंगापलीकडे सहसा जाऊच शकत नाही. मध्यमवर्गाचे हे प्रतिनिधी राजकीय व सामाजिक सुधारणेच्या गोष्टी तोंडाने बोलत असले, तरी वस्तुस्थितीकडे ते डोळेझाक करीत आहेत.
शिक्षण, कुटुंबव्यवस्था, संपत्तीची वाटणी, स्त्री-पुरुषांचे संबंध,
इ. बाबतीतला जुना मार्ग खाचखळग्यांनी भरलेला असून,
समाजाच्या गाड्याला त्यामुळे पदोपदी भयंकर धक्के बसत आहेत,
हे जाणूनही नव्या पाऊलवाटेकडे त्यांचे पाय वळत नाहीत...
याचे मुख्य कारण आहे : घरट्याबाहेर न पडण्याची वृत्ती! वैयक्तिक जीवनाची आसक्ती आणि सामाजिक जीवनाविषयीची उदासीनता.

मध्यंतरीच्या काळात घराचं छप्पर तुटून जवळजवळ कोसळूनच गेलं होतं. त्याची दुरुस्ती, तसंच इतर कर्जांचे हप्ते फेडणं असं सगळं चहुबाजूनं माझ्या अंगावर येत होतं. विद्यापीठाच्या जनसंपर्क विभागात मी अर्धवेळाची नोकरी करत होतेच आणि थोडंफार लेखन करून त्यातून थोडाफार आर्थिक लाभ होण्याची माझी स्वप्नं खरी करू बघत होते. त्या बाबतीत डॅन मला कायम प्रोत्साहन देत असे आणि मीही त्याच्या आधाराच्या बळावर राहात असे. पण आता मला सगळ्याच बाजूंनी विचार करून कामांचं एकत्रीकरण करण्याची गरज भासत होती.

''मुलांना बघायला बाई ठेवलीये तिला आधी काढून टाक बरं, अशा फालतू गोष्टींसाठी आता तुझ्याकडे पैसे नाहीयेत हे मुलांना समजलंच पाहिजे आणि एखादं लहानसं घर बघ ना. शिवाय पगाराची हमी असणारी एखादी दुसरी नोकरी शोध.'' मैत्रिणींनी सल्ला दिला. बॉल बेअरिंग बनवणाऱ्या एका फॅक्टरीमध्ये जनसंपर्क अधिकाऱ्याची जागा होती असं कळल्यावर माझ्या बाबांनी तिथल्या मित्राजवळ शब्द टाकण्यासाठी मला आपणहून विचारलं. ''तू उगाचच कोणताही धोका पत्करू शकत नाहीयेस आता. मजेचे दिवस संपले आणि मुलांसाठी तर तू ही नोकरी केलीच पाहिजेस.'' बाबा मला म्हणाले.

घरामध्ये खालच्या मजल्यावर थाटलेल्या माझ्या चिमुकल्या ऑफिसमध्ये मी लेखनकार्य करीत बसायचे व माझा सर्वांत धाकटा मुलगा वरच्या मजल्यावरती खेळत राहायचा. आयुष्यात जे काम करायला मला मनापासून आवडत होतं, ते न सोडण्याचा मी माझ्यापरीनं खूप प्रयत्न करीत होते. मी एकाग्र चित्त करून वेड्यासारखं लिहीत सुटायचे व मी केलेल्या व्याकरणाच्या चुका (उदा. क्रियापदाचा भूतकाळ करायला विसरून जाणे इ.) शोधून काढायला माझ्या दोन मैत्रिणी माझ्या जवळ बसलेल्याच असायच्या. ज्यांना मी कधीही भेटलेली नव्हते असे काही संपादक लोक अहमहमिकेनं मला काम द्यायचे.

तरी मनातून मला समजत होतं की माझ्या परिस्थितीत तसा काही विशेष फरक पडत नाहीये, प्रगती होत नाहीये. एकदा घरातल्या नळदुरुस्तीच्या बिलाचे पैसे भरल्यावर माझ्याकडे केवळ ८६ डॉलर एवढीच रक्कम शिल्लक उरली होती. मुलांच्या शिक्षणासाठी जी सरकारी आर्थिक मदत मिळायची त्याचे पैसेही घरदुरुस्तीसाठी खर्च होऊन गेले होते. मला हेही

समजत होतं की थोड्याच दिवसांनी हातात येणाऱ्या डॅनच्या विम्याच्या पैशांवर आम्ही जास्त काळ तग धरू शकणार नाही. तातडीनं हातपाय हलवण्याची आत्यंतिक गरज होती. पूर्वी ज्या विद्यापीठात व नंतर ज्या वर्तमानपत्राच्या ऑफिसमध्ये मी काम करत होते तिथे जाऊन परत नोकरीसाठी याचना करणं किंवा बाबांनी सांगितलेल्या फॅक्टरीमध्ये जाऊन पूर्णवेळाची नोकरी मागण्याची माझ्यावर पाळी आली होती.

सर्व दृष्टीनं ती खरोखरच एक चांगली व योग्य अशीच गोष्ट होती.

मी इतके कष्ट घेऊन माझ्यातलं लेखनकौशल्य वाढवलं होतं व स्वतंत्रपणे लेखन करणारी म्हणून नाव कमावण्याची माझी दुर्दम्य इच्छा होती. छान छान गोष्टी लिहून पैसे कमावण्याचं स्वप्न मी बघत होते हे सगळं खरं असलं, तरी हातात कायमस्वरूपी नोकरी मिळणं हेच जास्त सुरक्षिततेचं होतं.

कदाचित माझ्या भव्यदिव्य आशाआकांक्षांपुढे हे फार नगण्य, क्षुल्लक वाटत होतं, तरी तूर्तास 'स्व'चा शोध घेण्यापेक्षा पैसे कमावणं जास्त गरजेचं होतं. इतर सर्वांचंही हेच म्हणणं होतं.

एके दिवशी, डॅनच्या मृत्यूनंतर आलेल्या पहिल्याच वसंत ऋतूमध्ये मी माझ्या जवळच्या मैत्रिणीबरोबर बाहेर जेवायला गेले होते. ती एक नामवंत कादंबरीकार होती व तुफान खप होईल अशी खात्री असणारं तिचं एक पुस्तक तेव्हा प्रकाशनाच्या मार्गावर होतं. तिला मिळणाऱ्या यशाची धुंदी, सुप्रसिद्ध ब्रँड्स, मद्याचे बार अशा अनेक विषयांवर आम्ही गप्पा मारल्या. मी जेनला म्हणाले की मी काय करणं गरजेचं होतं ते मला समजत तर होतं, पण मग मला मरण येईल अशी भावना माझ्या मनात का बरं येत होती? तिनं आपुलकीनं विचारणा करताच, मी आधी काही लोकांना सांगितलेली एक घटना तिला सांगितली. एक गोष्टच! डॅन आजारी पडण्यापूर्वी काही दिवस आधी मला एक स्वप्न पडलं होतं. स्वप्न रंगवून सांगण्याचं कौशल्य माझ्याजवळ नसूनही मी बरंच सविस्तरपणे त्याचं वर्णन केलं. एका मोठ्या इटालियन कुटुंबामध्ये एका लहान मुलामुळे काहीतरी विचित्र पेच निर्माण झालेला होता. त्या सगळ्या कुटुंबीयांची नावं, ते दिसायला कसे होते, काय काम करत होते ते सगळं मला माहीत होतं. मी जेनला म्हणाले की त्या स्वप्नावर लेखन करण्याचा मी प्रयत्न केलाही असता, पण आता माझ्या आयुष्याला लागलेल्या कलाटणीमुळे मला आता समजणारच नाही की मला खरंच बऱ्यापैकी लिहिता येतं की अजिबात येत नाही. एका दृष्टीनं हे किती बरं

झालं! पण अचानकच ती म्हणाली, ‘‘शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी अर्ज करून टाक बरं तू.’’

‘‘हो नं, म्हणजे मी शास्त्रीय बॅले नृत्यही शिकू शकले असते! अजून काही?’’ मी उपरोधानं मनातच बोलले.

माझ्या अवतीभोवतीच्या सगळ्यांना असंच वाटत होतं की मी माझ्या स्वप्नांना, आशाआकांक्षांना अवास्तव महत्त्व देऊन अव्यवहारी योजना (प्लॅन) बनवायला नको. माझी ही खंत मी तिला सांगितली, पण तरी पुढे ती म्हणाली, ‘‘हे बघ, तू सबबी शोधतेयस. तू तुझ्या स्वप्नांचा पाठपुरावा केलाच पाहिजेस.’’

मी एक अतिशय व्यवहारी व धोरणी स्त्री आहे. मला काही केल्या तिचं बोलणं मुळीच पटत नव्हतं. पण तरी नंतर मध्यरात्री व्हरांड्यात एकटीच बसून मी काय करणं गरजेचं आहे व काय करणं मला परवडण्यासारखं आहे याचा मी विचार करत बसले, तेव्हा अचानकच मला आठवलं की मृत्यूपूर्वी काही दिवस आधी डॅननं मला काहीतरी सांगितलं होतं. मी त्याच्याशिवाय जगूच शकणार नव्हते असं मी रडत रडत त्याला सांगत होते, तेव्हा तो पटकन मला म्हणाला होता, ‘‘ऐक. नीट ऐक. मी सांगतोय की अजून दोन वर्षांनंतर तू कुठच्या कुठे पोहोचलेली असशील बघ! तू एक नामवंत प्रथितयश लेखिका बनणारेस. पण यासाठी तुला स्वत:वर विश्वास ठेवावा लागेल. जसा माझा तुझ्यावर विश्वास आहे. तुझ्याबद्दल मला जशी खात्री वाटते, तशीच तुला स्वत:बद्दल वाटली पाहिजे.’’

कोणालाही काही न सांगता मी गुपचूप इलिनॉय राज्यामधल्या ‘रॅगडेल फाऊंडेशन इन लेक फॉरेस्ट’ या नावाजलेल्या कलाकारांच्या योजनेंतर्गत असणाऱ्या कार्यक्रमासाठी अर्ज करून टाकला. माझा अर्ज मंजूरही झाला. मी केलेलं थोडंफार लिखाण, एक शब्दकोश, बायबल ग्रंथाची एक प्रत, ‘वुदरिंग हाईट्स’ ही कादंबरी व माझा कॉम्प्युटर (संगणक) एवढं सामान मोटारीत टाकून ऑक्टोबर महिन्यात मी तिकडे जायला निघालेदेखील.

माझ्या प्रौढपणी लाभलेली ती आठ तासांची शांती म्हणजे मला एक प्रकारचं वरदानच वाटलं होतं. पण मनातून मात्र मी खूपच सैरभैर झालेली होते. वरवर बघता माझा दांडगा आत्मविश्वास नजरेस पडत होता, पण मी खरंच चांगल्यापैकी लेखन करू शकत होते हे तिथे कोणाला माहिती होतं? आणि खरं तर मुलांना आधार देण्याऐवजी मी त्यांना एकटं टाकून, स्वत:चं काम

साधण्यासाठी तीन आठवडे दूर चालले होते– कशासाठी हे सगळं? हॉटेलमध्ये पोहोचल्यावर मी माझ्या खोलीत बसून बराच वेळ रडत बसले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून लिहायला सुरुवात करून पुढे तीन आठवडे मी सलग लिहीतच होते. त्या काळात माझ्या मुलीनं मला फोन करून सांगितलं की, मिळालेल्या शिष्यवृत्तीवर पाणी सोडण्याची तिच्यावर पाळी आलीये, तसंच माझा सर्वांत मोठा मुलगा बसने कुठेतरी जाऊन चार तास गायब झाला होता तेव्हा मिशेलनं जीव तोडून त्याला शोधण्याचा प्रयत्न केला. रोज रात्री माझा सर्वांत धाकटा मुलगा मला फोन करून, माझी आठवण काढत रडत असायचा. पण एवढं घडूनही मी मात्र नेटानं लिहीतच राहिले होते. देणेकऱ्यांचेही मला फोन येत असत. मुलांचे शिक्षक वैतागून गेले होते. माझे वडीलही फोनवरून संतापाच्या भरात मला ओरडले, ''अगं जॅकी, आता ही मुलंच तुझं भविष्य आहे– कळतंय का तुला?'' पण छे! मी झपाटल्याप्रमाणे फक्त लेखन एके लेखनच करीत सुटले होते. तोच माझा कठीण परीक्षेचा काळ होता व मला हरून चालणार नव्हतं हे स्पष्ट दिसू लागलं होतं. मी जर शर्थीनं प्रयत्न करून लेखनात जीव ओतला नसता, तर माझ्या कुटुंबीयांनी माझ्यासाठी जो त्याग केला होता, सोसलं होतं ते सगळं निरर्थकच ठरलं असतं.

याच काळात डॅनच्या आठवणीत मी खूप झुरायला लागले होते. मी लिहीत असलेल्या कादंबरीमधील बर्थ नावाची बाई आक्रोश करायची. त्या आईच्या आक्रोशाच्या माध्यमातून मी माझं दु:ख व्यक्त करायला लागले. तिची तर माझ्यापेक्षाही अधिक प्रमाणावर हानी झालेली होती. गेल्या पूर्ण वर्षाचा दु:खद काळ माझ्या नजरेसमोर तरळायला लागला. त्यातल्या एका रात्री मी माझ्या सर्वांत थोरल्या मुलाला, रॉबर्टला घेऊन एका समुपदेशकाकडे गेले होते. तेव्हा रॉबर्ट मला जे म्हणाला होता ते मला आठवलं. ''मी घरी परत येईपर्यंत बाबांचा मृत्यू होणार नाही असं तू मला सांगितलं होतंस ना! त्यामुळेच मला त्यांचा निरोपही घेता आला नाही आणि म्हणून तुझ्या अशा वागण्याचा मी कायमच धिक्कार करीत राहणार आहे!'' पुन्हा एकदा परतून ते दु:ख, ती वेदना माझं काळीज चिरत होती. मी नीट सगळं शब्दन्‌शब्द आठवून धागेदोरे जोडले व त्याच्याकडून मला क्षमा मिळेल अशी आशा बाळगली.

सहा आठवड्यांनंतर मी घरी परत आल्यावर माझ्या एजंट बाईनं माझ्या लिखाणाची पंच्याहत्तर पानं तिच्या माहितीच्या एका प्रकाशक बाईला विकली. अंगात उत्साह संचारून, धैर्य बाळगत मी विद्यापीठाकडून रजा मागितली. उरलेलं लिखाण पूर्ण केलं. नंतर माझ्या भावाला फोन करून सांगितलं की मी माझी नोकरी सोडून देऊन माझ्या इच्छेनुसार हेच काम पुढे चालू ठेवणार आहे.

''ए, असलं काही करण्याचं ठरवू नकोस हं,'' तो घाबरून जाऊन म्हणाला. ''उगाच वेडेपणा करू नकोस. अगं, अजून फार तर तीन पुस्तकं लिहिशील तू. तेव्हा असला निर्णय घेऊ नकोस. मुलांचा थोडा तरी विचार कर!''

''मी हेच करण्याचं पक्कं ठरवलंय,'' मला वाटत होतं त्यापेक्षा जास्तच ठामपणे मी म्हणाले. ''मी जर हे केलं नाही तर माझा आत्मविश्वासच डळमळीत होईल. हो की नाही?''

''हे बघ, अतिआत्मविश्वासही वाटू शकतो बरं का अशा परिस्थितीमध्ये,'' तो हळुवारपणे म्हणाला.

परंतु मागच्या वर्षीच्या हिवाळ्याच्या दिवसांत जेव्हा माझ्या त्या पुस्तकावर चित्रपट काढण्याचं जाहीर झालं, तेव्हा मात्र माझ्या भावाला मनापासून आनंद झाला. ''अरे व्वा! हे म्हणजे, टीव्हीवरच्या एखाद्या चित्रपटात दाखवतात ना, की एखादा गलेलठ्ठ मुलगा संघात असूनही तो संघ खेळाची ट्रॉफी जिंकतो, अगदी तसंच झालं की! तुझ्यात यश मिळवण्याची क्षमता आहेच मुळी!''

आणि त्यानंतर सगळं सुरळीत, आनंदात पार पडू लागलं होतं असं वाटतंय? हं! तसंच म्हणावं लागेल, कारण नंतर माझ्या स्वत:च्या अपेक्षेपेक्षा जास्त कष्ट घेत मी लिखाण करू लागले. जो वेळ मी मुलांसमवेत व्यतीत करावा असं त्यांना वाटतं, पण मी मात्र त्यांच्या वाट्याला येत नसल्यामुळे त्यानं राग येतो. ती हिरमुसली झालेली बघून माझा जीव तुटतो. पण काही चांगल्या कामासाठी एवढा त्याग करावा लागल्याबद्दल आम्हा कोणाच्याही मनात कोणत्याही प्रकारचा गंभीर किंतु निर्माण होत नाही.


मध्यम वयाच्या बायकांना सर्वसाधारणपणे जो सल्ला दिला जातो तोच मलाही मिळाला – उगाच फार धाडस न करता, आयुष्यात आहे त्या परिस्थितीत स्थिरस्थावर होऊन समाधान मानणं हेच वैचारिक प्रगल्भतेचं लक्षण असतं. काही जणांची मला नाउमेद करण्याची इच्छा नव्हती, तरी त्यांनी स्पष्टपणे जाणीव करून दिली होती की माझ्याजागी ते असते तर त्यांनी

**९वी आवृत्ती**

# जळलेला मोहर

लेखक - **वि. स. खांडेकर**

**किंमत : १४०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




तरुण स्त्री-पुरुषांनी प्रेमजीवनात शरीरसुखाचा भाग अतिशय महत्वाचा मानला पाहिजे, परस्परांच्या आनंदसंवर्धनाकरता आपण एकमेकांचे हात हातात घेतले आहेत, याचा त्यांनी स्वतःला कधीही विसर पडू देऊ नये, आयुष्याच्या प्रवासातली खरीखुरी मौज असल्या सोबतीतच आहे, इत्यादी गोष्टी सांगितल्या जात असल्या, तरी केवळ कामतृप्ती हे संसाराचे कधीच ध्येय होऊ शकत नाही.

आकाशातल्या चंद्राला हात लावण्याच्या धडपडीत माणसाचे पृथ्वीवरले पाय सुटले, तर तो तोंडघशी पडतो. तो चंद्र योग्य वेळी अनेकांच्या हाती लागतो; नाही, असे नाही; पण त्याचा लाभ संसाराच्या सुरवातीला होत नाही. दहा-वीस वर्षे संकटे आणि सुखे यांची चव जोडीने घेतल्यावरच त्या चांदण्याची वृष्टी होऊ लागते. त्या दृष्टीने उदात्त प्रीती हा शुक्ल पक्षातला चंद्र नाही; तो वद्य पक्षातला आहे.

जास्त काळजीपूर्वक, विचारपूर्वक वागून पारंपरिक कल्पनांनाच चिकटून राहाणं पसंत केलं असतं. त्यांच्या मते मी म्हणजे स्वत:वरच्या जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करून स्वत:च्याच हिताचा विचार करणारी स्त्री होते. परंतु मी मात्र असा विचार करते की भीतीपोटी काहीतरी अयोग्य निर्णय घेऊन एकाकी व नम्र होऊन राहाणं, पडतं घेणं म्हणजे काही सद्गुणी होणं नव्हे. एखादी माता आपल्या मुलांना भित्रेपणानं स्वत:च्या आशाआकांक्षावर पाणी सोडायला शिकवते का कधी? आयुष्यात मोठी हानी झाल्यावर हृदयं उन्मळून पडली, तरी मनातल्या आशाआकांक्षा, स्वप्नं आणि ध्येय सोडून देण्याची शिकवण देते का कोणती आई?

आणि जगणं, जगणं म्हणजे तरी काय हो?– जीवन जगण्यासाठी आपल्या लेखी जेवढा काळ आहे तोच म्हणजे धैर्यानं जीवनाला सामोरं जाण्याखेरीज दुसरं काय?

एका रात्री माझ्या एका पुस्तकाचं परत एकदा अखेरचं वाचन करण्याचं काम उरलेलं होतं. मला शांतता लाभावी म्हणून माझ्या शेजारची मंडळी माझ्या मुलांना बरोबर घेऊन सहलीला गेली होती. त्या रात्रीच्या प्रचंड उकाड्यात माझं सगळं काम पूर्ण होण्याची माझी अपेक्षाच नव्हती, पण तरी मी जवळजवळ बरचसं काम संपवत आणलं होतं व बघता बघता सगळं हातावेगळं झालंही होतं. कॉफीचा कप हातात घेऊन मी बाहेरच्या व्हरांड्यात चकरा मारत होते. रात्रीची वेळ असूनही अंग घामानं कसं ओलंचिंब होऊन गेलं होतं. मला खात्री आहे की त्या दिवशी माझ्या थोडंफार लक्षात होतं, पण तो क्षण येईपर्यंत मी ते खऱ्या अर्थानं ओळखलेलं नव्हतं. तो दिवस होता ४ जून १९९५ चा. डॅनचं निधन होऊन त्या दिवशी बरोबर दोन वर्षं झाली होती.

शकुन-अपशकुन-संकेत अशा गोष्टींवर माझा अजिबात विश्वास नाही. आणि मिळालेल्या ह्या आयुष्याखेरीज आपल्यासाठी पुढील जन्म किंवा तत्सम गोष्टी नशिबात लिहून ठेवलेल्या नसतात. उलट या आयुष्यानंच चमत्काराला सामोरं जाण्याची इच्छाशक्ती मला अर्पण केली आहे. आणि म्हणूनच कदाचित, कधीतरी खोलीतल्या वातावरणात अचानक काही बदल जाणवू लागतात. आणि त्या वेळेला मलाच कोणीतरी साद देतंय असं मला वाटायला लागतं. माझ्या मते, त्या क्षणी डॅनचंच तिथे अस्तित्व असणार – माझ्या दिशेनं नशिबाचे सुलट फासे टाकणारा माझा डॅन!

याचप्रमाणे माझा अजून एका गोष्टीवर विश्वास आहे. ज्याप्रमाणे एखादा तारा दृष्टीआड झाला तरी पृथ्वीच्या दिशेनं त्याचा प्रकाश झेपावतच राहात असतो, त्याचप्रमाणे सर्वार्थानं चांगल्या व दीर्घकाळ टिकणाऱ्या या वैवाहिक नातेसंबंधांना एक प्रकारचा अलौकिक प्रकाश, तेज लाभलेलं असतं. हा अलौकिक प्रकाश तुमच्या मनामधल्या इच्छा पूर्ण करत नसला, तरी कमीतकमी तो तुमचा मार्ग तर प्रकाशमान करू शकतो ना!

**जॅकलिन मिचार्ड**

## मानसिक सुटका

*'स्वप्नांना हातून निसटून जाऊ देऊ नका, कारण जर स्वप्नंच विरून गेली तर आयुष्य पंख तुटून, उडता न येणाऱ्या पक्ष्याप्रमाणे होऊन जातं.'*

*लँगस्टन ह्युजेस*

क्युबा देशात राहाणं अतिशय कठीण झालेलं होतं. ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात असंख्य क्युबा रहिवासी हातानं बनवलेल्या साध्या तराफ्याच्या साहाय्यानं अमेरिकेमध्ये पळून जाण्याचा प्रयत्न करत असत. काही जण सुखरूपपणे पोहोचत आणि त्यांना अमेरिकेत स्थायिक होण्याची परवानगीही मिळायची. पण सगळेच तेवढे नशीबवान नसत. पळून जाण्याचा प्रयत्न करीत असतानाच त्यांना सरहद्दीवर अटक व्हायची. किंवा त्यांच्याहूनही कमनशिबींचा तर समुद्रातच बळी पडायचा. क्युबा ते अमेरिकेचं दक्षिणेचं टोक – की वेस्ट, या समुद्रीप्रवासाचं नव्वद मैलांचं अंतर कापेपर्यंत त्यांच्या बोटींची वाताहात होऊन जायची.

मार्गेरिटा नावाच्या एका तरुणीने तिथून स्वत:ची सुटका करून घेण्याचा ठाम निर्णय केला होता. वैद्यकीय व्यवसाय करण्याचं तिचं एकमेव लक्ष्य होतं. परंतु कम्युनिस्ट प्रणालीच्या तिच्या मायदेशात तिचं स्वप्न सत्यात उतरणं कधीच शक्य नव्हतं, हेही तिला माहिती होतं; कारण डॉक्टर बनणाऱ्या अनेक क्युबावासीयांना उदरनिर्वाहासाठी शेवटी टॅक्सी चालवण्याचा व्यवसायच पत्करावा लागायचा. त्या देशात चांगल्या प्रतीचं आयुष्य जगण्याची नावालाच शक्यता असली, तरी थोडीफार आशा बाळगणाऱ्या मार्गेरिटाला एकटीला मागे सोडून तिच्या कुटुंबातले सगळे सदस्य अमेरिकेत पळून गेले होते.

मार्गेरिटानं अनेक वेळा पळून जाण्याचा प्रयत्न केला होता, पण दरवेळी तिच्या नशिबी अपयशच आलं होतं. ती एक अतिशय जबरदस्त इच्छाशक्ती असलेली अशी स्त्री होती आणि तिच्या देशातल्या कम्युनिस्ट वातावरणात नेमकं तेच फार गैर मानलं जाई. लवकरच सरकारी अधिकाऱ्यांनी तिची चौकशी करून, प्रश्नांची सरबत्ती करून तिला त्रास द्यायला सुरुवात केली होती. तिचा ठावठिकाणा काढण्यासाठी पोलीस रात्री-अपरात्री तिच्या घरी येऊन झोपेतून उठवून ती तिथेच असल्याची खात्री करून घेत. परत एकदा सुटकेचा प्रयत्न करतेवेळी ती तराफा पाण्यात लोटणारच होती, तेवढ्यात तिच्या शोधात पोलीस आलेच व त्यांनी ताबडतोब तिला अटक केली होती.

परिणामी, ती पर्यटन क्षेत्रात नोकरी करीत होती तिथून तिला बडतर्फ केलं गेलं व सरकारने वर्षभर भांडी घासण्याचं बिनपगारी काम करायला तिला भाग पाडलं होतं. पोलीस भर रस्त्यात थांबवून तिचं ओळखपत्र तपासून बघण्याचा अट्टाहास करत असत. तिच्या आयुष्यातली शांतीच भंग पावली होती व मनोमन बाळगलेलं तिचं स्वप्न तर हळूहळू विरून जायला लागलं होतं. सुटकेचा प्रयत्न करण्याबद्दल तिला इतके भयानक परिणाम भोगावे लागत होते की, ते सगळं असह्य होऊन आत्महत्या करावी असा विचारही तिच्या डोक्यात आला होता.

स्वत:चं आयुष्य संपवण्याचा निर्णय घेण्याच्या विचारापेक्षा मार्गेरिटामध्ये कितीतरी अधिक परीनं निग्रही वृत्ती व तिच्या आशाआकांक्षा जाग्या होत्या. तिनं दुसऱ्यांदा सुटकेचा प्रयत्न करण्याचं ठरवलं, पण या वेळी तिनं इतर दोघांना आपल्या जोडीला घेतलं. त्या तिघांनी मिळून पैसे एकत्र केले व त्यातून थोडं लाकूड, ट्रकच्या आतल्या भागातली लांब रबरी ट्यूब आणि भरभक्कम दोरखंड विकत घेतला. एक दिवस पक्का करून मध्यरात्रीनंतरच्या वेळी ते एकत्र भेटले आणि हातानं बनवलेल्या तराफ्यावर तिघं चढून बसून तरंगायला लागले. प्रवास निर्विघ्न पार पडावा व हाती यश लागावं म्हणून तिघांनी मनोभावे देवाची आळवणी केली, परंतु किनाऱ्यापासून फार दूर गेलेले नसतानाच त्यांच्यावर एक मोठं संकट चाल करून आलं. या वेळी सरकारऐवजी निसर्गमातेनं रौद्र रूप धारण करून संकटात टाकलं होतं.

समुद्रामध्ये तुफान वादळं सुरू झाली व त्यांच्या त्या साध्या तराफ्याची कसोटीच लागली होती. वाईट हवा व धुवाधार पावसाला तोंड देत त्यांनी कसंबसं करून दोन दिवस काढले आणि तिसऱ्या दिवशी, तराफा ज्या दिशेनं

जात होता तसे ते समुद्रात भरकटत राहिले. शरीरातील पाण्याचं प्रमाण धोक्याच्या पातळीखाली जाऊन पोहोचलेलं होतं आणि लाटांचा जबरदस्त मारा सोसलेल्या त्या तिघांना शेवटी अमेरिकेच्या तटवर्ती सैनिकांनी वाचवलं. चार दिवसांच्या त्या प्रवासात सत्त्याहत्तर मैलांचा पल्ला त्यांनी गाठला होता. त्या परक्या देशानं त्यांना आधार दिला आणि काही काळानंतरच मार्गेरिटा परत तिच्या कुटुंबीयांना भेटू शकली.

आता मार्गेरिटा पूर्णपणे स्वतंत्र झाली होती! कॉलेजमध्ये नाव घालून तिनं डॉक्टर होण्याचं स्वप्न पूर्ण करण्याचं ठरवलं. तो अभ्यासक्रम अतिशय कठीण होता, पण तिला ते उलट आव्हानात्मकच वाटत होतं. अभ्यास करण्यात रात्ररात्र जागूनही तिला अतिशय समाधान लाभत होतं.

साधारण एक वर्षानंतर एकदा रात्री ती परीक्षेची तयारी करत बसली होती. डोळ्यांना थोडी विश्रांती देण्यासाठी ती डोळे मिटून शांतपणे बसल्यावर क्युबामधलं तिचं गतायुष्य कसं होतं ते तिला आठवायला लागलं. तिला झालेला त्रास, छळ परत आठवल्यावर तिचं हृदय भरून आलं. त्या काळात तिला आयुष्याची अखेर आल्यासारखंच वाटायचं आणि सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे अतिशय क्रूर व अपमानास्पद वागणूकदेखील तिच्या नशिबी आली होती. ज्या प्रकारच्या अन्यायाला तिला तोंड द्यावं लागलं होतं, ते सगळं आठवल्यावर तिचा संताप उफाळून येतोय की काय असं तिला वाटायला लागलं. क्युबामधल्या पोलीस व सरकारी अधिकाऱ्यांनी तिचा जो छळ केला होता – विशेषत: ज्या एका अधिकाऱ्याच्या हाती फारच छळ झाला होता, ते सगळं स्पष्टपणे आठवू लागलं तेव्हा मध्यरात्रीचे दोन वाजलेले होते आणि त्याच क्षणी तिनं क्युबामधल्या त्या अधिकाऱ्याला फोन करण्याचं ठरवलं. तिच्यासाठी जेव्हा तो सुधारअधिकारी म्हणून काम करायचा, तेव्हा तिनं त्याला अगणित वेळा फोन केलेला असल्यामुळे तिला त्याचा फोन नंबर तोंडपाठच होता. 'त्याला मी गाढझोपेतून उठवणार आणि त्यानं मला दिलेल्या त्रासाचं उट्टं काढणार व मग बघणार की कसं काय वाटतं आता त्याला!' ती मनात म्हणाली.

विचार बदलला जाण्याच्या आतच मार्गेरिटानं पटकन त्याला फोन लावला. फोनवरून संपर्क होईपर्यंत ती संतापानं आतल्या आत धुमसत होती. ती जुन्या दाहक आठवणींमुळे संतापली होती.

जेव्हा क्युबामधल्या त्या अधिकाऱ्यानं तिकडे फोनचा रिसिव्हर कानाला

लावला, तेव्हा अजिबात कांकूं न करता ती भराभरा बोलू लागली, ‘‘मी बोलत्येय, मार्गेरिटा. हो, हो, तीच तरुणी, जिला तू इतके महिने अनन्वितपणे छळलं होतंस. आज तुझे आभार मानण्यासाठी म्हणून मी मुद्दामच फोन केलाय.’’ ती म्हणाली.

‘‘काय? माझे आभार मानायला?’’ आश्चर्यचकित होऊन त्यानं विचारलं.

‘‘हो. मी सध्या अमेरिकेत वैद्यकीय शिक्षण घेत आहे, कळलं? तू दिलेल्या त्रासामुळे क्युबामध्ये माझं जगणंच असह्य होऊन गेलं होतं. तूच मला या श्रीमंत देशात पळून येण्यास भाग पाडलंयस.

‘‘अशा देशात, जिथे कोणतीही स्त्री तिच्या स्वप्नांना खतपाणी घालून ती स्वप्नं सत्यात उतरवू शकते,’’ ती स्पष्टीकरण देत म्हणाली. बोलताना तिच्या आवाजात सूड घेतल्याचा आनंद जाणवत होता.

त्या अधिकाऱ्यानं खिन्नपणे एक दीर्घ सुस्कारा टाकल्याचं ऐकून आता तीच आश्चर्यचकित झाली. काही क्षण शांततेत गेल्यावर तो म्हणाला, ‘‘इथे माझं स्वत:चं आयुष्य फार कठीण होत चाललंय. माझ्या मुलीला यकृताचा आजार झालाय व तिला तीळ तीळ मरताना बघण्याचं माझ्या नशिबी आलंय. तिला दररोज ॲस्पिरिनच्या सहा-सहा गोळ्या देण्याचा सल्ला देऊन डॉक्टर मोकळे होतात–’’ आणि पुढे त्याचा आवाज चिरकू लागला.

‘‘तू मला झोपेतून जागे करण्यासाठी, मी तुझा छळ केला होता म्हणून मला शिक्षा देण्यासाठी, त्रास देण्यासाठी फोन केला आहेस. पण मी तुला एक गोष्ट सांगतो, की मी तर रोजच त्रास सोसतोय, कारण माझ्या लहानशा आजारी मुलीला बघत, तिच्या काळजीत मी रात्र रात्र जागाच असतो. ॲस्पिरिनच्या गोळ्या सारख्या सारख्या विकत घेणंही मला परवडत नाहीये आणि त्यामुळे या आजारात माझ्या लेकीला प्राण गमवावा लागणारेय. आणि जरी समजा माझ्याकडे भरपूर पैसे असते, तरी दुकानातही एवढ्या प्रमाणावर या गोळ्या मिळाल्या नसत्याच.’’

फोनचा रिसिव्हर कानाला तसाच लावलेला ठेवून तो माणूस दु:खातिशयाने हुंदके देत रडू लागला. मार्गेरिटाला अनपेक्षितपणे धक्काच बसला व काय प्रतिक्रिया द्यावी हेच तिला कळेना. तंद्रीत असल्याप्रमाणे तिनं पुटपुटून खेद व्यक्त केला आणि पटकन रिसिव्हर खाली ठेवला. तिचं हृदय एका आगळ्यावेगळ्या भावनेनं भरून गेलं होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्या उठल्या मार्गेरिटा औषधांच्या दुकानात गेली


व तिला शक्य होत्या तेवढ्या ॲस्पिरिनच्या गोळ्या तिनं विकत घेतल्या. त्या एका मोठ्या खोक्यात ठेवून त्याचं पार्सल करून मोठ्या आपुलकीनं तिनं तिच्या एकेकाळच्या शत्रूला पाठवून दिलं– क्युबामधला तोच तो दुष्ट सरकारी अधिकारी! आता तिला अचानक खूप मोकळं मोकळं वाटू लागलं व ती मनात म्हणाली, ‘‘आता मात्र मी खऱ्या अर्थानं मुक्त झाले. माझ्या मनात साठून राहिलेला संताप नाहीसा झाला.’’

**एलिझाबेथ ब्राव्हो**

❖


**१३वी आवृत्ती**

# गर्भसंस्कार




लेखक - **डॉ. गौरी बोरकर**

**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

‘गर्भसंस्कार’ म्हणजे आयुर्वेदशास्त्राच्या आधारे वर्णन केलेली गर्भवती स्त्रीसाठीची आचारसंहिता (Code of Conduct) आहे. गर्भवती स्त्रीचा आहार-आचार-विचार यासंबंधीचे मार्गदर्शन, तसेच गर्भाच्या प्रत्येक महिन्याच्या वाढीनुसार व उत्कृष्ट अवयवनिर्मितीसाठी गर्भशास्त्रात सांगितलेली औषधे इत्यादींचा या पुस्तकात समावेश आहे. डॉ. गौरी बोरकर यांचे गर्भसंस्कारविषयक संशोधन पुस्तकरूपाने येत आहे. आजच्या ‘हम दो हमारे दो’ किंवा ‘हमारा एक’च्या जमान्यात हे पुस्तक Pregnancy Guide म्हणून नक्कीच उपयुक्त ठरेल.



# स्मरण

## ग्रेस

साठोत्तरी मराठी कवितेवर स्वत:ची स्वतंत्र नाममुद्रा उमटवणारे कवी ग्रेस यांची कविता, तसेच आत्मपर आशय प्रगट करणारे ललितबंध १९५५-६०च्या दरम्यान काव्यरसिकांवर चांदणवर्षाव करू लागले. ग्रेस ह्यांचा 'संध्याकाळच्या कविता' हा कवितासंग्रह १९६७ साली प्रकाशित झाला.

क्षितिज जसे दिसते, तशी म्हणावी गाणी
देहावरची त्वचा आंधळी, छिलून घ्यावी कोणी...
गाय जशी हंबरते, तसेच व्याकुळ व्हावे
बुडता बुडता सांजप्रवाही, अलगद भरुनी यावे...

संध्याकाळच्या कवितांमध्ये अनेक संध्यावेळा एकवटून आलेल्या आहेत. 'प्रकाशाचा मृत्यू होत असताना सृष्टीवर दाटून आलेले गहन आणि गहिरे औदासीन्य, निःशब्द एकटेपण, एकाकीपणात जाणवणारे चिरंतन गूढपण उदात्त दु:ख अशाच वेळी 'ग्रेस'चा आत्मा जागा होऊन गाऊ लागतो. ग्रेस आपल्या 'प्रार्थना' कवितेत हा भाव समर्थपणे प्रगट करतात.

या इथे, झाडांना उदासीन करणाऱ्या संधिप्रकाशात
मी जेव्हा ईश्वरी करुणेची स्तोत्रे म्हणू लागतो
मावळतीला शेवटच्या किरणांची फुले
समुद्राच्या दिशाहीन पाण्यात बुडून जातात
... कुठे जातात?

ग्रेस यांचे एकूण पाच कवितासंग्रह ते हयात असताना प्रसिद्ध झाले. त्यांच्या प्रथम स्मृतिदिनी त्यांचा अखेरचा कवितासंग्रह प्रकाशित झाला 'बाई!

जोगिया पुरुष'. ह्या सहाव्या संग्रहात १९५८ ते २०११ पर्यंतच्या त्यांच्या अप्रकाशित कविता संकलित केलेल्या आहेत. 'सांध्यपर्वातील वैष्णवी' ह्या चौथ्या कवितासंग्रहाच्या संदर्भातली प्रतिक्रिया ग्रेस यांच्या एकूणच काव्यविश्वाची उकल करायला मदत करते.

१९६६ साली नागपूर विद्यापीठातून मराठी विषयात त्यांनी एम.ए. केले. ना. के. बेहरे सुवर्णपदक त्यांना मिळाले होते. त्यांच्या ललितलेख संग्रहाला २०१२चा साहित्य अकादमी पुरस्कार लाभला. 'संध्याकाळच्या कविता' संग्रहाला राज्य सरकारचा कवी केशवसुत पुरस्कार लाभला.

१० मे १९६० ते २६ मार्च २०१२ हा कवी ग्रेस ह्याचा कालखंड आहे. पंचाहत्तर वर्षांचे आयुष्य लाभलेल्या कवी ग्रेस यांची शेवटची तीन वर्षे कॅन्सरशी झुंज देण्यात गेली. 'ओल्या वेळूची बासरी' ह्या त्यांच्या ललित लेख संग्रहात त्यांनी आत्मपर चिंतन केलेले आहे, त्यामुळे त्यांच्या गूढरम्य व्यक्तिमत्त्वाची थोडीफार ओळख होते. कॅन्सरशी झुंज देताना ग्रेस ह्यांनी म्हटले आहे की,

मी इथे व्यथालयात दुःख सांगतो तुला
घे मला कुशीत आज, पावलात शृंखला...

असह्य वेदनांशी टक्कर देत असताना ..... ग्रेस यांनी 'ओल्या वेळूच्या बासरी'त आपले मोकळे श्वास फुंकत लेखन केले. ते उत्कट आहे. एकूणच त्यांच्या ललित बंधांमधून प्रगट झालेला चिंतनशील विचारांचा विलक्षण आवाका आपल्याला थक्क करतो.

ओळखीच्या ...... तुझे घर कुठे सांग?
गरुडाच्या पंखामध्ये डोंगराची रांग...

विसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि एकविसाच्या शतकातले पहिले दशक, ग्रेस ह्यांच्या आत्मसंवेदनाच्या तरल पातळीवर भारलेले होते.

चंद्रमाधवीच्या प्रदेशात थांबलेली ही विराट संध्याकाळ
तिचाच एक तुकडा
आणि त्याच्या पाताळात निजलेले हृदयभर दुःख
माझा वाटा मी उधळला चंद्रमाधवीच्या प्रदेशात...

**– वामन देशपांडे**
**डोंबिवली (पूर्व)**
**९३२४६१५०७७**

# श्रद्धांजली

**❋ वसुंधरा पेंडसे-नाईक यांचे निधन**

ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक आणि मराठी, संस्कृत भाषेच्या अभ्यासक वसुंधरा पेंडसे-नाईक (वय ७०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे पती क्रिकेटपटू सुधीर नाईक व मुलगी आहे. ज्येष्ठ पत्रकार अप्पा पेंडसे यांच्या त्या कन्या होत.

वसुंधरा पेंडसे-नाईक यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या 'सगुण-निर्गुण' या लोकप्रिय स्तंभासाठी लेखन केले होते. त्याआधी त्या 'नवशक्ती'च्या संपादक म्हणून कार्यरत होत्या. त्यांनी पत्रकारितेची सुरुवात 'लोकसत्ता'मध्ये सहसंपादक म्हणून केली. त्यानंतर त्या 'लोकप्रभा' या साप्ताहिकाच्या संपादक झाल्या. त्यांनी मराठीमध्ये विपुल लेखन केले. विल्सन महाविद्यालयातून मराठी आणि संस्कृत या दोन्ही विषयांमध्ये स्वतंत्रपणे एम.ए. पदवी घेतल्यावर त्यांनी विल्सन महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणूनही नोकरी केली. दहावीत असताना संस्कृत विषयामध्ये १०० गुण मिळाल्याने त्यांना जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळाली होती.

संस्कृतमधील प्रभुत्व आणि सखोल ज्ञानामुळे त्यांना दूरदर्शनवर 'अमृत मंथन' हा कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळाली. या माध्यमातून इंजिनीअरिंग, अर्थशास्त्रापासून अनेक विषयांवरील माहिती त्यांनी प्रेक्षकांपर्यंत पोहोचवली. 'अमृतधारा' कार्यक्रम त्यांनी दहा वर्षे दूरदर्शनवर सादर केला होता. राज्य मराठी भाषा विकास संस्था या राज्य सरकारच्या संस्थेच्या संचालक म्हणूनही काही काळ त्यांनी काम पाहिले.

**❋ पाकिस्तानी समाजसेवक इधी यांचे कराचीत निधन**

गरिबांच्या सेवेसाठी जीवन अर्पण करणारे पाकिस्तानी समाजसेवक अब्दुल सत्तार इधी यांचे कराची येथे निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. किडनी निकामी झाल्याने त्यांच्यावर उपचार सुरू होते. इधी यांनी आपले संपूर्ण आयुष्य मानवता आणि गरिबांच्या सेवेसाठी समर्पित केले होते. मानवीय व

सामाजिक कार्यामुळे पाकिस्तानात सर्वजण त्यांचा आदर करीत. रस्ता चुकून पाकिस्तानात आलेल्या गीता या मूकबधिर भारतीय मुलीची दहा वर्षे इधी फाऊंडेशनने काळजी घेतली. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये ती भारतात परतली.

इधी यांनी २५ वर्षांपूर्वीच आपल्या दफनविधीची जागा निश्चित केली होती. त्यांच्या इच्छेनुसार तेथेच त्यांचा दफनविधी करण्यात आला. ही जागा इधी गावाजवळ आहे. इधी यांनीच २५ वर्षांपूर्वी बेघर, निराधार आणि ज्येष्ठांना निवारा यासाठी हे इधी गाव वसविले होते. इधी फाऊंडेशनचे ते अध्यक्ष होते.

### ❋ ज्येष्ठ लेखिका महाश्वेता देवी यांचे निधन

समाजातील 'नाही रे' वर्गाच्या समस्यांना धारदार लेखणीच्या माध्यमातून वाचा फोडणाऱ्या आणि केवळ लेखन करून न थांबता चळवळी, आंदोलने यांच्या माध्यमांतून या समाजाच्या उत्थानासाठी आयुष्य वेचणाऱ्या ज्येष्ठ लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या महाश्वेता देवी यांचे कोलकाता येथे अल्पकालीन आजाराने निधन झाले. त्या ९१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात सून व नातू असा परिवार आहे.

महाश्वेता देवी यांचा जन्म १४ जानेवारी १९२६ रोजी (सध्याच्या बांगलादेशात) ढाका शहरामध्ये झाला. त्यांचे वडील मनीष घटक साहित्यिक होते. त्यांची आई धारित्री लेखिका आणि समाजसेविका होत्या. या वारसाहक्काने मिळालेल्या साहित्यिक लेखन आणि सामाजिक कार्य अशा दोन्ही भूमिका पार पाडत असताना महाश्वेता देवी यांच्यातील माणूस सदैव जागा होता. वंचितांसाठी काही तरी करायला हवं, ही धडपड त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. वैश्विक परिमाण लाभलेल्या साहित्याला भाषेचे बंधन नसल्याने त्यांचे साहित्य अनेक भाषांमध्ये रूपांतरित झाले. त्यांच्या माघारी त्यांचे साहित्य अनेकांना दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करीत राहणार आहे.

महाश्वेता देवींना १९७९ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार, १९८६ मध्ये पद्मश्री, १९९६ मध्ये ज्ञानपीठ आणि १९९७ मध्ये रेमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २००६ मध्ये पद्मविभूषण सन्मानाने त्यांचा गौरव करण्यात आला.

### ❋ प्रसिद्ध अभिनेते नंदू पोळ यांचे निधन

गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ चित्रपट, रंगभूमीला मोलाचे योगदान देणारे ज्येष्ठ अभिनेते नंदू पोळ यांचे निधन झाले.


'श्री गणराय नर्तन करी' या घाशीराम कोतवाल नाटकाच्या नांदीवर

पदन्यास करणाऱ्या कलाकारांच्या रांगेतील सर्वाधिक लक्ष वेधून घेणारी वामनमूर्ती, ‘सामना’मधील मास्तरांना सेवा देणारा वेटर, ‘गाढवाचं लग्न’ चित्रपटातील राजा, छोट्या पडद्यावरील ‘नाजूका’ मालिकेद्वारा ‘धर्म्या’ अशा विविध भूमिकांमधून त्यांनी अभिनयाची छाप पाडली. थिएटर ॲकॅडमीचे ते संस्थापक-सदस्य होते. शास्त्रीय संगीताच्या मैफली, कट्ट्यावर भरभरून गप्पांचा फड रंगविणारा रसिकराज म्हणून ते विशेष लोकप्रिय होते.

❖

**२१वी आवृत्ती**

# ही वाट एकटीची





लेखक - **वपु काळे**

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

वपु काळे यांची अगदी पहिली आणि विलक्षण गाजलेली,
महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभलेली कादंबरी...
जीवनविषयक एक कठोर तत्त्वज्ञान परखडपणानं
‘बाबी’ या नायिकेच्या माध्यमातून मांडणारी
ही कादंबरी म्हणजे
एक अविस्मरणीय अनुभव आहे...
तुम्ही तो घ्यायलाच हवा...

**९वी आवृत्ती**

# ढगाआडचे चांदणे




लेखक - **वि. स. खांडेकर**

**किंमत : १२०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

'...कथाबीजं दाही दिशांनी मनात येऊन पडतात – प्रत्यक्ष अनुभवलेल्या एखाद्या भावनेच्या छटेपासून, तो सहजगत्या कानांवर पडलेल्या एखाद्या चार-दोन ओळींच्या घटनेपर्यंत. अशा अनेक अनुभवांत कथाबीजं लपलेली असतात; पण ती सारीच फुलवण्याचं सामर्थ्य पुष्कळांच्या अंगी नसतं. मीही त्याला अपवाद नाही. झोपलेलं माणूस एकदम काही तरी टोचल्यामुळं जागं व्हावं, त्याप्रमाणं ज्या अनुभूतीनं संवेदना सचेतन होते आणि कल्पना-भावना-विचार यांच्या त्रिवेणी संगमानं न्हाऊ लागते, तीच पुढं स्वत:ला हवं तसं कथारूप धारण करू शकते.

अशा रीतीनं गेली पन्नास वर्षं मी कथापंढरीचा वारकरी राहिलो आहे. पहिल्या दहा-वीस वर्षांत मी तरुण वारकरी होतो. चालण्यात काय किंवा अभंग आळवण्यात काय, माझ्या ठिकाणी दुर्दम्य उत्साह होता. आता त्या उत्साहाची

अपेक्षा करणं सृष्टिक्रमाला धरून होणार नाही. तथापि, गेल्या काही वर्षांत ज्यांचा कथारूपानं माझ्या हातून आविष्कार झाला, असे काही अनुभव या संग्रहात प्रतिबिंबित झाले आहेत....

या संग्रहातील कथांनी कुणाचं थोडंसं सात्त्विक रंजन केलं, कुणाला थोडा वाङ्मयीन आनंद दिला, एखाद्याला त्यात दिलासा सापडला, तर त्या लिहिताना मला जो आनंद झाला; तो केवळ वैयक्तिक नव्हता, या जाणिवेनं माझं लेखन सफल झालं, असं मी मानेन.'



# अभिप्राय

## काचेपलीकडंच जग

ही गोष्ट आहे तीन ब्रिटिश मुलींची. त्यांच्याभोवती गुंफल्या गेलेल्या नातेसंबंधांची. एक माणूस आणि त्याच्याभोवतीचं जग, त्याचं अनुभवविश्व, त्याचं आयुष्य ही एक कादंबरी असते असं मानलं तर चीन मुली आणि त्यांच आयुष्य असं सगळं मिळून किती गुंतागुंतीचं, नाट्यमय असू शकेल याची कल्पना करता येते. त्यातही या तीन मुली स्वत:च्या आयुष्याचा शोध घेत स्वातंत्र्यपूर्व भारतात आलेल्या असतील तर... हाच सगळा पट मांडला आहे, ईस्ट ऑफ द सन या ज्युलिया ग्रेसमन यांच्या पुस्तकात. श्यामल कुलकर्णी यांनी उगवतीच्या दिशेने त्याचा सुंदर अनुवाद केला आहे. सुरुवात करताक्षणी आपल्याला खिळवून ठेवणारं हे पुस्तक शेवटपर्यंत आपली उत्कंठा वाढवत नेतं. त्याला असलेली वसाहतकालीन भारताची, भारतीय स्वातंत्र्यलढ्याची पार्श्वभूमी आपल्याला या पुस्तकापासून जराही बाजूला होऊ देत नाही. तीन मैत्रिणींचं निखळ विश्व मांडणारं हे पुस्तक आपल्याला शांता शेळके अनुवादित चौघीजणी (लिट्ल विमेन) या पुस्तकाची आठवण करून देत राहतं.

ही कहाणी आहे विवा, रोझ आणि टॉर या तीन मुलींची. विशीच्या आतल्या रोझ आणि टॉर एकमेकींच्या जिवलग मैत्रिणी आहेत. विवाची आणि त्यांची ओळखही नाही. पण काच बोटीतून त्या तिघीजणी भारतात यायला निघतात आणि त्यांची एकमेकांशी ओळख होते. सुरुवातीला एकमेकींच्या जवळ जायला फारशा उत्सुक नसलेल्या या मुली बोटीवरून उतरेपर्यंत, म्हणजे भारतात पोहोचेपर्यंत एकमेकींच्या छान मैत्रिणी होतात. नंतरही या ना त्या कारणाने भेटत राहतात आणि त्यांचे एकमेकांशी जिव्हाळ्याचे बंध जुळतात. त्या सगळ्या नातेसंबधांचा तरल आलेख हे पुस्तक मांडतं. भारतात येणारा तत्कालीन ब्रिटिश समाज, त्यांचं जगणं,

तत्कालीन भारतीय समाज या दोन्ही समूहांचे एकमेकांशी असलेले लागेबांधे, ताणेबाणे, स्वातंत्र्यपूर्व काळाची ती धगधग ही सगळी पार्श्वभूमी या कादंबरीला आहे.

१९२८ साली लंडनमधील 'लेडी' नावाच्या एका मासिकात आलेल्या जाहिरातपासून ही कादंबरी सुरू होते. विवा होलावे या अठ्ठाविशीच्या तरुणीने कुणाला भारतात आपल्या मुलांना पाठवायचं असेल तर मुंबईपर्यंतच्या प्रवासासाठी आपण आया म्हणून उपलब्ध आहोत अशी जाहिरात दिलेली असते. या जाहिरातीवरूनच आपल्याला त्या काळात काय चालत असणार याची कल्पना येते आणि पुढे पुढे ती वृद्धिंगत होत जाते. भारतात नोकरीसाठी येणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांची मुलं सुट्टीसाठी संपवून भारतात जात असतं. त्यांना सोबत म्हणून जाण्याचं काम त्या काळी मिळत असे. विवा होलावेला भारतात जायचं असतं ते भारतात मरण पावलेल्या तिच्या आई - वडिलांची एक टंक मसुरीला जाऊन परत घेण्यासाठी. त्या टंकमध्ये आपल्यासाठी घबाड नाही. आणि त्यात जे असेल ते आता खराब झालं असेल हे तिला माहिती आहे, पण तरीही गेली अनेक वर्षे ती मसुरीला जायचं नियोजन करते आहे. आई -वडील-बहीण यांच्या मृत्यूनंतर ती एकटी वाढली आहे. एकटेपणाच्या अपरिहार्यतेतून एक अपयशी प्रेमप्रकरणही तिच्या खाती जमा आहे. त्यामुळे अविश्वास, सावधवपणा, भूतकाळाची भेट म्हणून मिळालेला अस्वस्थपणा या सगळ्यासह ही विवा गाये नावाच्या सोळा वर्षांच्या मुलाची आया किंवा सोबतीण म्हणून भारतात यायला निघते. लेखिका व्हायचं हे तिचं स्वप्न आणि जगण्यासाठी सतत पैसे मिळवण्याची सक्ती या कात्रीत ती अडकलेली आहे.

ती ज्याची सोबतीण म्हणून निघाली आहे, तो सोळा वर्षांचा गाय हा मुलगा कुणालाच नको आहे. अतिशय अस्वस्थ, घुसमटलेलं बालपण वाट्याला आलेला हा मुलगा शाळेत रँगिंगला बळी पडला आहे. तिथून त्याला नाकारलं गेलंय. भारतात असलेल्या आई-वडिलांकडे त्याला पाठवलं जातंय. पण त्यांनाही तो खरं तर नकोच आहे. तो बोटीवर विचित्र वागून, विचित्र परिस्थिती ओढवून घेतो. विवालही अडचणीत आणतो. पण नंतर तिच्यात आणि त्याच्यात एक समृद्ध नातं तयार होतं. असं असलं तरी पौगंडावस्थेतल्या या मुलाची फरफट आपल्याला अस्वस्थ करत राहते.

रोझ आणि टॉरे या दोन मैत्रिणी भारतात यायला निघाल्या आहेत, त्या

रोझच्या लग्नासाठी. भारतात ब्रिटिश सैन्यात काम करणाऱ्या जॅकशी रोझ लग्न करणार आहे. जॅक सुनीता नावाच्या एका सुंदर भारतीय मुलीत गुंतलेला आहे. त्या काळात इंग्लंडमध्ये लग्न जमत नसे अशा उपवर मुलींना त्यांचे आई-वडील भारतात आलेल्या तरुणावर गळ टाकण्यासाठी भारतात पाठवून देत. रोझने जॅकशी आधीच जमवलंय. पण तिचे आई-वडील तिच्या लग्नाला येऊ शकणार नाहीयेत म्हणून टॉर ही तिची जिवलग मैत्रिण करवली म्हणून तिच्यासोबत आली आहे. भारतातच असलेली तिची एक नातेवाईक स्त्री हे लग्न लावून देणार आहे.''

टॉर ही एक टिपिकल बायकीपणाने वागण्याचा तिरस्कार करणारी, आपल्याला हवं तसं वागणारी बिनधास्त, पण गोड मुलगी आहे. प्रेमप्रकरणात सतत अपयशी होणारी टॉर पुन्हा तितक्याच उत्कटतेने प्रेमात पडत राहते. बोटीवर ती फ्रँक या डॉक्टरच्या प्रेमात पडते. पण फ्रँक विवामध्ये गुंतत जातो आणि स्वत:च्या स्वाभिमानाची, स्वच्छंदी जगण्याची आस असलेली विवा त्याच्यात गुंतूनही त्यलाा झिडकारत राहते.

भारतात उतरल्यानंतरचं सगळ्यांचं जगणं, भारतात त्यांना येणारे वेगवेगळे अनुभव, त्यांचं हळूहळू बदलत गेलेलं आयुष्य आणि ते एकमेकांशी शेअर करण्याची त्यांची आच या सगळ्यांतून ही कादंबरी एक विलोभनीय दुनिया आपल्यासमोर उभी करते. एरवी आपण तत्कालीन ब्रिटिशांकडे राज्यकर्ते या एकाच नजरेने पाहतो पण या राज्यकर्त्या वर्गातले वेगवेगळे थर, त्यांचे प्रश्न, त्यांचं जगणं हे सगळं कसं होतं ते या कादंबरीमुळे आपल्याला काचेच्या त्या बाजूकडून समजतं.


**उगवतीच्या दिशेला**
मूळ लेखक : ज्युलिया ग्रेगसन
अनुवाद : श्यामल कुलकर्णी
प्रकाशन : मेहता पब्लिशिंग हाऊस
मूल्य : ५५०/-
पृष्ठे : ६१२
**लोकप्रभा, जुलै २०१६**



# अनेक विकारांचा नैसर्गिक उपचारांद्वारे रोगविलय

रोजच्या धबडग्यात अचानक एखाद्या आजाराला सामोरं जावं लागतं आणि दैनंदिन जगण्याचा ताल-तोल बिघडून जातो. वेगवेगळ्या उपचारपद्धतींचे प्रयोग केले जातात, पण काही वेळा गुण पडतो, तर काही वेळा पडत नाही. कधी कधी शरीर कोणत्याच उपचारपद्धतीला दाद देत नाही. त्यामुळे योग्य उपचारांचा शोध सुरू होतो. अशा वेळी कुणीतरी ॲक्युप्रेशर ही उपचारपद्धती घेऊन बघा असं सुचवतं, हेही करून बघू असं म्हणून माणसं त्याकडे वळतात आणि थोड्याच काळात त्यांचं शरीर ॲक्युप्रेशरच्या उपचारांना दाद द्यायला लागतं. आपल्या आसपास असं घडताना आपण अनेकदा बघतो. आजाराच्या मुळाशी जात, आपल्याला त्या आजाराशी लढायला आंतरिक बळ देत ॲक्युप्रेशर ही उपचारपद्धती आपल्याला वेदनामुक्त करू शकते. ही उपचारपद्धती नेमकी काय आहे, तिची मुलभूत तत्त्वे कोणती, ती आपल्या शरीरावर कशी काम करते, ॲक्युप्रेशरच्या दृष्टिकोनातून आपली शरीररचना कशी आहे, ॲक्युप्रेशर आणि ॲक्युपंक्चर यात फरक काय आहे. ॲक्युप्रेशरच्या दृष्टिकोनातून शरीरातल्या विविध बिंदूंची ओळख, कोणकोणत्या आजारात ॲक्युप्रेशर पद्धतीचा वापर केला जातो, तो कसा केला जातो, अशी सगळी तपशीलवार माहिती या पुस्तकात आहे.

**मिरॅक्युलस इफेक्ट्स ऑफ ॲक्युप्रेशर**
मूळ लेखक : डॉ. ए. के. सक्सेना
अनुवाद : डॉ. एल. जी. गुप्ता
प्रकाशन : मेहता पब्लिशिंग हाऊस
मूल्य : २९५/-
पृष्ठे : २६८
**लोकप्रभा, जुलै २०१६**



# का ते सांगा!

# जिज्ञासू तथ्य

**आयनांबर (थर) म्हणजे काय?**

आयनांबर हा थर वातावरणातील चौथा थर आहे, जो मेसोस्पीअरच्या वर आढळतो. आयनांबर हा मूळ ग्रीक भाषेतील शब्द असून, त्याचा अर्थ 'उष्णता' असा आहे.

पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या वर ८० कि.मी. ते ४५० कि.मी. असा या थराचा विस्तार आहे. यातील वातावरणावर सूर्याचा प्रभाव आहे. दिवसाच्या तापमानावरही याचा प्रभाव पडू शकतो, जे दोन हजार डिग्री सेल्सियसपेक्षा वाढू शकते. आयनांबर या थरात हवेचे तीन महत्त्वाचे घटक असतात. ते म्हणजे - न जळणारा रंगहीन हलका वायू म्हणजेच हेलियम, आण्विक नायट्रोजन आणि आण्विक ऑक्सिजन.


सूर्यापासून मिळालेली अतिनील किरणे आणि क्ष किरणे आयनांबर मोठ्या प्रमाणात शोषून घेतो.

**मेसोस्पीअर आणि स्थितांबर यांची वैशिष्ट्ये कोणती?**

पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या ५० कि.मी. वर मेसोस्पीअर नावाचा थर आढळतो, जो पृथ्वीच्या पृष्ठभागापासून ८० कि.मी. वर विस्तारलेला आहे. हा वातावरणातील तिसऱ्या क्रमाकांचा थर आहे. मेसोस्पीअर हा शब्द ग्रीक शब्द 'मेसोस स्पायरा' या शब्दापासून बनला आहे. ज्याचा अर्थ 'मध्यम गोल' असा आहे.

हे वातावरण ऑक्सिजन, नायट्रोजन आणि कार्बन-डाय-ऑक्साइड यांपासून बनलेले असून, याची घनता कमी आहे. मेसोस्पीअरमुळे अवकाशातून येणाऱ्या उल्का आणि लघुग्रह यांचा पृथ्वीवर पोहोचण्याच्या आधीच सर्वनाश होतो.

स्थितांबर नावाचा थर वातावरणामध्ये जमिनीच्या पृष्ठभागापासून दुसऱ्या क्रमांकावर येतो. जमिनीच्या वर ५० कि.मी.वर हा थर विस्तारलेला आहे. ओझोनचा थर हा स्थितांबराच्या वरील भागात तयार होतो. या थरामध्ये ऑक्सिजनचे अणू एकत्र येऊन ऑक्सिजनचे कण तयार करतात. हे ऑक्सिजनचे कण पृथ्वीला अतिनील किरणांपासून वाचवतात. जर तापमान विचारात घेतले तर स्थितांबर या थरात एकसारखेपणा नाही आणि याचे कारण ओझोनचा थर आहे.




**वातावरणशास्त्र**

पृथ्वीच्या वातावरणाचा अभ्यास करणे म्हणजेच वातावरणाचे शास्त्र शिकणे होय. यालाच वातावरणशास्त्र म्हणतात. लिऑन्स टिझरन्स डी बॉर्ट आणि रिचर्ड ॲस्समान हे शास्त्रज्ञ या शास्त्राचे प्रणेते मानले जातात.

**आश्चर्यवर्धक : जेटची शक्ती**

स्थितांबर हा वातावरणातील सगळ्यात उंच थर आहे, ज्यामध्ये जेट नावाचे विमान उड्डाण करू शकते. जेव्हा हवामान खराब असते तेव्हा विमाने ट्रोपोस्पीअर नावाच्या थरातून विहार करतात; कारण हवेची घनता तेव्हा कमी असते व विमान सर्वांत वेगाने कुठल्याही गोंधळात न अडकता उड्डाण करू शकते.

**का बरं ट्रोपोस्पीअर सगळ्या थरांमध्ये वेगळा आहे?**

ट्रोपोस्पीअर हा वातावरणातील सर्वांत खालचा व सर्वांत मोठा थर आहे. सुमारे ८० टक्के वातावरण हे ट्रोपोस्पीअरने बनलेले आहे. तसेच ९९ टक्के वातावरणातील वाफेचाही यात समावेश असतो.





ट्रोपोस्पीअर पृथ्वीपासून १८ कि.मी. उंचीवर विस्तारलेला आहे आणि पृथ्वीवरील सगळे हवामानबदल तो दर्शवतो. जे जे ढग आपल्याला दिसतात ते पाण्याची वाफ, धुळीचे कण आणि वातावरणातील वायूंपासून तयार होतात.

ट्रोपोस्पीअर हा वातावरणातील असा थर आहे ज्यामध्ये आपण राहतो. त्यामध्ये असे वायू आहेत ज्यांच्यामुळे आपण श्वासोच्छवास करू शकतो आणि जे पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी उपयुक्त असतात.

**तथ्य : ओझोनचा थर**

स्थितांबर हा थर ओझोनच्या थरातून घातक अशी किरणे शोषून घेतो, ज्यामुळे त्यातून पृथ्वीचा बचाव होण्यास मदत होते. हा थर अतिनील प्रकाश 'UVB' शोषून घेउन कॅन्सरसारख्या आजारातून वाचवण्यास मदत करतो. ओझोन या परमाणूमध्ये ऑक्सिजनचे तीन अणू असतात. ह्या अणूंचा रंग निळा असतो आणि त्यांना खूप वास असतो. सामान्य ऑक्सिजनमध्ये दोन अणू असतात आणि ते वासरहित व गंधरहित असतात. तेजोवलय हे ओझोनच्या थराचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणता येईल. तेजोवलय म्हणजे ध्रुवीय प्रदेशात कधी कधी रात्री आकाशात चमकणारं तेजस्वी वलय.

**निहारिका देशमुख**




गुळाची ढेप आणि सरबत


**राजीव तांबे**


**किंमत : ६०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

# हास्यकट्टा!


पावसाळी अधिवेशन सुरू...
डराव
डराव
डराव
डराव
डराव
डराव...


तुम्ही दारू पिऊन अडखळता ती अनियमीतता
आणि रस्ते खोळता तो घोटाळा...!
अनियमीतता व घोटाळा...


पाणी...
पाणी..!!
पाणी..
पाणी...!


१९६०
१९७०
१९८०
2000
पाणी
प्रगती..?
२०१६
पाणी

**२री आवृत्ती**

एका घरकाम करणाऱ्या स्त्रीची आत्मकथा

# आलो-आंधारि





मूळ बंगाली लेखिका
**बेबी हालदार**


बंगालीतून हिंदी अनुवाद
**प्रबोध कुमार**

हिंदीतून मराठी अनुवाद
**मृणालिनी गडकरी**

**किंमत : १६०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

जर तेरा वर्षं पूर्ण होण्यापूर्वीच, सातवीतूनच शाळेला रामराम ठोकून, एका अडाणी, मंदबुद्धी आणि दुप्पट वयाच्या माणसाबरोबर तुझी गाठ बांधली गेली, अंगावर दूध पिणारं एक मूल असतानाच दुसऱ्याची चाहूल लागली आणि पाहता पाहता तीन मुलांची आई झालीस, पंचविशीतच शरीर आणि मन थकलं असतानाही मुलांसकट दूर एखाद्या अनोळख्या गावी जावं लागलं. पोटासाठी मोलकरणीचं काम करतानाच मुलांची दुखणी, अभ्यास, पैसा ह्यांची सतत काळजी वाहावी लागली आणि असं असतानासुद्धा, स्वत:च्या ह्या धकाधकीच्या आयुष्यात सर्व अडचणींना तोंड देत इथपर्यंत कसे आलो, हे सातवीपर्यंत शिकलेल्या मोडक्यातोडक्या पण अतिशय सरळ भाषेत सांगण्याची जिद्द तुझ्यात असेल, तर सखे, तुझं दुसरं नाव असेल बेबी हालदार. – जिच्या 'आलो-आंधारि' ह्या आत्मकथेनं साहित्य-जगतात खळबळ उडवून दिली.








# एल्मर मालिका


मूळ लेखक
**डेव्हिड मॅकी**

अनुवाद
**डॉ. वृषाली पटवर्धन**

किंमत - प्रत्येकी ₹ ६०


**एल्मर**
**एल्मर आणि अनोळखी पाहुणा मित्र**
**एल्मर आणि हरवलेला टेडी**
**एल्मर आणि वारा**
**एल्मर आणि विल्बर**






# दिलेल्या चौकोनात प्राण्यांची नावे शोधा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ | वा | ह | म | को | ल्हा | ड |
| स | घ | र | रि | गें | डा | स |
| जि | रा | फ | न | ण | ल | सा |
| पा | र | ह | अ | स्व | ल | प |
| झे | ण | त्ती | मा | द | सिं | ह |
| ब्रा | क | घो | ज | क | घो | म |
| गो | रि | ला | डा | व | ड | य |



# निवडक पुस्तके...




भारताचे
भवितव्य घडविण्यासाठी
भ्रष्टाचाराविरुद्ध
चळवळ

Be The Change...


## भ्रष्टाचाराशी लढा

लेखक : **किरण बेदी**
अनुवाद : **सुप्रिया वकील**

पांडुरंग खानखोजे यांचा
एक स्वातंत्र्यसैनिक ते
कृषी संशोधक
या प्रवासाची
चरित्रात्मक कथा


## मी कधीही माफी मागणार नाही!


लेखक : **सावित्री साव्हनी**
अनुवाद : **अवंती महाजन**



**RNI NO-MAHMAR/2000/2739**
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 August, 2016. Posting Date : 11 August, 2016.


# काही निवडक पुस्तके











**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.